❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती | शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६ ❖ पाने : ८ ❖ अंक : २४४ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com | Epaper - www.sandhyaepaper.com | www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष
निर्भीड पत्रकारीतेची

# दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

क्युआर स्कॅन करून
दै. संध्याच्या
यूट्युब चॅनलला सबस्क्राईब करा
SUBSCRIBE
www.sandhyaepaper.com

## संध्या प्रहार




# विद्यापीठातून भविष्यातील उद्योग आणि युनिकॉर्न निर्माण व्हावेत : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्राच्या इमारतीचे मुख्यमंत्र्यांच्या हस्ते लोकार्पण

■ नाशिक (दै. संध्या)

विद्यापीठांनी केवळ पदवीधर तयार न करता विद्यार्थ्यांच्या नावीन्यपूर्ण कल्पनांना उद्योग स्टार्टअपमध्ये रुपांतरीत करण्यासाठी इनक्युबेशन सेंटरची सक्षम परिसंस्था निर्माण करावी. विद्यापीठातून भविष्यातील उद्योग, नवोन्मेष आणि युनिकॉर्न निर्माण व्हावेत, असे प्रतिपादन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या नाशिक उपकेंद्राच्या नाशिक उप- परिसर प्रशासकीय इमारतीचा लोकार्पण सोहळा आज दुपारी शिवनई, ता. दिंडोरी येथे आयोजित करण्यात आला होता. त्यावेळी मुख्यमंत्री श्री. फडणवीस बोलत होते. यावेळी राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, जलसंपदा मंत्री तथा पालकमंत्री गिरीष महाजन, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, खासदार डॉ. शोभाताई बच्छाव, खासदार भास्कर भगरे, विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. सुरेश गोसावी आदी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले, जगातील अनेक आघाडीच्या कंपन्या आणि नवकल्पनांचा उगम विद्यापीठांमधून झाला आहे. त्यामुळे विद्यापीठांनी नाविन्यपूर्ण कल्पनांना



प्रोत्साहन देणे, पुढे आणणे गरजेचे आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने या क्षेत्रात काम सुरू केले आहे. मात्र, जागतिक पातळीवरील बदल लक्षात घेता नवोन्मेष, संशोधन आणि उद्योजकतेला आणखी चालना देण्याची आवश्यकता आहे. विद्यापीठातून भविष्यातील मोठे उद्योग आणि 'युनिकॉर्न' निर्माण व्हावेत, यासाठी शासनाकडून आवश्यक सहकार्य करण्यात येईल, अशी ग्वाही त्यांनी दिली. जागतिकीकरणानंतरच्या बदलत्या अर्थव्यवस्थेत शिक्षण, रोजगार आणि सेवा क्षेत्र या बाबी परस्परांपासून वेगळ्या ठेवता येणार नाहीत. केवळ पदवीधरांची संख्या वाढविण्यापेक्षा रोजगारक्षम मनुष्यबळ तयार करणे अधिक महत्त्वाचे आहे. नवीन शैक्षणिक धोरणाच्या माध्यमातून शिक्षण अधिक रोजगारक्षम करण्याचा प्रयत्न सुरू आहे. बदलत्या तंत्रज्ञानाच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना भविष्यातील रोजगाराच्या संधींसाठी तयार करणे आवश्यक आहे, असेही श्री. फडणवीस म्हणाले.


# मानसरोवर यात्रेसाठी नेपाळला गेलेला कल्याणचा तरुण बेपत्ता

### 'आमच्या मुलाला शोधून द्या', अभिषेकच्या कुटुंबीयांचा आक्रोश

■ कल्याण (दै. संध्या)

मानसरोवर यात्रेसाठी नेपाळमध्ये गेलेला कल्याणचा 28 वर्षीय तरुण अभिषेक घोणे गेल्या तीन दिवसांपासून बेपत्ता असल्याने त्याच्या कुटुंबीयांमध्ये मोठी चिंता निर्माण झाली आहे. नेपाळमध्ये आलेल्या भीषण पुरामुळे अनेक नागरिक बेपत्ता झाले असून, त्यात कल्याण-डोंबिवलीतील एकूण चार जणांचा समावेश असल्याची माहिती समोर आली आहे. या नैसर्गिक आपत्तीत अभिषेकचा मागील तीन दिवसांपासून कुटुंबीयांशी कोणताही संपर्क होऊ शकलेला नाही. त्यामुळे तो सुखरूप परतावा, या आशेवर त्याचे कुटुंबीय आतुरतेने त्याची वाट पाहत आहेत.

शासनाने अभिषेकचा लवकरात लवकर शोध घेऊन त्याच्याबाबतची अद्ययावत माहिती द्यावी, अशी आर्त मागणी घोणे कुटुंबीयांनी केली आहे. यासोबतच, केंद्र व राज्य सरकारसह संबंधित सर्व यंत्रणांनी तातडीने मदतकार्य राबवून नेपाळमधील पुरात बेपत्ता झालेल्या सर्व नागरिकांचा युद्धपातळीवर शोध घ्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात येत आहे. अभिषेकच्या वडिलांनी एका वृत्तवाहिनीला माहिती देताना सांगितले की, अभिषेक 24 तारखेला काठमांडूला गेला होता. तिथून सम्राट टुर्सच्या माध्यमातून तो मानससरोवर यात्रेसाठी रवाना झाला आणि तिथल्या बुद्ध गेस्ट



हाऊसमध्ये मुक्कामाला थांबला. रात्री साडे दहा वाजता त्याने फोन करून कुटुंबाशी संवाद साधला आणि तिथले फोटो पाठवले. बोलणे झाल्यानंतर तो झोपला. मात्र बुधवारनंतर त्याच्याशी कोणताही संपर्क झालेला नाही, अशी माहिती त्यांनी दिली आहे. अभिषेक बेपत्ता झाल्यापासून कुटुंबाने शासनाच्या संबंधित वेबसाइटवर त्याची सर्व माहिती नोंदवली आहे; मात्र अद्याप तिथून कोणताही प्रतिसाद मिळालेला नाही. या प्रकरणी कल्याण बाजार पोलिस ठाण्यात रीतसर तक्रारही दाखल करण्यात आली आहे. 'शासनाने आमच्या मुलाचा लवकरात लवकर शोध घ्यावा,' अशी आर्त साद अभिषेकच्या वडिलांनी सरकारला घातली असून, ही भावनिक विनंती करताना त्यांच्यासह संपूर्ण कुटुंबाला अश्रू अनावर झाले.

## थोडक्यात...



### लँडिंगच्या वेळी विमानाचे टायर फुटले

बिलासपूर : दैनिक संध्या

छत्तीसगडमधील बिलासपूर विमानतळावर लँडिंगच्या वेळी विमानाचे टायर फुटले. शुक्रवार दुपारी अलायन्स एअरचे विमान दिल्लीहून बिलासपूरला पोहोचले, तेव्हा हा अपघात झाला. विमानाचे सुरक्षित लँडिंग करण्यात आले. विमानात असलेले सर्व ३५ प्रवासी सुरक्षित आहेत. याच विमानाला बिलासपूरहून प्रयागराजला जायचे होते, पण विमानतळ प्रशासनाने ते रद्द केले आहे. मात्र, याची अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. मिळालेल्या माहितीनुसार, धावपट्टीवर लँडिंग केल्यानंतर विमान धावत असतानाच टायर फुटल्याचा आवाज ऐकून प्रवासी घाबरले. मात्र, वैमानिकाने परिस्थिती हाताळत विमान सुरक्षितपणे थांबवले. विमानतळावरील कर्मचाऱ्यांनी तात्काळ कार्यवाही करत सर्व प्रवाशांना सुरक्षित बाहेर काढले.

### वकिलाची गोळ्या झाडून हत्या; आरोपींना जन्मठेप

अहिल्यानगर : दैनिक संध्या

वकिलाची गोळ्या झाडून हत्या केल्याच्या आरोपावरून जिल्हा न्यायालयाने नेवाशातील लष्करे टोळीतील ७ जणांना मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा आज, शुक्रवारी सुनावली. या खटल्यातील इतर ५ आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली. विशेष सरकारी वकील उज्वल निकम यांनी ही माहिती दिली. नेवासा तहसील कार्यालयाच्या आवारातच भरदुपारी हत्येची घटना घडली होती. प्रवीण पोपट खरचंद, मोहन सुरेश लष्करे (फरार), रामेश्वर भगवान गाढे, चौरंगीनाथ गोरक्षनाथ लष्करे, पवन सोमनाथ नरुल्ला, सचिन चंदू चव्हाण व सादिक बशीर शेख या ७ जणांना मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावण्यात आली तर कटाचा थेट व पुरेसा पुरावा न मिळाल्याने अशोक जालिंदर जगताप, सत्यवान धनराज सोनकांबळे उर्फ लष्करे, विलास पोपट जिरे, सोपान भगवान गाढे व सुनील उर्फ सोन्या मोहन परदेशी या ५ जणांची खटल्यातून मुक्तता करण्यात आली. प्रधान जिल्हा व सत्र न्यायाधीश एस. बी. कचरे यांनी या खटल्याचा निकाल दिला.

### मुंबईतील दोन नामांकित डॉक्टरांसह १२० पर्यटक

मुंबई : दैनिक संध्या

महाजलप्रलयामुळे नेपाळमधील रस्ते, पूल व वाहतूक व्यवस्था पूर्णपणे कोलमडली आहे. या नैसर्गिक आपत्तीत मुंबईतील ५९ पर्यटक अडकले आहेत. याशिवाय 'रिचा टुर्न्स अँड ट्रॅव्हल्स'च्या माध्यमातून गेलेल्या ६१ पर्यटकांशीही अद्याप संपर्क झालेला नाही. यात मुंबईतील दोन नामांकित डॉक्टरांचा समावेश आहे. यामुळे मुंबईतील आपत्ती व्यवस्थापन विभागात व बेपत्ता पर्यटकांच्या कुटुंबांत चिंतेचे वातावरण पसरले आहे. अंधेरीतील डॉ. आनंद देशपांडे आणि त्यांच्या पत्नी डॉ. गायत्री देशपांडे नेपाळमध्ये अडकले आहेत. डॉ. आनंद देशपांडे हे हिंदुजा रुग्णालयात रक्त संक्रमण शास्त्र विभागाचे सल्लागार आणि प्रमुख आहेत.

# सरकार हजारदा चर्चा करायला तयार

### राहुल गांधींना 'रिलाँच' करण्याचा काँग्रेसचा डाव- चंद्रशेखर बावनकुळे

■ मुंबई (दै. संध्या)

महाराष्ट्रात शासकीय वसतिगृहांच्या प्रवेशातील वयाची अट रद्द करणे, रिक्त पदांची भरती आणि इतर मूलभूत मागण्यांसाठी आदिवासी विद्यार्थ्यांचे पुणे (मांजरी), नाशिक व नागपूर येथे आंदोलन आणि आमरण उपोषण सुरू असून, यावरून विरोधकांनी भाजप सरकारला लक्ष्य केले आहे. यावर प्रतिक्रिया देताना मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसवर जोरदार पलटवार करत म्हटले आहे की, आदिवासी विद्यार्थ्यांच्या प्रश्नांवर राजकारण करुन राहुल गांधींचे महाराष्ट्रातील 'रिलाँचिंग' करण्याचा प्रयत्न काँग्रेसने थांबवावा. सरकार विद्यार्थ्यांशी तीनदा चर्चा करु शकते, गरज पडल्यास चौथ्यांदा नव्हे तर हजारदा संवाद साधण्याचीही तयारी ठेवत आहे. चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, आदिवासी विद्यार्थ्यांच्या मागण्यांवर सरकारने विद्यार्थ्यांशी चर्चा केली आहे. त्यांच्या मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेत लिखित आश्वासनही दिले आहे. सरकार विद्यार्थ्यांशी तीनदा चर्चा करू शकते, गरज पडल्यास चौथ्यांदा नव्हे तर हजार वेळा संवाद साधण्याचीही तयारी ठेवते. मग प्रश्न सुटण्याच्या मार्गावर असतानाही आंदोलन सुरू ठेवण्याचा हट्ट का? असा सवाल बावनकुळे यांनी उपस्थित केला आहे. तसेच विद्यार्थ्यांच्या खांद्यावर बंदूक



ठेवून राहुल गांधींच्या पुढील महाराष्ट्र दौऱ्यापर्यंत आंदोलन पेटते ठेवण्याचा कॉंग्रेसचा डाव हा आदिवासी विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी खेळण्याचा प्रकार असल्याची टीकाही बावनकुळे यांनी केली आहे. पुढे बोलताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी विद्यार्थ्यांसाठी सुविधा आणि शैक्षणिक संधी वाढविण्यासाठी शासन संवेदनशीलपणे काम करत आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य घडविणे हा सरकारचा उद्देश आहे. मात्र काँग्रेसला विद्यार्थ्यांच्या करिअरपेक्षा आपल्या नेत्यांचे राजकीय करिअर वाचवण्याची अधिक चिंता असल्याचे या आंदोलनाच्या निमित्ताने स्पष्ट होत आहे, असा टोलाही बावनकुळे यांनी लगावला.

# नेपाळमधून राज्यातील १०६ नागरिक परतले

### ८४ आज परतणार; रायगड, अहिल्यानगर, नागपूरमधील नागरिक

■ मुंबई (दै. संध्या)

नेपाळमधील काठमांडू व चीनमधील सागा (चीन) येथे पर्यटनासाठी गेलेल्या राज्यातील विविध जिल्ह्यातील नागरिकांना परत आणण्यासाठी तेथील सरकारच्या माध्यमातून कार्यवाही करण्यात येत आहे. याअंतर्गत नेपाळमध्ये अडकलेले १०६ नागरिक शुक्रवारी भारतात दाखल झाले तर उद्या शनिवारी आणखी ८४ नागरिक हे भारतात परतणार असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली आहे. रायगड, अहिल्यानगर, नागपूर यासह विविध जिल्ह्यांतील नागरिक सुरक्षितरीत्या परतत असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली. अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेर येथील ४५ पर्यटक नेपाळ येथील चितवन येथे आहेत. या समूहात अहिल्यानंगरमधील २७, नाशिकमधील १२, पुण्यातील ५, मुंबईतील एका पर्यटकाचा समावेश असल्याची माहिती संगमनेर येथील पर्यटन कंपनीचे सहल आयोजक दर्शन गुंजाळ यांनी दिली. हे पर्यटक उद्या शनिवारी भारतात अयोध्येत परतणार असल्याची माहिती त्यांनी दिली. हे सर्व नागरिक सुखरूप असून सद्यस्थितीत काठमांडूकडे जाणारे मार्ग बंद असल्यामुळे ते



लुंबिनीकडे जाणार असून तेथून पुढे आयोध्याकडे जाण्याचे त्यांचे नियोजन आहे. सद्यस्थितीत त्यांना शासन स्तरावरून मदतीसाठी प्रयत्न केले जात आहे. रायगड जिल्ह्यातील जय गिरनारी शिवदत्त मंदिर ट्रस्टच्या वतीने ३७ व्यक्ती नेपाळ येथे दर्शन व पर्यटनासाठी गेल्या आहेत. सध्या सर्व जण सागा (चीन ) येथे सुरक्षित आहेत. त्यांचे काठमांडू येथून २९ रोजी भारतात परतण्यासाठी विमान आहे. सर्व जण पर्यायी मार्गाने काठमांडूकडे आज सकाळी रवाना झाले असून सायंकाळपर्यंत काठमांडू विमानतळावर पोहोचतील. ते उद्या शनिवारी येतील, अशी माहिती पर्यटकांचे नातेवाईक दिलीप शेठ यांनी दिली आहे. सर्वांची प्रकृती ठीक असून त्यांच्यापैकी दोघे डॉक्टर असल्याची माहिती देण्यात आली आहे. नागपूर जिल्ह्यातील सर्व १०६ नागरिक सुखरूप असून,नागपूर जिल्हा प्रशासन यांचा त्यांच्याशी सातत्याने संपर्क असून त्यांच्या सुरक्षित परतीच्या प्रवासाबाबत आवश्यक समन्वय व देखरेख करण्यात येत आहे. स्वत: मुख्यमंत्री फडणवीस यांनी हे पर्यटक सुखरूप परतावेत यासाठी पुढाकार घेतला. त्यापैकी ४ नागरिक विमानाने दिल्ली येथे सुखरूप पोहोचले असून, उर्वरित १०२ नागरिक बसमार्गे भारतात दाखल झाले आहेत. हे नागरिक बिहार राज्यातील सीतामढी जिल्ह्यात असून, आज रात्री ते पटना येथे पोहोचून तेथे मुक्काम करणार आहेत. त्यानंतर उद्या २९ ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ७ वाजताच्या रेल्वेने पटना येथून नागपूरकडे रवाना होणार आहेत.

# शिरसाट-बावनकुळेंना सोडणार नाही!

### *नोंदी रद्द करून मराठ्यांना आरक्षणापासून वंचित ठेवण्याचा डाव : मनोज जरांगे*

■ जालना (दै. संध्या)

एकनाथ शिंदे यांनी संजय शिरसाट यांना पुढे करून, तर देवेंद्र फडणवीस यांनी चंद्रशेखर बावनकुळे यांच्यामार्फत मराठा समाजाचे वाटोळे केले आहे. आम्ही यापैकी कोणालाही सोडणार नाही. जर आम्हाला प्रमाणपत्रे दिली तर आमचे प्रेम पूर्वीसारखेच राहील; अन्यथा कोणाचीही गय केली जाणार नाही. ज्यांचे असे म्हणणे आहे की ही प्रमाणपत्रे कायद्याच्या कसोटीवर रद्द झाली, त्यांनी अंतरवलीला येऊन ते सिद्ध करून दाखवावे, असा इशारा मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी दिला. मनोज जरांगे म्हणाले की, एकाच कुटुंबात बहिणीला जात पडताळणी प्रमाणपत्र (व्हॅलिडिटी) मिळते, मग भावाचे प्रमाणपत्र रद्द कसे होऊ शकते? जात पडताळणी अधिकारी व्हॅलिडिटीबाबत अधिकृत पत्र देणार असताना, संजय शिरसाट आणि चंद्रशेखर बावनकुळे ते रद्द करायला सांगत आहेत. मी हवेत किंवा फुकट आरोप करत नाही. मी छगन भुजबळ किंवा धनंजय मुंडे यांचे नाव घेतले आहे का? नाही, कारण त्यांचा याच्याशी काही संबंध नाही ज्यांचा संबंध नाही त्यांचे नाव घेण्याचे काम आम्ही करत नाही तसे आमच्यावर तसे संस्कार नाहीत. मनोज जरांगे म्हणाले की, सरकारला आंदोलकांवर हल्ले घडवून आणण्यापलीकडे दुसरे काही येत नाही. पूर्वी आम्ही बेसावध होतो; आमच्या आंदोलनाच्या मंडपात पोलिसांना घुसण्याचा कोणताही अधिकार



नव्हता. आम्ही कोणालाही त्रास देत नव्हतो, तरीही आमच्यावर हल्ला करण्यात आला. पोलिसांनी आमच्या मंडपात घुसून कारवाई केली. देवेंद्र फडणवीस यांनी एक गोष्ट लक्षात ठेवावी. तेव्हा तुम्ही कारवाई केली, पण आता आम्ही तसे काहीही होऊ देणार नाही. आता आम्ही पूर्णपणे सावध आहोत. सरकारची ही मस्ती सर्व जातींमधील लोक उतरवतील, कारण सध्या या राज्यात कोणीही सुखी नाही. मनोज जरांगे म्हणाले की, मी कोणाचाही मिंधा नाही, त्यामुळे चूक झाल्यावर मी कोणावरही बोलू शकतो. म्हणूनच मी एकनाथ शिंदेंवरही टीका केली आहे. मी कोणाकडूनही एक रुपया घेतलेला नाही. मी यांच्यासाठी समाजाला सोडू शकत नाही; समाज अमर आहे. माझे हे शेवटचे आंदोलन असून, आम्ही आमच्या सर्व मागण्या मान्य करायला लावणारच. हा आमच्या आरक्षणाचा विषय असल्याने आम्ही शिरसाट किंवा बावनकुळे, कोणालाही सोडणार नाही. मनोज जरांगे म्हणाले की, विखे पाटील स्वतःचे नाव खराब करून घेत आहेत. त्यांनी सरकारला प्रमाणपत्रे वाटायला भाग पाडले पाहिजे. मराठा आरक्षण उपसमितीचे अध्यक्षपद असेपर्यंत त्यांनी समाजासाठी काम केले पाहिजे. विखे पाटलांना या विषयातील काहीच माहिती नाही आणि त्यांच्याकडे उपसमितीच्या कामासाठी वेळही नाही. केवळ जीआर काढून काही होणार नाही; किती प्रमाणपत्रे वाटली, याचा हिशोब उपसमितीकडे नाही. तसेच शिंदे समितीला वेळ दिला, तरीही ती काहीच काम करत नाही.

मनोज जरांगे म्हणाले की, जोपर्यंत 58 लाख मराठा बांधवांना प्रमाणपत्रे मिळत नाहीत, तोपर्यंत आम्ही कोणाचेही ऐकणार नाही. केवळ जीआर (शासकीय निर्णय) निघाला म्हणून आम्ही शांत बसणार नाही, तर प्रत्यक्ष प्रमाणपत्रे आणि व्हॅलिडिटी मिळालीच पाहिजे. ज्यांची प्रमाणपत्रे निघाली आहेत, त्यांची व्हॅलिडिटी का होत नाही? जुन्या नोंदी शोधल्यामुळे त्या आता समोर आल्या आहेत. या 58 लाख नोंदी कमी करण्याचा सरकारचा डाव आहे, कारण या नोंदींमुळे सुमारे 3 कोटी मराठ्यांना आरक्षणाचा लाभ मिळणार आहे. मराठा समाज मोठा होऊ नये, हीच सरकारची इच्छा आहे. पण मी यांना घाबरत नाही. शिंदेंनी शोधलेल्या नोंदी रद्द करून देवेंद्र फडणवीस त्यांचे नाव खराब करत आहेत का? की मराठ्यांना 58 लाख नोंदींचे आकडे सांगून शिंदेंनीच आमची फसवणूक केली आहे? शिंदे समिती ही नवीन नोंदी शोधण्यासाठी होती. उदय सामंत यांनी 58 लाख नोंदी सापडल्याचे व त्यानुसार प्रमाणपत्रे देणार असल्याचे कबूल केले होते. मग आता फडणवीस आणि राधाकृष्ण विखे पाटील यांच्या वक्तव्यांवरून हे सर्व मुद्दाम सुरू आहे का, असा प्रश्न पडतो.

# ५० ई-बसेसचे लोकार्पण

■ नाशिक (दै. संध्या)

नाशिक शहरातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम, आधुनिक, पर्यावरणपूरक आणि नागरिकाभिमुख करण्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण पाऊल म्हणून पीएम ई-बस सेवा योजनेंतर्गत ५० ई-बसेसचे नाशिककरांच्या सेवेत दाखल होत आहेत. या बसेसच्या माध्यमातून नागरिकांना विश्वासार्ह व दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळणार असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. नाशिक शहरासाठी दाखल झालेल्या ५० ई-बसेसचे लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी पालकमंत्री गिरीष महाजन, महानगरपालिकेच्या महापौर हिमगौरी आहेर-आडके, उपमहापौर विलास शिंदे, महानगरपालिका आयुक्त मनिषा खत्री, लोकप्रतिनिधी उपस्थित होते. मुख्यमंत्री श्री. फडणवीस म्हणाले की, केंद्र शासनाच्या पीएम ई-बस सेवा योजनेंतर्गत नाशिक शहरासाठी मंजूर करण्यात आलेल्या १२ मीटर लांबीच्या ५० ई-बसेस शहरात दाखल झाल्या आहेत. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेत आधुनिक ई-बसेसचा समावेश झाल्यामुळे नागरिकांना विश्वासार्ह व दर्जेदार प्रवासाची सुविधा मिळणार आहे. तसेच सार्वजनिक वाहतुकीचा वापर वाढल्यास खासगी वाहनांवरील अवलंबित्व कमी होऊन शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासही हातभार लागणार आहे. डिझेल बसेसच्या तुलनेत ई-बसेसच्या वापरामुळे परिचालन खर्चातही बचत होणार आहे. नाशिक शहराचा विकास आणि सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी भविष्यात आणखी बसेस उपलब्ध होणार असून त्यातून नागरिकांना अधिक व्यापक आणि पर्यावरणपूरक सार्वजनिक वाहतूक सुविधा उपलब्ध होणार असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी सांगितले.

## संपादकीय

# डोंगराएवढे विलक्षण विधायक कार्य

वैश्विक स्वाध्याय परिवाराचे प्रवर्तक पद्मविभूषण पांडुरंगशास्त्री आठवले (दादा) हे आपल्या भारत देशाचे एक कृतिशील तत्त्वचिंतक म्हणून सुख्यातकीर्त आहेतच, परंतु सामान्य माणसांना बरोबर घेऊन डोंगराएवढे विलक्षण विधायक कार्य उभे करणारे महर्षी म्हणून दादांचे स्थान अद्वितीय आहे. दादांनी 'भक्ति ही सामाजिक शक्ति आहे', ही गर्जना १९५४ साली जपानमधील विश्व तत्त्वज्ञ परिषदेच्या व्यासपीठावरून केली. पांडुरंगशास्त्री हे एका ध्येयासक्तीने झपाटलेले असल्याने केवळ गर्जना करून ते थांबले नाहीत तर आपल्या प्रकांड बुद्धिसामर्थ्याने, अलौकिक कर्मयोगाने आणि प्रेमाच्या अजोड शक्तीने या भारतभूमीत एक असामान्य कार्य त्यांनी यशस्वीपणे सर्जित केले.

दादांनी केवळ हृदयस्थ भगवंत, दैवी भ्रातृभाव हे शब्द उच्चारले नाहीत तर त्यानुसार चालणारा आणि त्या विचारांनी कृतिशील असणारा एक परिवार घडवला. योगेश्वर कृषी, मत्स्यगंधा, वृक्षमंदिर यांसारखे अतुलनीय आध्यात्मिक प्रयोग भारताच्या हजारो गावांत दादांनी उभे केले, लाखो कृतिशील तयार केले. आपली सुपुत्री श्रीमती धनश्री श्रीनिवास तळवलकर, म्हणजेच दीदींना वैश्विक स्वाध्याय कार्याचे नेतृत्व करण्यासाठी शिल्पकारासारखे घडवले. गेली अनेक वर्षे दीदी देशविदेशांत विस्तारलेलं हे वैश्विक स्वाध्याय कार्य अत्यंत प्रभावीपणे सांभाळत आहेत. इतकेच नाही तर कार्याला नवनवे आयाम प्रदान करत आहेत. दीदींची अनन्यता, विलक्षण सर्जनशीलता, अजोड संभाषणकला आणि माणसाला सहज आपलेसे करण्याची हातोटी यासारखे गुण केवळ स्वाध्यायींनाच नव्हे तर त्यांना अगदी एकदाच भेटलेल्या त्रयस्थ व्यक्तीलाही भावतात.

दीदी नेहमी म्हणतात, आज जसा आपला निसर्गाकडे बघण्याचा दृष्टिकोन थोडासा उपयोगितावादी, भोगवादी झालाय ना, तसंच रक्षाबंधनासारख्या उत्सवांचं पण झालंय. रक्षाबंधनाचा उत्सव हा राखीचे डिझाइन आणि भावाचे 'रिटर्न गिफ्ट' यांतच अडकलाय की काय असे वाटते. रक्षाबंधन हा भावा-बहिणींच्या निर्मळ नातेसंबंधांचा उत्सव आहे. त्यात एका आत्मीय दैवी संबंधाचे बंधन आहे त्या बंधनाचे प्रतीक म्हणजे 'राखी'. गेली अनेक वर्षे विविध विभागांत आणि विविध मानवसमूहांत रक्षाबंधनाचा पवित्र उत्सव साजरा केला जात आहे. ज्याप्रकारे दीदींनी वनवासी, मेहेर, क्षत्रिय, चौधरी, सागरपुत्र, आगरी अशा अनेक समूहांना एकसूत्रात बांधले आहे ते विलक्षण आहे. दुःखाची गोष्ट म्हणजे या वनवासी, गिरीवासींना कुणीच आपलेसे करत नाही, कुणीच आपले म्हणत नाही. अशावेळी जेव्हा दादांचा स्वाध्याय परिवार वनवासी लोकांकडे निःस्वार्थ, निरपेक्ष प्रेम घेऊन जातो, हृदयस्थ ईश्वराचे अधिष्ठान सांगून त्यांच्यातील अस्मिता, तेजस्विता उभी करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा त्यातील वेगळेपण निश्चित जाणवते. तुझ्याबरोबर चराचर चालवणारा भगवंत असेल तर तू हलका कसा असू शकतोस? तो जसा तुझ्यात आहे तसाच इतर सर्वांत आहे, त्यामुळे आपण एक आहोत, आपल्यात भेद नाही तर दैवी भ्रातृत्व आहे हा विचार माणसाचा कणा ताठ करतो. आनंदाची गोष्ट ही की नाशिक, धुळे, नंदुरबार, जळगाव, मालेगाव या जिल्ह्यांतील ११,५०० स्वाध्यायी बंधू-भगिनी १६५० वनवासी गावांत गेली दोन वर्षे सातत्याने हाच विचार घेऊन जात आहेत. पदरचे पैसे खर्च करून निरपेक्षपणे वनवासींना आत्मीयतेने भेटत आहेत आणि हजारो वनवासी बंधू-भगिनींशी एक निर्मळ निःस्वार्थ नातं बांधण्याचा प्रयत्न करत आहेत. कुठल्याही प्रकारचा गाजावाजा न करता निरंतर जात आहेत. स्वाध्याय परिवाराने सगळ्यांमध्ये आत्मीयतेची एक जाणीव निर्माण केली आहे. लाखो स्वाध्यायींबरोबर बंधू-भगिनीचे पवित्र नाते बांधणाऱ्या धनश्रीदीदी अनेक स्वाध्यायींसह आज २८ ऑगस्ट रोजी नाशिक जिल्ह्याच्या दिंडोरी तालुक्यातील चारोसे या वनवासी गावात रक्षाबंधन उत्सवानिमित्त त्यांच्याशी असलेलं नातं आणखी हृदयस्थ करणार आहेत.

## संस्कृत सुभाषित

दान धर्मश्च विद्या च रुपं शीलं कुलं तथा।
सुखमायुर्यश्चैव नव गौप्यानि यत्न:।।


अर्थ : दान, धर्म, विद्या, रूप, शील, कुल, आरोग्य, सुख आणि आयुष्य या नऊ गोष्टींचे रक्षण प्रयत्नपूर्वक केले पाहिजे.

## गुरु वचन

### त्यागाने योग प्राप्ती

संसारामध्ये कोणताही व्यापारी व्यापारासाठी जेवढी गुंतवणूक करतो. तेवढ्याच अधिक फायद्याचा भागीदार तो बनतो. अशाप्रकारे लक्ष, कोटी, अब्ज असा जेवढा अधिक खर्च केला जातो. तेवढाच त्याचा अधिक लाभ मिळतो. शेतकरी शेतामध्ये काही धान्य पेरतो तेव्हाच त्यापासून अधिक धान्य मिळते. यज्ञकार यज्ञामध्ये आहुती देतो, तेव्हाच त्याला लोक-परलोकामध्ये विविध ऐश्वर्य आणि सुख प्राप्त होते. अशाप्रकारे भोगत्यागनेच उत्तम भोगाची प्राप्ती होऊ शकते. मानवास वाटते की, वसन, अलंकार, उत्तम भोजन, उत्तम वनिता, पूत्र तसेच सर्वाधिक ऐश्वर्य असावे, परंतु असे वाटण्याने हे सर्व होणे अशक्य आहे. हे सत्य आहे की, लाख प्रयत्न केल्यानंतर सुद्धा मनुष्याला शरीरात घालायला कपडे आणि पोट भरण्यास अन्न मिळत नाही. यासाठी कठोर परिश्रमाशिवाय प्रावक्त धर्माधर्मही अतिरिक्त वस्तुंच्या प्राप्तीसाठी कारण ठरतात. अन्यायानंतर प्राप्त झालेल्या धनासोबतही त्याला वैर वाटते.किंवा त्याचा विनाश होऊन जातो. किंवा योग करणाऱ्याची भोगशक्ती खत्म होऊन जाते. शेवटी त्याग आणि ग्रहण दोन्हीही शास्त्रानुसार अनुकूल वैराग्य आणि त्याग असल्याने सवर्गलोक, इंद्रलोक, वृहलोक प्राप्त होते. येथील भोगाप्रमाणे इतरत्र योग प्राप्त होने असंभव आहे. जो रस, जो शब्द, जो सुगंध तेथे आहे जी उर्वशी, राची, रंभा आदी लोकांमध्ये प्राप्त होते, ते येथे कोठे. श्वान, शकर, शृंगाल आदी योग विषयांत स्पृहाचाही काय अर्थ असू शकतो? बुद्धीमान लोक तर त्या सुखाम ध्ये अनित्यता आणि विनश्वरताचा अनुभव घेऊन वेगळे होतात.

## उपदेशकथा



### मोक्ष

संध्याकाळची वेळ होती. गौतम बुद्ध आश्रमात शिष्यांशी वार्तालाप करीत होते. काही शिष्य प्रश्न विचारत होते. एका जिज्ञासू शिष्याने विचारले, 'काय आपले सर्व शिष्य मोक्षप्राप्ती करतात का?' त्यावर बुद्ध म्हणाले, 'काहीजण करतात तर काहीजण नाही.' 'आपण त्यांना मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखविता मग हे कसे?' त्या शिष्याने विचारले. बुद्धांनी सांगितले, 'समजा, तुला कोणी राजमहालाचा रस्ता विचारला आणि तो दुसरीकडेच गेला तर काय करशील? माझे काम केवळ रस्ता दाखविण्याचे आहे. तो दुसरीकडे गेला तर मी काय करू?' बुद्धांनी सांगितले, 'माझे पण तसेच आहे. माझे काम फक्त मोक्षप्राप्तीचा मार्ग दाखविणे एवढेच आहे.'

कथा उपदेश : मार्ग दाखविणे हे गुरूचे काम.
तो ज्याचा त्यालाच तुडवावा लागतो.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | २७:४१:५५+ |
| २९ ऑगस्ट २०२६ | योग:सुकर्मा ०६:३५:३४ |
| शनिवार | योग:धृति २९:२१:०२+ |
| विक्रम संवत्– २०८२ | करण:कौलव ०९:५७:०९ |
| श्रावण शके | करण:तैतिल २१:५०:४१ |
| संवत्– १९४८ | सूर्य:सिंह |
| संवत्सर – पराभवनाम | चन्द्र:मीन२१:३७:१४ |
| अयन– दक्षिणयन | हिजरी सन् – १४४८ |
| मास– श्रावण | मुस्लिम मास – रबिलावल |
| ऋतु– सौर शरद | तारीख – १५ |
| कृष्ण पक्ष | विशेष |
| तिथि:प्रतिपदा ०९:५७:०९ | अश्वतमारुती पूजन |
| नक्षत्र:पूर्वाभाद्रपद | |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १०५३

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | 6 | 9 | 5 | | | 8 | |
| | 9 | | | | 2 | 7 | | |
| | | 2 | | 4 | 7 | 9 | | |
| 8 | | | | | 9 | 4 | 3 | 2 |
| 2 | | | | 8 | | | | 6 |
| 7 | 4 | 3 | 5 | | | | | 8 |
| | | 8 | 3 | 7 | | 6 | | |
| | | 7 | 1 | | | | 4 | |
| | 3 | | | 6 | 5 | 8 | | |

### : सूडोकु :

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

सूडोकु क्र. १०५२ चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 8 | 2 | 9 | 7 | 5 | 4 | 1 | 3 | 6 |
| 6 | 5 | 1 | 8 | 9 | 3 | 4 | 2 | 7 |
| 7 | 4 | 3 | 6 | 1 | 2 | 5 | 9 | 8 |
| 2 | 9 | 5 | 1 | 3 | 8 | 6 | 7 | 4 |
| 3 | 6 | 4 | 5 | 7 | 9 | 2 | 8 | 1 |
| 1 | 8 | 7 | 4 | 2 | 6 | 9 | 5 | 3 |
| 5 | 3 | 6 | 2 | 4 | 7 | 8 | 1 | 9 |
| 9 | 1 | 8 | 3 | 6 | 5 | 7 | 4 | 2 |
| 4 | 7 | 2 | 9 | 8 | 1 | 3 | 6 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९४९ – यूएसएसआरने आपले पहिले अणू बॉम्बचे स्फोट केले.
- १९५३ – यूएसएसआरने आपले पहिले हायड्रोजन बॉम्बचे स्फोट केले.
- १९९० – जर्मनीमध्ये सी–५ ट्रांस्पोर्ट विमानचा अपघातात १३ ठार.
- १९९० – सद्दाम हुसेन जाहिर केले की अमेरिका इराकचा पराभव करु शकत नाही.

### राष्ट्रीय

१६९० – राजारामाचा पाडाव करण्यासाठी औरंगजेबाच्या दरबारातील एक प्रमुख सरदार झुल्फिकार खान याने जिंजीला वेढा घातला.

### जन्म

- १८३० – हुआन बॉतिस्ता अल्बेर्डी, आर्जेन्टीनाचा राष्ट्रपिता.
- १८४२ – आल्फ्रेड शॉ, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १८५७ – सँडफर्ड शुल्झ, ईंग्लिश क्रिकेट खेळाडू.
- १८६२ – अँडु फिशर, ऑस्ट्रेलियाचा पाचवा पंतप्रधान.
- १८८० – लोकनायक बापूजी अणे (माधव श्रीहरी अणे), भारतीय स्वातंत्र्यसैनिक.
- १९०१ – विठ्ठलराव विखे पाटील, भारतातील सहकार चळवळीतील अग्रणी.

### निधन

- ८८६ – बेसिल पहिला, बायझेन्टाईन सम्राट.
- १५२६ – लुई दुसरा, हंगेरीचा राजा.
- १५३३ – अताहुआल्पा, पेरूचा शेवटचा इंका राजा.
- १७९७ – तुकोजी होळकर, होळकर घराण्यातील शूर सेनापती.
- १७९९ – पोप पायस सहावा.
- १९०४ – मुराद पाचवा, ओट्टोमन सम्राट.
- १९०६ – बाबा पदमनजी, मराठीतील ख्रिस्ती साहित्यिक.

## : SMS :

1. Teacher: Agar future me 10 crore milen to kya karoge?
Pappu: Pehle yakeen karunga ki sapna dekh raha hoon!

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३२.१ | २३ |
| अहमदनगर | ३१.७ | २२.५ |
| अकोला | ३५.१ | २५.१ |
| अमरावती | ३२.७ | २५.१ |
| बीड | ३५.९ | २६.३ |
| भंडारा | ३२.८ | २५.८ |
| बुलढाणा | ४३.८ | ३०.७ |
| चंद्रपूर | ३६.२ | २६.१ |
| चेन्नई | ४०.८ | ३०.१ |
| नवी दिल्ली | ४६ | ३५.३ |
| धुळे | ३३.६ | २४.८ |
| गोंदिया | ३२.३ | २५.५ |
| जळगाव | ३५.३ | २५.२ |
| कोल्हापूर | २९.७ | २२.७ |
| लातूर | ३२.६ | २३.२ |
| मुंबई | ३४ | २९.९ |
| नागपूर | ३२.७ | २५.८ |
| नांदेड | ३४.७ | २५.१ |
| नंदूरबार | ३० | २४.३ |
| नाशिक | ३० | २३.२ |
| पुणे | २७.१ | २२ |
| पंढरपूर | ३४.२ | २३.५ |
| सातारा | ३०.८ | २२.५ |
| सांगली | ३१.९ | २३ |
| सोलापूर | ३४.३ | २३.७ |
| वर्धा | ३५.२ | २६.१ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:जांभळा, शुभ दिशा:पश्चिम आपले कर्तृत्व आणि कुवत सिद्ध करण्याच्या संधी मिळतील.

**तुळ :** शुभ रंग:पांढरा, शुभ दिशा:उत्तर व्यापारी व्यवहाराचा नेमका कल लक्षात घेऊन व्यवहाराची दिशा ठरविणे आवश्यक ठरेल.

**वृषभ :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा :पश्चिम देवधर्म, पूजाअर्चा करण्यात वेळ कसा जाईल कळणार नाही. मानसिक समाधान मिळेल.

**वृश्चिक :** शुभ रंग:क़ाळा, शुभ दिशा: पश्चिम कामाच्या निमित्ताने केलेला प्रवास नफा देईल. आर्थिकदृष्ट्या होणाऱ्या वाटचाली वेगवान होतील.

**मिथुन :** शुभ रंग:काळा, शुभ दिशा: दक्षिण कायदेशीर पुरावे असलेले कागदपत्र गहाळ होणार नाही याची काळजी घ्या.

**धनु :** शुभ रंग: जांभळा, शुभ दिशा : पश्चिम मनावर येणारी काही दडपणे दूर करण्यासाठी घरातील ज्येष्ठांचा सल्ला अवश्य घ्या.

**कर्क :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा:दक्षिण घरातील सदस्यांपैकी एखाद्या व्यक्तीचा वाढदिवस थाटामाटात साजरा कराल. आरोग्य उत्तम राहील.

**मकर :** शुभ रंग:निळा,शुभ दिशा: उत्तर नोकरदारांना वरिष्ठांचे बोलणे सहन करावे लागेल. वृद्धांनी आपले पथ्यपाणी व तब्येत सांभाळावी.

**सिंह :** शुभ रंग:भूरा, शुभ दिशा:उत्तर वडीलधारी मंडळीनी दिलेला सल्ला घेऊन कामात केलेले बदल अफलातून यश देतील.

**कुंभ :** शुभ रंग: पांढरा, शुभ दिशा: दक्षिण बेकारांना कामधंदा मिळेल. अविवाहितांचे विवाहाचे प्रश्न सुटतील. आर्थिक प्रश्न सुटतील.

**कन्या :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: उत्तर सामाजिकदृष्ट्या मोठे कार्यविश्व उभे करू शकाल. एखाद्या घरगुती कार्यक्रमाचे आयोजन कराल.

**मीन :** शुभ रंग :काळा,शुभ दिशा:पश्चिम थोरामोठ्यांच्या गाठीभेटीतून बौद्धिक वर्चस्वही सिद्ध करता येईल. बेकारांना कामधंदा मिळेल.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १०५३



### आडवे शब्द

१. सिंह
३. भडीमार
६. महालक्ष्मीची नगरी
७. सारखे खाण्याची इच्छा
८. नवरदेव
९. लाडवाचा शाही प्रकार
१०. निवासस्थान
११. दरोडेखोर
१२. आनंदावर पडल्यास मनोभंग
१४. सर्प
१६. सकस
१८. अतिमहत्त्वाच्या व्यक्तींवरबरोबर आलेला फौजफाटा
२१. प्रत्युत्तर
२४. विष्णूपत्नी
२५. हवेतील शीतलता
२७. वैरी, दावा दाखल करणारा
२८. फटाक्यांत ठासली जाणारी
२९. दुसऱ्यावर केलेले उपकार
३०. विनिमयाचे देशानुसार बदलणारे साधन
३२. नेस्तनाबूत
३३. पांग, मेहरबानी
३५. अगदी नियमित
३८. दगा, हानी
४०. कवितेतील एक शब्दालंकार
४१. ही केवळ 'र' ला 'ट' जुळवल्याने होत नाही!
४४. बारीकसारीक
४७. शरम
४९. उलटीपूर्वीची अवस्था
५१. आवडता, प्रिय
५२. गवत कापण्याचे, उपटण्याचे साधन
५५. दुमड घातलेली करंजी
५८. कुरकूर, अतिश्रम
५९. ध्यान लावणारा पक्षी
६१. देवालयातील गाभारा भरून टाकणारा आवाज
६२. वेळी-अवेळी, रात्री-अपरात्री
६४. गव्हाचे बारीक पीठ
६५. नाश्तापाणी
६६. आरतीसाठीचे वाद्य
६७. पुरुषश्रेष्ठ
६८. लक्ष्मीनारायण

### उभे शब्द

१. पिवळसर रंगाचे काटेरी सुगंधी पान
२. मंत्रीमंडळ
३. महाशिरात्रीचा महिना
४. सीतेला पळवून नेणारा
५. अफूचे बी
६. कारल्याची चव
६अ. नैसर्गिक भुयार
७. हिंदीत खत
७अ. आचारी
९. रात्रभर
१०. हल्ली हे दिवस केवळ गोंगाट आणि खरेदीचे!
१३. पाणी
१५. समाजातील प्रतिष्ठा
१६. थडगे
१७. रक्त देणे
१९. सैन्यातील एक हुद्दा
२०. किल्लीचा जोडीदार
२१. विविध प्रकाराने
२२. जागृत
२३. अर्थसंकल्प
२६. लायब्ररी (मराठी)
३१. केसांची बट
३४. आकाशपोकळी
३५. शेवट करणे, तडीस नेणे (वा.प्र.)
३६. विचार, हेतू
३७. सौनग वठवणारा
३९. सावकार, श्रीमंत
४२. निर्मळ
४३. हा सगळ्यांनीच सोडल्यास बेबंदशाही!
४५. अस्थि
४६. सततचे नाकारणे
४८. लोक, प्रजा
५०. औरंगाबादची प्रसिद्ध वास्तु– 'बीबी का ----'
५३. मृत्यूचा राजा
५४. तारणारा
५६. केशकर्तनालयातील साधन
५७. शाश्वत
६०. कातरलेले तुकडे
६३. शिवाय, वाचून
६४. चालू दिवस
६५. स्वाद, रूची
६५अ. रचल्यास ढीग

### जम्बो शब्दकोडे क्र. १०५२ चे उत्तर

आडवे उत्तर : १.तडकाफडकी ५.पसंत ८.नांगर १०.मरवा १२.परवानगी १४.मळ १६.तडक १७.रांगणे १९.कणीक २०.समरांगण २१.अचानक २३.टमटम २६.कमाल २७.थाळी २९.दर ३०.कर ३२.कौरव ३३.चौक ३४.दोन ३५.पलायन ३७.स्याही ३९.थरकाप ४१.बाबत ४३.तजवीज ४५.नयन ४६.सर ४७.सणक ४९.व ५०.वाटप ५१.नजर ५२.डमरु ५४.भाव ५५.कयास ५७.कालीज ५८.दवा ६०.तार ६१.पोर ६२.स्तवनीय ६३.नवार ६४.विनायक ६८.गो ६९.मळकट ७१.कमळ ७४.पाकळी ७५.पसारा ७७.लवाद ७८.मसलत ७९.गजर ८०.नटराज ८१.कर्पूर

उभे उत्तर : १.तळतळाट २.कारक ३.डमडम ४.कीर ६.संपणे ७.तर ८.नांगी ९.रमणीय ११.वारांगना १३.वाटचाल १५.ठक १८.गण २०.सम २१.अम ावस्या २२.कथाकथन २४.मदनबाण २५.टर २६.कर २८.आपपरभाव ३०.कला ३१.रयत ३५.पत ३६.नजरानजर ३८.हीनगंड ४०.कास ४२.बकवास ४४.जबरदस्त ४७.सरक ४८.उपकार ५३.मलय ५४.भारवाहक ५६.यातना ५९.वावटळ ६०.तान ६१.पोकळ ६४.विलाप ६५.यमराज ६६.सटवाई ६७.पंक ७०.कल ७२.मर्कट ७३.खास ७४.पातक ७६.साग ७८.मज

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे



## राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे कर्वेनगर येथे “सामाजिक रक्षाबंधन”

**पुणे : दैनिक संध्या**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कर्वेनगर मधील सह्याद्री प्रभात शाखेच्या वतीने नव सह्याद्री स्वच्छता कोठी येथे सामाजिक समरसतेचा संदेश देत"सामाजिक रक्षाबंधन-अनोखा रक्षाबंधन" उत्सव साजरा करण्यात आला.या उपक्रमांतर्गत संघ स्वयंसेवकांनी कर्वेनगर परिसरातील सर्व सफाई कामगारांना राख्या बांधल्या. परिसरातील स्वच्छतेसाठी अहोरात्र झटणाऱ्या या सेवकांचा सन्मान करणे हा या मागचा हेतू होता.यावेळी त्यांना मिठाई देऊन सन्मानित करण्यात आले.आम्ही स्वच्छतादूतांचे ऋणी आहोत आणि समाजातील सर्व घटक एकाच कुटुंबाचा भाग आहोत हा समरसता संदेश या निमित्ताने देण्यात आला. सामाजिक बंधुभाव,आपुलकी व राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश याद्वारे दिला गेला. विंग कमांडर अविनाश मुठाळ (निवृत्त) यांनी "कचरावेचकांच्या स्वच्छतेविषयीच्या ते करत असलेल्या कामाबद्दल कौतुक करत त्यांनी आपल्या स्वतःच्या आरोग्याविषयी काळजी घेण्याचे आवाहन केले. नागरिकांच्या उत्तम आरोग्याचे गमक तुमच्या कष्टांमुळे व नियमित कचरा उचलण्यात आहे.रक्षाबंधन हा केवळ सण नाही,तर सामाजिक बांधिलकी आहे.जे हात परिसर स्वच्छ ठेवतात त्या हातांना राखी बांधणे हे आमचे कर्तव्य आहे"असे प्रतिपादन यावेळी केले.यावेळी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या कर्वेनगर चे संघचालक उदयन पाठक,जेष्ठ स्वयंसेवक उल्हास सावळेकर,प्रा विवेक मांडके,अरविंद करंबेळकर, महापालिकेचे मनोज साकळे, कृष्णा धनगर, मनोज मोहिते,अमर कांबळे,दत्ता दोडके,ओंकार बेनकर,दीपक भोंडे,दत्तात्रय जगताप,निखिल भिसे,गौरव अडगळे,नगरसेविका ॲड मिताली सावळेकर,वेदांत गवळेकर,सह्याद्री प्रभात शाखेचे सह शिक्षक प्रकाशदेशपांडे ह्यांची मुख्य उपस्थिती होती.ह्यावेळी उदयन पाठक म्हणाले," राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या शताब्दी वर्षानिमित्त "पंच परिवर्तन"दारे विविध सामाजिक सेवा प्रकल्प संपूर्ण देशभर संघ राबवित असल्याचे सांगितले. "सामाजिक रक्षाबंधन"द्वारे राष्ट्रीय स्वयंसेवक संघ समाजातील सर्व घटकांना जोडण्याचे कार्य देशभर करीत आहे." यावेळी महिला व पुरुष मिळून एकूण साठ कचरावेचक,कर्वेनगर,शैलेश मधील व्यावसायिक,नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सोलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया २०२६ अंतिम टप्प्यात

**पुणे : दैनिक संध्या**




डिव्हाईन सोलिटेअर्सचा प्रमुख वार्षिक ग्राहक महोत्सव ‘द सोलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया’ (TSFI) २०२६ आता अंतिम आठवड्यात दाखल झाला आहे. १ ऑगस्टपासून देशभरातील २०० हून अधिक भागीदार ज्वेलरी स्टोअर्सच्या माध्यमातून सुरू असलेल्या या महोत्सवाला ग्राहकांचा चांगला प्रतिसाद मिळत असून, अंतिम टप्प्यात डिव्हाईन सोलिटेअर्सने आणखी आकर्षक उत्सवी ऑफर्स जाहीर केल्या आहेत. २७ आणि २८ ऑगस्ट रोजी खरेदी करणाऱ्या ग्राहकांना त्यांच्या निश्चित भेटवस्तूंवर विशेष अपग्रेड मिळणार आहे. याशिवाय आपल्या दागिन्यांना वैयक्तिक स्पर्श देऊ इच्छिणाऱ्या ग्राहकांसाठी नावाचे आद्याक्षर कोरण्याची सुविधा कोणत्याही अतिरिक्त शुल्काशिवाय उपलब्ध करून देण्यात आली आहे. सामान्यतः या प्रकारच्या कोरीव कामासाठी सुमारे ₹२,५०० ते ₹३,००० खर्च येतो. मात्र, या विशेष ऑफरअंतर्गत ग्राहकांना ही सेवा मोफत मिळणार आहे. ‘द सोलिटेअर फेस्टिव्हल ऑफ इंडिया’दरम्यान सहभागी भागीदार स्टोअर्समधून डिव्हाईन सोलिटेअर्सचे दागिने खरेदी करणाऱ्या ग्राहकांना निश्चित भेटवस्तू मिळणार आहेत. त्याचबरोबर ग्राहकांना साप्ताहिक लकी ड्रॉमध्ये सहभागी होण्याची संधी मिळेल.

## वडगाव निंबाळकर येथे ईद-ए-मिलादुन्नबी उत्साहात साजरा

**वडगाव निंबाळकर : दैनिक संध्या**

■ भालदार कुटुंबाकडून शालेय विद्यार्थ्यांना अल्पोपहार वाटप

ईद-ए-मिलादुन्नबीच्या निमित्ताने वडगाव निंबाळकर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा १ आणि २ मध्ये मोहम्मद पैगंबर (स.अ.स.) यांच्या १५०१ व्या जयंतीनिमित्त विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले.यावेळी फिरोज भालदार आणि भालदार कुटुंबीयांच्या वतीने शाळेतील विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. मोहम्मद पैगंबर (स.अ.स.) यांच्या जयंतीचे औचित्य साधून विद्यार्थ्यांमध्ये प्रेम,बंधुभाव,एकोपा आणि मानवतेची भावना वृद्धिंगत करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला.भालदार कुटुंबीयांच्या या सामाजिक उपक्रमाचे शाळेतील शिक्षक,विद्यार्थी आणि उपस्थित मान्यवरांनी कौतुक केले. या उपक्रमाद्वारे विद्यार्थ्यांना अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले.धार्मिक सण-उत्सवांच्या माध्यमातून समाजात आपुलकी, सद्भावना आणि सामाजिक एकतेची भावना दृढ व्हावी,असा संदेश यावेळी देण्यात आला. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे वातावरण निर्माण झाले.सामाजिक बांधिलकी जपत फिरोज भालदार आणि भालदार कुटुंबीयांनी राबविलेल्या या उपक्रमाचे परिसरातून स्वागत होत आहे.

## आर. बी. होरांगी व सेंट फेलिक्सच्या खेळाडूंची चमकदार कामगिरी

**पुणे : दैनिक संध्या**



हैदराबाद येथे नुकत्याच पार पडलेल्या पहिल्या आंतरराष्ट्रीय ‘ओपन वर्ल्ड तायक्वांदो चॅम्पियनशिप’मध्ये पुण्यातील आर. बी. होरांगी तायक्वांदो दो-जांग असोसिएशन आणि सेंट फेलिक्स हायस्कूलच्या खेळाडूंनी दमदार कामगिरी करत एकूण १५ सुवर्ण, ११ रौप्य आणि दोन कांस्यपदकांची कमाई केली. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आर. बी. होरांगी तायक्वांदो दो-जांग असोसिएशनला आयोजकांच्या वतीने ‘सर्वोत्कृष्ट तायक्वांदो संघ’ या पुरस्काराने गौरविण्यात आले. या स्पर्धेत क्रिश केडगोनी याने पूमसेमध्ये सुवर्ण व क्योरुगीमध्ये रौप्यपदक मिळविले. रायन नोरोन्हा याने क्योरुगीमध्ये सुवर्ण व पूमसेमध्ये रौप्यपदक पटकावले. स्वराज धनमेहेर याने पूमसेमध्ये सुवर्ण व क्योरुगीमध्ये रौप्यपदक मिळविले. नव्या विश्वकर्मा हिने स्पीड पंच व स्पीड किकमध्ये सुवर्णपदक तसेच पूमसेमध्ये कांस्यपदक मिळविले. आयुषी गाडे हिने क्योरुगीमध्ये रौप्य व पूमसेमध्ये कांस्यपदक पटकावले. सिमांतिका पवार हिने स्पीड किकमध्ये सुवर्ण, तर पूमसे व स्पीड पंचमध्ये रौप्यपदक मिळविले. युगांतिका पवार हिने पूमसे, स्पीड किक आणि स्पीड पंच या तिन्ही प्रकारांत सुवर्णपदकांची कमाई केली. अमेरा शेख हिने स्पीड पंचमध्ये सुवर्ण, स्पीड किकमध्ये रौप्य आणि पूमसेमध्ये कांस्यपदक मिळविले.

# वीर शिवराज मंडळ ट्रस्टने पटकावला संजीवनी करंडक

### संजीवनी मित्र मंडळाच्या सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धेचा पारितोषिक वितरण समारंभ उत्साहात

■ पुणे (दै. संध्या)




संजीवनी मित्र मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या ‘संजीवनी करंडक सार्वजनिक गणेशोत्सव देखावा स्पर्धा २०२५’ चा पारितोषिक वितरण समारंभ शिवदर्शन येथील स्व. राजीव गांधी ई-लर्निंग प्रेक्षागृहात उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. स्पर्धेतील मानाचा ‘संजीवनी करंडक’ वीर शिवराज मंडळ ट्रस्टने पटकावला.

या कार्यक्रमास संजीवनी मित्र मंडळाचे अध्यक्ष संजय विद्वांस, कसबा गणपती मंडळाचे अध्यक्ष श्रीकांत शेटे, ज्येष्ठ शिल्पकार विवेक खटावकर, सेवा मित्र मंडळाचे अध्यक्ष शिरीष मोहिते, आदर्श मंडळाचे अध्यक्ष उदय जगताप, साईनाथ मंडळ ट्रस्टचे अध्यक्ष पियूष शहा, दर्शन मित्र मंडळाचे अध्यक्ष गणेश घोश, नगरसेवक महेश वाबळे, शिवव्याख्याते सौरभ कर्डे, राजेंद्र भिडे यांच्यासह विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. प्रास्ताविकात संजीवनी मित्र मंडळाचे अध्यक्ष संजय विद्वांस यांनी मंडळाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रमांची माहिती दिली. सार्वजनिक गणेशोत्सवातील देखाव्यांच्या माध्यमातून कलात्मकता, सामाजिक प्रबोधन आणि सांस्कृतिक मूल्यांना व्यासपीठ मिळावे, या उद्देशाने स्पर्धेचे आयोजन करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. कार्यक्रमाच्या पूर्वार्धात नटरंग संस्थेच्या कलाकारांनी ‘त्रिपुंड’ या कार्यक्रमाची प्रभावी भरतनाट्यम प्रस्तुती सादर केली. कलावंतांच्या उत्कृष्ट सादरीकरणाला उपस्थितांनी उत्स्फूर्त दाद दिली. यावेळी श्रीकांत शेटे यांनी संजीवनी मित्र मंडळाच्या सामाजिक व सांस्कृतिक कार्याचे कौतुक केले. सार्वजनिक गणेशोत्सवाच्या माध्यमातून समाजप्रबोधनासोबतच कला आणि संस्कृतीला प्रोत्साहन देण्याचे काम मंडळ सातत्याने करत असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच स्पर्धेत सहभागी झालेल्या सर्व गणेश मंडळांचे आणि विजेत्यांचे अभिनंदन केले. स्पर्धेतील विजेत्या मंडळांना एकूण दीड लाख रुपयांची पारितोषिके, स्मृतिचिन्हे आणि प्रशस्तिपत्रे देऊन गौरविण्यात आले. याशिवाय स्पर्धेतील विशेष पुरस्कारांमध्ये सर्वोत्तम दिग्दर्शक – गणेश लोणारे, सर्वोत्तम संहिता लेखन – पियूष शहा आणि सर्वोत्कृष्ट कला दिग्दर्शक – क्षितीज रंधीर यांचा विशेष सन्मान करण्यात आला. पारितोषिक वितरण सोहळ्यास विविध गणेश मंडळांचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि कलाप्रेमी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यकर्त्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण कार्यक्रमाला उत्साहाचे आणि जल्लोषाचे वातावरण लाभले. गणेशोत्सवातील देखाव्यांच्या माध्यमातून सामाजिक संदेश, कलात्मक अभिव्यक्ती आणि महाराष्ट्राची सांस्कृतिक परंपरा जपण्याबरोबरच नव्या पिढीतील कलाकारांना प्रोत्साहन देण्याचा संजीवनी मित्र मंडळाचा हा उपक्रम उल्लेखनीय ठरला.

## द वेल्थ कंपनी म्युच्युअल फंडकडून मल्टी कॅप फंड लॉँच

■ पुणे (दै. संध्या)

The Wealth Company MUTUAL FUND

■ बाजारपेठेतील सर्व चक्रांमधील संधींचा फायदा घेण्यावर भर

■ एनएफओ २७ ऑगस्ट २०२६ रोजी खुला होणार आणि १० सप्टेंबर २०२६ रोजी बंद होणार

द वेल्थ कंपनी म्युच्युअल फंड या पॅन्टोमॅथ ग्रुपचा भाग असलेल्या कंपनीने आज द वेल्थ कंपनी मल्टी कॅप फंड लॉँच करण्याची घोषणा केली. ही एक ओपन-एंडेड इक्विटी योजना आहे, जी दीर्घकालीन भांडवली वाढ मिळवण्याच्या उद्दिष्टाने लार्ज कॅप, मिड कॅप आणि स्मॉल कॅप शेअर्समध्ये गुंतवणूक करते. हा न्यू फंड ऑफर २७ ऑगस्ट २०२६ रोजी खुला होईल आणि १० सप्टेंबर २०२६ रोजी बंद होईल. त्यानंतर २१ सप्टेंबर २०२६ पासून ही योजना सातत्यपूर्ण व्यवहारांसाठी पुन्हा खुली केली जाईल. हा फंड एका सोप्या तत्त्वावर आधारित आहे: प्रत्येक मार्केट-कॅप विभागाचे पोर्टफोलिओमध्ये विशिष्ट स्थान असते, कारण आर्थिक आणि बाजारपेठेच्या चक्रानुसार प्रत्येक विभाग वेगवेगळा सहभाग नोंदवतो. मल्टी कॅप फंडाला लार्ज कॅप, मिड कॅप आणि स्मॉल कॅप इक्विटीमध्ये प्रत्येकी किमान २५ टक्के गुंतवणूक राखणे बंधनकारक असते. द वेल्थ कंपनी मल्टी कॅप फंडचा या तिन्ही मार्केट-कॅप विभागांमध्ये प्रत्येकी २५ टक्के ते ५० टक्क्यांच्या दरम्यान अंदाजित अलॉकेशन रेंज असेल, ज्यामुळे गुंतवणूक टीमला नियामक चौकटीत राहून बाजारपेठेतील उत्तम संधी शोधण्याची स्थिरता मिळते.

## देशाचे रक्षण करणाऱ्या सैनिकांच्या हातावर प्रेमाची राखी

*श्री शिवाजी मित्र मंडळ व साईनाथ मंडळ ट्रस्टतर्फे भारतीय जवानांप्रति कृतज्ञता व्यक्त करणारा रक्षाबंधन सोहळा उत्साहात*

■ पुणे (दै. संध्या)



देशाच्या सीमा सुरक्षित ठेवण्यासाठी ऊन, वारा, पाऊस आणि कडाक्याची थंडी यांची पर्वा न करता अहोरात्र कर्तव्य बजावणाऱ्या भारतीय जवानांच्या मनगटावर प्रेम, आपुलकी आणि कृतज्ञतेचा रेशीम धागा बांधत रक्षाबंधनाचा अनोखा सोहळा उत्साहात पार पडला. श्री शिवाजी मित्र मंडळ आणि साईनाथ मंडळ ट्रस्ट यांच्या वतीने आयोजित या उपक्रमातून जवानांप्रति आदर आणि देशवासीयांच्या भावनिक नात्याची प्रचिती आली.

जवानांना आपल्या कुटुंबापासून दूर राहावे लागू नये, त्यांना बहिणीच्या प्रेमाची आणि आपुलकीची उणीव भासू नये, या भावनेतून या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. मंडळाच्या माध्यमातून महिला, तरुणी आणि विद्यार्थिनींनी जवानांच्या मनगटावर राख्या बांधून त्यांचे औक्षण केले. यावेळी अनेक भगिनींचे डोळे भावनेने पाणावले, तर जवानांच्या चेहऱ्यावरही आपुलकीचा आनंद दिसून आला.

या प्रसंगी ज्येष्ठ गायिका अनुराधा मराठे यांनी ‘ये मेरे वतन के लोगो’ हे देशभक्तिपर गीत सादर केले. तर गायक राजेश दातार यांनी ‘फुलों का तारों का, सबका कहना है’ हे रक्षाबंधनाचे लोकप्रिय गीत सादर केले. या भावस्पर्शी गीतांनी उपस्थित वातावरण भारावून गेले. गीत ऐकताना अनेक सैनिक आणि उपस्थितांच्या डोळ्यांत अश्रू तरळले.

“देशाचे रक्षण करणारा प्रत्येक सैनिक हाच आमचा खराखुरा भाऊ आहे,” अशी भावना यावेळी एका विद्यार्थिनीने व्यक्त केली. या उपक्रमातून केवळ जवानांच्या मनगटावर राखी बांधली गेली नाही, तर संपूर्ण देश आपल्या वीर जवानांच्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याचा भावनिक संदेशही देण्यात आला. या आगळ्यावेगळ्या उपक्रमाचे उपस्थितांनी कौतुक केले. त्यामुळे परिसरात देशभक्ती, आपुलकी आणि बंधुभावाचे वातावरण निर्माण झाले होते.

या उपक्रमासाठी ॲडमिन ऑफिसर मेजर प्रमोद जोशी तसेच सब मेजर यू. पी. शुक्ला यांचे विशेष सहकार्य लाभले. त्यांच्या योगदानाबद्दल आयोजकांच्या वतीने छत्रपती शिवाजी महाराजांचे चित्र, सन्मानपत्र आणि भेटकार्ड देऊन त्यांचा गौरव करण्यात आला.

यावेळी शिवव्याख्याते सौरभ कर्डे, ऋत्विक अद्मुलवार, गंधाली शाह, उमेश शेवते, पूजा कर्डे, आनंदी शेवते आदी उपस्थित होते. साईनाथ मंडळ ट्रस्टचे पीयूष शाह आणि श्री शिवाजी मित्र मंडळाचे प्रल्हाद भाऊ थोरात यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले. पीयूष शाह यांनी प्रास्ताविक करून उपस्थितांचे आभार मानले.

## पुण्यात १ ते ३ सप्टेंबरदरम्यान ‘उर्गेन आर्ट फेस्टिव्हल’

■ पुणे (दै. संध्या)



**कला, साहित्य आणि कलेच्या प्रत्यक्ष प्रात्यक्षिकाचा बहारदार मेळावा**

करुणादिप फाउंडेशन आणि त्रिरत्न वैरोचना सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने येत्या १ ते ३ सप्टेंबरदरम्यान पुण्यात ‘ उर्गेन आर्ट फेस्टिव्हल २०२६’ आयोजित करण्यात आला आहे. या तीन दिवसीय महोत्सवात चित्रप्रदर्शने, ध्यान कार्यशाळा, कलाकार व साहित्यिक परिसंवाद, चित्रपट प्रदर्शन तसेच विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती माजी चीफ मेडिकल ऑफिसर, डिफेन्स इस्टेट, इंडिया, संस्थापक करुणादीप फाऊंडेशन आणि उर्गेन आर्ट ग्लोबल डॉ. जीवक (व्ही. डी. गायकवाड) यांनी पत्रकार परिषदेत दिली. यावेळी डॉ अस्मिता गायकवाड, डायरेक्टर फोर्टरिया आणि उपाध्यक्षा करुणादीप फाऊंडेशन, जागतिक कीर्तीचे चित्रकार सविंद्र सावरकर आणि कलादिग्दर्शक संतोष संखद आदि मान्यवर उपस्थित होते. ‘उर्गेन आर्ट फेस्टिव्हल २०२६’ बद्दल अधिक माहिती देताना आयोजकांनी सांगितले की, महोत्सवाचे उद्घाटन १ सप्टेंबर रोजी बालगंधर्व कलादालन येथे सकाळी १० वाजता होणार असून, ज्येष्ठ चित्रकार सवी सावरकर यांच्या चित्रप्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात येणार आहे. या प्रसंगी विद्यापीठ अनुदान आयोगाचे माजी अध्यक्ष पद्मश्री डॉ. सुखादेव थोरात, अभिनेते किरण माने आणि ज्येष्ठ पत्रकार राजू परूळेकर यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दुपारी ३:०० वाजता चित्रकलेचे प्रत्यक्ष प्रात्यक्षिक होईल तर सायंकाळी 5 वाजता 'शिवाजी अंडरग्राऊंड इन भीमनगर मोहल्ल' या नाटकाचं प्रयोग होणार आहे. फेस्टिव्हल मध्ये २ सप्टेंबर रोजी सकाळी 10 वाजता ध्यान कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यानंतर ‘कलाकार परिसंवाद’ होणार असून त्यात पद्मश्री सुधारक ओलवे, मोगाल्लान श्रावस्ती, सवी सावरकर, संजय जीवने सहभागी होणार आहेत. दुपारी ३:०० वाजता शिल्पकलेचे प्रदर्शन होईल तर सायंकाळी 5 वाजता क्रांतीमा आणि कबीर या नाटीकांचे सादरीकरण होणार आहे.

३ सप्टेंबर रोजीही सकाळी 10 वाजता ध्यान कार्यशाळा होईल त्यानंतर साहित्यिक परिसंवाद आयोजित करण्यात आला असून, पद्मश्री ग्रंवाग संपतेन, डॉ. विमलताई एस. थोरात, शाहीर संभाजी भगत यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. दुपारी ३:०० वाजता कॅलिग्राफी प्रदर्शन होईल तर सायंकाळी 5 वाजता स्टोरी शिवराज्याभिषेकाची या नाटकाचे सादरीकरण होणार आहे. बालगंधर्व मंदिर परिसरातील विविध सभागृहांमध्ये हा महोत्सव पार पडणार असून, कला, साहित्य, चित्रपट आणि नाट्य क्षेत्रातील रसिकांसाठी हा महोत्सव पर्वणी ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले. नाटकांसाठी विनामूल्य प्रवेशिका १ ते ३ सप्टेंबरदरम्यान सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत बालगंधर्व कलादालन येथे नोंदणी पश्चात उपलब्ध होतील. नोंदणी संकेत स्थळ https://urgyenartglobal.com/register/ आहे.

## राखी २०२६च्या खरेदीत मीशोवर ३६% वाढ; नॉन-मेट्रो भारताचा ७३% वाटा

■ पुणे (दै. संध्या)

■ लहान शहरांमधील ग्राहकांचा वाढता सहभाग; विक्रेत्यांच्या संख्येत ७२% वाढ, पर्सनलाइज्ड राख्यांनाही पसंती

meesho

यंदाच्या राखी सणानिमित्त ऑनलाइन खरेदीला मोठी चालना मिळाली असून, मीशोवरील राखीच्या ऑर्डर्समध्ये मागील वर्षाच्या तुलनेत तब्बल ३६ टक्के वाढ झाली आहे. गेल्या महिनाभरातील राखी शॉपिंग कालावधीत प्लॅटफॉर्मच्या ग्रॉस मर्चेंडाइज व्हॅल्यू (GMV) मध्येही सुमारे ३८ टक्के वाढ नोंदवण्यात आली. विशेष म्हणजे, या वाढीत देशातील मोठ्या महानगरांपेक्षा नॉन-मेट्रो शहरांचा मोठा वाटा राहिला. मीशोवरील राखीच्या एकूण ऑर्डर्सपैकी सुमारे ७३ टक्के ऑर्डर्स नॉन-मेट्रो बाजारपेठांमधून आल्या. टियर-३ आणि टियर-४ शहरांमध्ये सर्वाधिक वेगाने वाढ झाल्याने सणासुदीच्या ऑनलाइन खरेदीचा विस्तार आता लहान शहरांपर्यंत पोहोचल्याचे चित्र आहे. उत्तर प्रदेशातील दादरी या लहान औद्योगिक शहराने राखीच्या ऑर्डर्समध्ये सुमारे १०५ टक्के वार्षिक वाढ नोंदवत आघाडी घेतली. त्यानंतर ओडिशातील नबरंगपूर, तसेच कासगंज, धमतरी आणि मध्य प्रदेशातील नैनपूर या शहरांमध्येही राखीच्या खरेदीत लक्षणीय वाढ झाली. राखीच्या ऑनलाइन खरेदीत ग्राहकांच्या पेमेंट पद्धतीतही सकारात्मक बदल दिसून आला. मीशोवरील तब्बल ५८ टक्के राखी ऑर्डर्स प्रीपेड पद्धतीने करण्यात आल्या. ऑनलाइन व्यवहारांबाबत ग्राहकांचा वाढता विश्वास आणि डिजिटल पेमेंटचा वाढता स्वीकार याचे हे संकेत मानले जात आहेत. राखीच्या वाढत्या मागणीचा फायदा लहान व्यावसायिक आणि उद्योजकांनाही झाला. मीशोवर राखीशी संबंधित उत्पादने विकणाऱ्या विक्रेत्यांच्या संख्येत वार्षिक ७२ टक्के वाढ झाली. नव्या विक्रेत्यांनी आपल्या उत्पादनांच्या कॅटलॉगमध्ये विविध पर्यायांचा समावेश करत देशभरातील सणासुदीच्या मागणीचा लाभ घेतला. डिझाइन आणि फॉरमॅटमध्ये अनेक नवे पर्याय बाजारात आले असले तरी पारंपरिक राख्यांची मागणी कायम राहिली. यंदा ग्रीटिंग कार्डसोबत मिळणारा ब्रेसलेट-स्टाइल राखी सेट सर्वाधिक विक्री झालेल्या उत्पादनांपैकी एक ठरला.

# ‘अरुण फिरोदिया, मि. आर अँड डी : द वे अहेड’ पुस्तकाचे अनावरण

■ पुणे (दै. संध्या)



नाविन्य (इनोव्हेशन), तंत्रज्ञान आणि उद्योजकता या क्षेत्रांतील प्रेरणादायी प्रवासाचा वेध घेणारे, सुश्री तारा डोड्डीहाल यांनी लिहिलेले 'अरुण फिरोदिया - मिस्टर आर अँड डी, द वे अहेड...' (Arun Firodia - Mr. R&D, The Way Ahead...) हे पुस्तक बुधवारी, २६ ऑगस्ट २०२६ रोजी पुण्यात प्रसिद्ध करण्यात आले. हे पुस्तक प्रसिद्ध अणुशास्त्रज्ञ, अणुऊर्जा आयोगाचे माजी अध्यक्ष आणि भाभा अणुसंशोधन केंद्राचे (BARC) माजी संचालक डॉ. अनिल काकोडकर यांच्या हस्ते प्रकाशित झाले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रसिद्ध शास्त्रज्ञ आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांचे तज्ज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर होते; ते 'काउन्सिल ऑफ सायंटिफिक अँड इंडस्ट्रियल रिसर्च'चे (CSIR) माजी महासंचालक आणि 'नॅशनल केमिकल लॅबोरेटरी'चे (NCL) माजी संचालक आहेत. हा कार्यक्रम पुणे येथील सेनापती बापट रोडवरील 'एमसीसीआयए' (MCCIA) ट्रेड टॉवर 'ए' येथे आयोजित करण्यात आला होता. 'अरुण फिरोदिया, मिस्टर आर अँड डी: द वे अहेड' हे पुस्तक पद्मश्री डॉ. अरुण फिरोदिया यांचे जीवन, त्यांचे विचार आणि नाविन्यपूर्ण प्रवासाचा आढावा विविध कथा व अनुभवांच्या माध्यमातून घेते. हे पुस्तक गतिशीलता (मोबिलिटी), शाश्वतता, ग्रामीण विकास आणि उद्योजकता या क्षेत्रांतील त्यांचे कार्य व दृष्टिकोन मांडते. तसेच, कुतूहल, प्रयोगशीलता आणि 'का नाही?' (why not) अशी सकारात्मक वृत्ती कशा प्रकारे अर्थपूर्ण नाविन्यपूर्ण बदलांना जन्म देऊ शकते, यावर यात प्रकाश टाकण्यात आला आहे. मर्यादांमध्येही संधी शोधणे आणि तंत्रज्ञान व उद्योजकतेला एका व्यापक सामाजिक उद्देशाशी जोडणे, यासाठी तरुण संशोधक, विद्यार्थी, उद्योजक आणि भावी नेत्यांना प्रेरित करण्याचा उद्देश या पुस्तकाचा आहे. 'कायनेटिक ग्रुप'चे अध्यक्ष आणि पद्मश्री पुरस्कार विजेते डॉ. अरुण फिरोदिया हे भारतातील सर्वसामान्यांपर्यंत परवडणारी गतिशीलता (मोबिलिटी) पोहोचवण्यासाठी ओळखले जातात. आयआयटी (IIT) बॉम्बे आणि एमआयटी (MIT), अमेरिका येथील माजी विद्यार्थी असलेल्या डॉ. फिरोदिया यांनी भारतातील अत्यंत यशस्वी अशा स्वदेशी मोबिलिटी उत्पादनांपैकी एक असलेल्या 'लूना'च्या (Luna) निर्मितीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. तसेच, भारतीय दुचाकी उद्योगातील तांत्रिक नवोपक्रमांमध्येही त्यांनी मोठे योगदान दिले आहे.

या पुस्तकाच्या लेखिका सुश्री तारा डोड्डीहाल यांच्याकडे धोरण (स्ट्रॅटेजी) आणि संवाद (कम्युनिकेशन्स) या क्षेत्रांतील तीन दशकांहून अधिक काळाचा आंतरराष्ट्रीय अनुभव आहे.

दैनिक संध्या
शनिवार, दि. २९ ऑगस्ट २०२६



## थोडक्यात पण महत्वाचे

### रिक्षाचालकांच्या प्रश्नांवर सरकारचा 'मिटर' बंद नाही; परिवहन मंत्री प्रताप सरनाईक

**मुंबई : दै. संध्या**

रिक्षाचालकांच्या प्रश्नांवर सरकार संवेदनशील असून, त्यांच्या हिताचे निर्णय घेण्यासाठी परिवहन विभाग कटिबद्ध असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले आहे. रिक्षाचालकांच्या प्रश्नांबाबत खासदार संजय राऊत यांनी पाठवलेल्या पत्राला उत्तर देताना सरनाईक यांनी हे स्पष्टीकरण दिले.'रॅपिडो'च्या माध्यमातून बाईक टॅक्सी सेवा सुरू करण्याच्या निर्णयामुळे हजारो रिक्षाचालकांच्या रोजगारावर संकट येऊ शकते, अशी चिंता राऊत यांनी व्यक्त केली होती. त्यावर सरनाईक यांनी रिक्षा आणि टॅक्सीचालकांच्या कल्याणासाठी सरकारने अनेक निर्णय घेतले असून पुढेही निर्णय घेतले जातील, असे सांगितले. 'रॅपिडो'चा उल्लेख करताना सरनाईक यांनी स्पष्ट केले की, रॅपिडो असो किंवा कोणतीही अन्य कंपनी-सर्व सरकारपेक्षा मोठी नाही. कोणत्याही कंपनीला नियमांपेक्षा वरचे स्थान दिले जाणार नाही. बदलत्या वाहतूक व्यवस्थेत पारंपरिक रिक्षाचालकांचा रोजगार सुरक्षित ठेवणे, त्यांना सामाजिक सुरक्षा देणे आणि व्यवसाय सक्षम करणे हीदेखील सरकारची जबाबदारी असल्याचे त्यांनी नमूद केले. रिक्षाचालकांच्या प्रश्नांवर चर्चा करण्यासाठी रिक्षाचालक संघटनेच्या शिष्टमंडळासोबत भेटण्याची तयारीही सरनाईक यांनी दर्शवली आहे. तसेच, रिक्षाचालकांच्या नावावर राजकारण करण्यापेक्षा त्यांच्या प्रत्यक्ष प्रश्नांवर एकत्र बसून मार्ग काढणे अधिक उपयुक्त ठरेल, असे त्यांनी म्हटले. रिक्षाचालकांच्या मोर्चाचा संदर्भ देताना सरनाईक यांनी आंदोलन हा लोकशाहीचा अधिकार असल्याचे मान्य केले. मात्र आंदोलनाला परवानगी नाकारली असल्यास त्यामागील प्रशासकीय कारणांची तपासणी आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. रस्त्यावरील वाहतूक आणि लोकशाहीची वाहतूक सुरळीत ठेवण्याची जबाबदारी सरकारची असल्याचेही त्यांनी नमूद केले. "रिक्षाचालकांच्या प्रश्नांवर सरकारचा 'मिटर' बंद नाही आणि कोणत्याही कंपनीसाठी तो 'फ्री'ही नाही. नियम सर्वांसाठी समान आहेत," असा स्पष्ट संदेश सरनाईक यांनी दिला. रिक्षाचालकांच्या हिताचे संरक्षण करण्यासाठी परिवहन विभाग कटिबद्ध असल्याचे त्यांनी पत्रातून स्पष्ट केले.

### मोकळ्या जागा हडप करण्याविषयी शिवसेना उबाठाचे आंदोलन

**मुंबई : दै. संध्या**

मुंबईतील मोकळ्या जागा आणि मैदाने हडपण्याच्या विरोधात शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाने युवासेनाप्रमुख आदित्य ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली रविवारी २३ ऑगस्ट २०२६ रोजी वांद्रे येथील नेव्हील डिसूझा मैदानात 'तिरंगा आंदोलन' केले. या आंदोलनात ईशान्य मुंबई उबाठाच्या महिला रणरागिणी आमदार सुनील राऊत व महिला विभाग संघटिका रश्मी पहुडकर यांच्या नेतृत्वात अग्रभागी होत्या.यामध्ये वंदना बेंद्रे,लिना सुर्यवंशी, दर्शना आडिवरेकर आसावरी भोईटे,अनघा थळी आदींचा समावेश होता. गेल्या चार वर्षांत मुंबईतील तब्बल १७ ते १८ मैदानांचे आरक्षण बदलून ते भूखंड भाजपशी संबंधित संस्थांना व खासगी व्यक्तींना देण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा गंभीर आरोप आदित्य ठाकरे यांनी केला. भाजप नेत्याच्या ट्रस्टला म्हाडाचे तीन भूखंड लिलावात किंवा लीजवर दिल्याचा दावा करण्यात आला. महायुती सरकार आणि भाजपवर मुंबईचे भविष्य आणि खेळाडूंच्या हक्काच्या मोकळ्या जागा धुळीला मिळवल्याचा आरोप करत त्यांना 'रेड कार्ड' दाखवण्याचा इशारा देण्यात आला. मोकळ्या जागा पुन्हा मिळवण्यासाठी गरज पडल्यास मुंबई महानगरपालिका कार्यालयाबाहेर धरणे आंदोलन करण्याचा इशारा नेत्यांनी दिला आहे.

### रूपाली कांडगे यांची विद्यार्थी सुरक्षा समिती प्रमुख पदी नियुक्ती

**चाकण : दै. संध्या**

जनता शिक्षण संस्थेच्या येथील श्री शिवाजी प्राथमिक विद्यामंदिर व नेहरू बालक मंदिर या प्रशालेतील विद्यार्थी सुरक्षा समिती, सखी सावित्री समिती आणि



भौतिक सुविधा विकसन समितीच्या प्रमुख पदी चाकण नगरपरिषदेच्या महिला बाल कल्याण समितीच्या सभापती तथा नगरसेविका रूपाली राहुल कांडगे यांची अधिकृत निवड करण्यात आली. प्रशालेतील विद्यार्थ्यांचे सुरक्षा कवच अधिक बळकट करणे, शालेय वातावरणात मुलींच्या तक्रारी व विकासासाठी सखी सावित्री समिती प्रभावीपणे राबवणे आणि डिजिटल व भौतिक सुविधांचा दर्जा उंचावणे, या हेतूने रूपाली कांडगे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. शाळेच्या मुख्याध्यापिका माधुरी कोळी यांच्या हस्ते कांडगे यांना नियुक्त पत्र देऊन सन्मानित करण्यात आले. स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून त्यांचा प्रशासकीय अनुभव शाळेच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अत्यंत फायदेशीर ठरेल, असा विश्वास या प्रसंगी व्यक्त करण्यात आला. शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांची सुरक्षितता आणि त्यांना मिळणाऱ्या भौतिक सुविधा हा माझ्या प्राधान्याचा विषय असेल. मुलांच्या उज्ज्वल भविष्यासाठी आणि शाळेच्या विकासासाठी मी पूर्ण ताकदीने कार्यरत राहीन, रूपाली कांडगे, नगरसेविका, यांनी सांगितले.

### वडापावची चर्चा अन् नाशिक-पुणे रेल्वेचा मुद्दा!

**मुंबई: दै. संध्या**

केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी जागतिक वडापाव दिनानिमित्त सोशल मीडियावर वडापावसोबत लसूण चटणी की तळलेली मिरची, असा प्रश्न विचारत पोस्ट केली. या पोस्टला प्रतिक्रिया देताना आमदार सत्यजीत तांबे यांनी पुणे-नाशिक सेमी हायस्पीड रेल्वेचा मुद्दा पुन्हा एकदा मांडला. 'लसूण चटणी किंवा तळलेली मिरची? दोन्हीपैकी काहीही चालेल. फक्त पुणे-नाशिक हायस्पीड रेल्वेत हा वडापाव खाण्याची संधी मिळाली पाहिजे. यासाठीच आम्ही अनेक वर्षांपासून उपाशी आहोत,' अशी मिश्कील प्रतिक्रिया तांबे यांनी दिली. मात्र, या प्रतिक्रियेतून त्यांनी या रेल्वे मार्गाशी जोडलेल्या सर्वसामान्यांच्या भावना प्रभावीपणे मांडल्या. काहींसाठी वडापाव ही मौजमजा असेल पण, रेल्वेच्या अभावामुळे घरापासून लांब राहणाऱ्या तरूणांसाठी हीच उपजीविका आहे. त्यामुळे पुणे-नाशिक सरळ रेल्वे सेवा सुरू झाल्यास या तरुणांना वेळेत घरी पोहोचून आईच्या हातचे जेवणही करता येईल, अशी भावना मांडत रेल्वेचा प्रश्न केवळ प्रवासापुरता मर्यादित नसल्याचे अधोरेखित केले. नाशिक-पुणे सेमी हायस्पीड रेल्वे संगमनेरमार्गे व्हावी, यासाठी गेल्या काही काळापासून विविध स्तरांवर सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजीत तांबे यांच्यासह नागरिक आणि विविध लोकप्रतिनिधींकडून या मार्गासाठी भूमिका मांडली जात आहे. या मागणीसाठी नुकतेच ९ ऑगस्ट रोजी क्रांतिदिनी नाशिक, संगमनेर, जुन्नर आणि शिरूर येथे जनआंदोलनही झाले. या आंदोलनांमध्ये विविध पक्षांचे लोकप्रतिनिधी आणि नागरिक सहभागी झाले होते. पुणे-नाशिक थेट रेल्वे सेवा सुरू झाल्यास नाशिक, संगमनेर, जुन्नर, आंबेगाव, मंचर, खेड, चाकण आणि पुणे या भागांतील प्रवास अधिक सुलभ होण्यास मदत होऊ शकते. शिक्षण, रोजगार, उद्योग, व्यापार आणि पर्यटनासाठी या मार्गाचा मोठा उपयोग होईल, अशी भूमिका या मागणीच्या पाठपुराव्यातून मांडली जात आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आणि रेल्वे मंत्रालयाकडे संगमनेरमार्गे मार्गाचा विचार व्हावा, यासाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. रेल्वेमंत्र्यांच्या वडापाववरील पोस्टला उत्तर देताना आमदार तांबे यांनी कोणतीही राजकीय टीका न करता आपल्या मतदारसंघातील आणि या भागातील नागरिकांची अपेक्षा एका साध्या आणि भावनिक पद्धतीने मांडली. वडापावच्या निमित्ताने सुरू झालेली ही चर्चा थेट घरच्या जेवणापर्यंत पोहोचली आणि त्यामुळे पुणे-नाशिक रेल्वेचा मुद्दा पुन्हा सोशल मीडियावर चर्चेत आला.

# चिल्ड्रन्स हॉस्पिटलकडून १७५ हून अधिक एपिलेप्सी शस्त्रक्रिया पूर्ण

■ **मुंबई, (दै. संध्या)**

नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलने मुलांमधील औषधांना प्रतिसाद न देणाऱ्या एपिलेप्सीवरील (आकडी येणे) भारतातील एकमेव आणि देशातील सर्वात मोठ्या समर्पित उपक्रमाद्वारे १७५ हून अधिक एपिलेप्सी शस्त्रक्रिया यशस्वीरित्या 200 च्या ट्रॅकवर पूर्ण केल्या आहेत. या हॉस्पिटलमध्ये क्युरेटिव्ह एपिलेप्सी शस्त्रक्रिया झालेल्या रुग्णांपैकी किमान एक वर्षाच्या फॉलो-अपनंतर ८७ टक्के मुलांना आकडी येणे बंद झाले आहे.



भारतातील उपचारांच्या मोठ्या गरजेच्या पार्श्वभूमीवर हा महत्त्वपूर्ण टप्पा गाठला गेला आहे. भारतातील बाल आणि किशोरावस्थेतील लोकसंख्येपैकी अंदाजे ०.८ टक्के व्यक्तींना एपिलेप्सी आजार आहे. एपिलेप्सीने ग्रस्त असलेल्या बहुतांश व्यक्तींमध्ये ही स्थिती बालपणातच विकसित होते. एपिलेप्सीग्रस्त मुलांपैकी सुमारे एक तृतीयांश मुलांना ड्रग-रेजिस्टंट एपिलेप्सी (औषधांना प्रतिसाद न देणारे एपिलेप्सी) असल्याचे स्पष्ट होते, ज्यांच्यासाठी विशेष औषधांना प्रतिसाद न देणाऱ्या एपिलेप्सी केंद्रात वेळेवर उपचार मिळणे अत्यंत महत्त्वाचे ठरते. भारतात जवळपास २ ते ३ दशलक्ष व्यक्ती ड्रग-रेजिस्टंट एपिलेप्सीसह जगत आहेत, ज्यांपैकी सुमारे एक दशलक्ष व्यक्ती एपिलेप्सी शस्त्रक्रियेसाठी पात्र असू शकतात. तरीही, सध्या पात्र असलेल्या दर १,००० रुग्णांपैकी केवळ २ रुग्णांवर शस्त्रक्रिया होते, जी उपचारांमधील असलेली मोठी दरी दर्शवते.

नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलमधील एपिलेप्सी उपक्रम भारतातील चतुर्थ श्रेणीतील बालरोग न्यूरॉलॉजी उप-विशेषज्ञांचा विस्तार करण्याच्या ध्येयाने न्यूरोसायन्सेस विभागाच्या प्रमुख डॉ. अनायता उदवाडिया हेगडे, पीडियाट्रिक न्यूरॉलॉजीच्या सीनियर कंसल्टण्ट डॉ. प्रज्ञा गाडगीळ आणि सीनियर कंसल्टण्ट पीडियाट्रिक न्यूरोसर्जन डॉ. सौरव सामंतराय या डॉक्टरांच्या समर्पित टीमद्वारे सुरू करण्यात आला होता.

नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलच्या न्यूरोसायन्सेस विभागाच्या प्रमुख डॉ. अनायता उदवाडिया हेगडे म्हणाल्या, "भारतात सर्वसमावेशक तृतीयक बालरोग न्यूरोसायन्स सेवांची गरज यापूर्वी कधीही नव्हती इतकी वाढली आहे. लहान मुलांमधील न्यूरोलॉजिकल आजारांमध्ये एपिलेप्सी हा सर्वात जास्त आढळणारा आजार आहे, तरीही विशेष उपचारांची उपलब्धता मर्यादित आहे. समर्पित टीम आणि पायाभूत सुविधांच्या पाठिंब्याशिवाय गुंतागुंतीचे न्यूरॉलॉजी उपचार प्रभावीपणे दिले जाऊ शकत नाहीत. यासाठी प्रबळ संस्थात्मक उपक्रमांची गरज असते, जिथे बहुविद्याशाखीय टीम्स विशेष पायाभूत सुविधा आणि प्रोटोकॉल-आधारित व्यवस्थापनाच्या कार्यसंस्कृतीच्या आधारे एकत्र काम करतात."

नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलच्या कॉम्प्लेक्स पेडियाट्रिक एपिलेप्सी प्रोग्रामच्या प्रमुख डॉ. प्रज्ञा गाडगीळ म्हणाल्या, "अनियंत्रित बालरोग एपिलेप्सी ही अतिशय कठीण परिस्थिती असते. वारंवार आणि अचानक येणाऱ्या आकडीव्यतिरिक्त यामुळे जीवन आणि शरीराला मोठा धोका निर्माण होतो. सततचा अनियंत्रित एपिलेप्सी आणि आकडी येणे कमी करण्यासाठी दिली जाणारी अनेक औषधे यांमुळे मज्जासंस्थेच्या विकासावरही मोठा परिणाम होतो. अशा मुलांवर बऱ्याचदा शस्त्रक्रियेद्वारे उपचार शक्य असतात, जिथे शस्त्रक्रियेमुळे पूर्णपणे आकडी-मुक्त होण्याची शक्यता असते. अचूक प्री-सर्जिकल मूल्यमापनाद्वारे अशा मुलांची वेळेवर ओळख पटवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. इतर मुलांना डिसीज-मॉडिफायिंग एपिलेप्सी शस्त्रक्रियांचा फायदा होऊ शकतो."

नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलचे पीडियाट्रिक न्यूरोसर्जरीचे सीनियर कंसल्टण्ट डॉ. सौरव सामंतराय म्हणाले, "एपिलेप्सी शस्त्रक्रिया म्हणजे अत्यंत विशिष्ट न्यूरोसर्जिकल प्रक्रियांचा समूह आहे, ज्या प्रत्येक मुलासाठी वैयक्तिकरित्या निवडल्या जातात. काही प्रक्रियांचा उद्देश आकडी येण्यासाठी कारणीभूत असलेल्या उती काढून टाकणे, त्यांचा संपर्क तोडणे किंवा मिनिमली इनव्हेसिव्ह पद्धतीने त्या काढून आकडी बंद करणे हा असतो, तर इतरांचा उद्देश पूर्ण उपचार अशक्य असल्यास आकडीची गंभीर तीव्रता कमी करणे हा असतो. योग्यरित्या निवडलेल्या मुलांमध्ये याचे फायदे केवळ आकडी नियंत्रणात आणण्यापुरते मर्यादित राहत नाहीत. एपिलेप्सी पूर्ण बरा होतो किंवा चांगल्या प्रकारे नियंत्रणात येतो, तेव्हा बऱ्याचदा न्यूरोकॉग्निटिव्ह कार्यक्षमतेत सुधारणा होते. त्यामुळे एपिलेप्सी शस्त्रक्रियेचे फायदे केवळ आकडी नियंत्रणात आणण्यापलीकडे जातात. हे परिणाम केवळ एका वैयक्तिक न्यूरोसर्जनद्वारे नाही, तर अनुभवी बहुविद्याशाखीय एपिलेप्सी टीमद्वारे साध्य केले जाऊ शकतात."

या उपक्रमातील खालील केसेस वेळेवर केलेल्या शस्त्रक्रिया मूल्यांकन आणि उपचारांमुळे काय साध्य होऊ शकते हे स्पष्ट करतात: रोहन (नाव बदलले आहे) या सहा वर्षांच्या मुलाला दोन वर्षांचा असताना दररोज ड्रॉप अटॅक्स (अचानक चक्कर येऊन पडणे) येऊ लागले होते. पुढील दोन ते तीन वर्षांत त्याची वाचण्याची, लिहिण्याची आणि इतर मुलांशी संवाद साधण्याची क्षमता कमी झाली.

अनेक औषधे देऊनही त्याचे ड्रॉप अटॅक्स नियंत्रणात न आल्यामुळे त्याच्यावर कॉर्पस कॅलोसोटोमी शस्त्रक्रिया करण्यात आली. दुसऱ्याच दिवशी त्याचे ड्रॉप अटॅक्स पूर्णपणे थांबले. पुढील काही महिन्यांत, फिजिओथेरपी आणि ऑक्युपेशनल थेरपीच्या मदतीने त्याने पुन्हा कविता म्हणणे आणि अक्षरे व अंक लिहिणे सुरू केले.

#### धोका असतानाही तिच्यावर हेमिस्फेरेक्टॉमी शस्त्रक्रिया

एसआरसीसीमधील नवीन मूल्यांकनात त्याच्या मज्जासंस्थेतील जन्मतः असलेला दोष समोर आला, जो दोन दशकांहून अधिक काळ इतरत्र लक्षात आला नव्हता. हा दोष काढून टाकण्यासाठी त्याच्यावर शस्त्रक्रिया करण्यात आली आणि पहिल्याच रात्रीपासून त्याला एकही आकडी आली नाही. जवळपास सहा महिने उलटूनही त्याला आकडी आलेली नाही आणि पुन्हा सामान्य जीवन जगत आहे. रत्नागिरीतील १० वर्षांची मुलगी मिथिला (नाव बदलले आहे) हिला जन्मापूर्वी झालेल्या मेंदूच्या गंभीर दुखापतीमुळे बालपणापासून रोज आकडी येत होती. इतर केंद्रांनी तिच्यावर फारसे काही उपचार होऊ शकत नाहीत असे सांगितले होते. विद्यमान उजव्या बाजूच्या अशक्तपणाची समस्या अधिक वाढण्याचा धोका असतानाही तिच्यावर हेमिस्फेरेक्टॉमी शस्त्रक्रिया करण्यात आली.

## वीजपुरवठा सक्षम करण्यासाठी महावितरणकडून तातडीच्या उपाययोजना



■ **पुणे (दै. संध्या)**

चाकण औद्योगिक क्षेत्रातील ग्राहकांना अखंडित व विश्वासार्ह वीजपुरवठा मिळावा, यासाठी महावितरणने वीज यंत्रणा सक्षम करण्याच्या उपाययोजनांना गती दिली आहे. महावितरणचे संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी शनिवारी (दि. २२) चाकण एमआयडीसी परिसरातील वीजपुरवठा यंत्रणेची प्रत्यक्ष पाहणी करुन आढावा घेतला. तसेच ३३/२२ केव्ही भांबोली आणि ह्युंदाई उपकेंद्रांमध्ये प्रत्येकी १० एमव्हीए क्षमतेची रोहित्रे कार्यान्वित केली. या अतिरिक्त रोहित्रांमुळे चाकण औद्योगिक क्षेत्रातील वीजपुरवठा अधिक सक्षम होण्यास मदत होणार आहे.

ह्युंदाई येथील केंद्र यापूर्वी केवळ स्विचिंग स्टेशन म्हणून कार्यरत होते. वाढत्या औद्योगिक वीजभाराचा विचार करून त्याचे ३३/२२ केव्ही उपकेंद्रात रूपांतर करण्यासाठी मुख्य अभियंत्यांनी पाठपुरावा केला. त्यास संचालक (संचालन) धनंजय औंढेकर यांनी तातडीने मंजुरी दिली. त्यानुसार ह्युंदाई येथील केंद्राचे ३३/२२ केव्ही उपकेंद्रात रूपांतर करून ते कार्यान्वित करण्यात आले. त्याचबरोबर ३३/२२ केव्ही भांबोली उपकेंद्रात अतिरिक्त १० एमव्हीए क्षमतेचे रोहित्र कार्यान्वित करण्यात आले आहे.

चाकण औद्योगिक क्षेत्राचा झपाट्याने होत असलेला विस्तार आणि भविष्यातील वाढती विजेची मागणी लक्षात घेऊन महावितरण व महापारेषणच्या अधिकाऱ्यांनी समन्वयाने कामे गतीने पूर्ण करावीत. भविष्यातील वीज मागणीचे अचूक नियोजन करून औद्योगिक ग्राहकांना विश्वासार्ह व दर्जेदार वीजपुरवठा देण्यासाठी आवश्यक उपाययोजना वेळेत पूर्ण कराव्यात, असे निर्देश धनंजय औंढेकर यांनी क्षेत्रीय अधिकाऱ्यांना दिले. यावेळी महावितरण व महापारेषणचे वरिष्ठ अभियंते उपस्थित होते. महावितरणचे संचालक धनंजय औंढेकर यांनी महापारेषण कंपनीच्या ४०० केव्ही चाकण, २२० केव्ही ब्रिजस्टोन आणि २२० केव्ही चाकण फेज-२ या अतिउच्चदाब उपकेंद्रांचीही पाहणी करून आगामी काळातील वीजपुरवठा नियोजनाचा आढावा घेतला. २२० केव्ही ब्रिजस्टोन उपकेंद्रात ५० एमव्हीए क्षमतेचे रोहित्र नुकतेच कार्यान्वित करण्यात आले आहे. तसेच, ४०० केव्ही चाकण उपकेंद्रात २२ केव्हीचे चार अतिरिक्त 'फिडर बे' उभारण्याचे काम सुरू असल्याची माहिती महापारेषणच्या अभियंत्यांनी दिली. तर २२० केव्ही चाकण फेज-२ उपकेंद्रात अतिरिक्त १०० एमव्हीए क्षमतेचे रोहित्र बसविण्यात येणार असल्याची माहितीही यावेळी देण्यात आली. या उपाययोजनांमुळे चाकण औद्योगिक क्षेत्रातील वाढत्या वीज मागणीची पूर्तता करण्यासाठी महावितरण व महापारेषणची यंत्रणा अधिक सक्षम होणार आहे.



## खड्ड्यांमुळे लागाचा घाट धोकादायक; दुरुस्तीची मागणी

■ **नारायणगाव (दै. संध्या)**

पुणे आणि अहमदनगर या दोन महत्त्वाच्या जिल्ह्यांना जोडणारा प्रमुख जिल्हा मार्ग सध्या दुरवस्थेच्या टोकाला पोहोचला आहे. ओतूर-ब्राह्मणवाडा मार्गावरील आंबेगव्हाण फाटा ते लागाचा घाट दरम्यानचा सुमारे ४ किलोमीटरचा रस्ता खड्ड्यांमुळे अत्यंत धोकादायक झाला आहे. रस्त्याची दुरवस्था इतकी गंभीर आहे की, या मार्गावरून वाहन चालवताना प्रत्येक क्षणी अपघाताचा धोका निर्माण झाला असून, नागरिकांचा प्रवास जीवघेणा ठरत आहे."या रस्त्याची दुरुस्ती होणार तरी कधी?" असा संतप्त सवाल आता स्थानिक नागरिक आणि वाहनधारकांकडून विचारला जात आहे.

लागाच्या घाटातील ४ किलोमीटरच्या अंतरात जागोजागी प्रचंड मोठे आणि खोल खड्डे पडले आहेत. अनेक ठिकाणी रस्त्यावरील डांबर पूर्णपणे उखडले असून केवळ खडी आणि माती उरली आहे. यामुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनचालकांना जीव मुठीत धरून वाहन चालवावे लागत आहे.

रात्रीच्या वेळी हे खड्डे वेळेत न दिसल्यामुळे अनेक छोटे-मोठे अपघात घडत आहेत. अनेक वाहनांचे मोठे नुकसान झाले असून, वाहनांचे चेसिस तुटण्याच्या घटनांमध्ये मोठी वाढ झाली आहे.स्थानिक चाकरमानी, शाळकरी विद्यार्थी, कामगार आणि रुग्णांना या खड्डेमय रस्त्यामुळे रोज मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

ओतूर परिसरात मोठी बाजारपेठ असल्यामुळे या रस्त्यावरून शेतीमाल वाहून नेणारी वाहने, एसटी बसेस, खाजगी वाहने, ऑटोरिक्षा आणि मालवाहू टेम्पो यांची दिवस-रात्र मोठी वर्दळ असते. वाहतुकीच्या दृष्टीने हा अत्यंत महत्त्वाचा आणि व्यस्त मार्ग मानला जातो. मात्र, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अक्षम्य दुर्लक्षामुळे या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झाली आहे. या मार्गाच्या देखभालीकडे पूर्णपणे पाठ फिरवली गेल्याचा आरोप स्थानिक नागरिक करत आहेत. विविध राजकीय पक्षांनी श्रेय घेण्याचा प्रयत्न केला, मात्र प्रत्यक्षात रस्त्याची दुरवस्था कायम राहिली, अशी भावना नागरिकांमध्ये आहे. "आम्हाला आमचा रस्ता तात्काळ दुरुस्त करून द्या," अशी एकमुखी मागणी आता जोर धरू लागली आहे.

## पुण्यात तीन बांगलादेशी घुसखोरांना अटक

■ **पुणे (दै. संध्या)**

शहरात बेकायदा वास्तव्य करणाऱ्या तीन घुसखोर बांगलादेशी नागरिकांना पुणे पोलिसांची विशेष शाखा आणि लष्करी गुप्तचर यंत्रणेने संयुक्त कारवाई करत ताब्यात घेतले. गुरुवारी (ता. २७) दुपारी ही धडक कारवाई करण्यात आली. सोनिया अख्तर, मोतियार गाजी आणि सोनिया मोती पान अशी ताब्यात घेतलेल्या तीन बांगलादेशी नागरिकांची नावे आहेत. पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, लष्करी गुप्तचर यंत्रणेला पुण्यात काही बांगलादेशी नागरिक बेकायदेशीरपणे राहात असल्याची गोपनीय माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे लष्करी गुप्तचर यंत्रणा आणि पोलिसांच्या विशेष शाखेने २७ ऑगस्ट रोजी दुपारी तीन वाजण्याच्या सुमारास अचानक छापा टाकला. पोलिसांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत आणि कागदपत्रांच्या पडताळणीत, या तिघांनीही कोणत्याही वैध परवान्याशिवाय भारतात घुसखोरी केल्याचे आणि ते पुण्यात बेकायदा वास्तव्य करत असल्याचे निष्पन्न झाले आहे.


## पुणे महानगरपालिका

भवन रचना विभाग - निविदा प्रक्रिया कक्ष

निविदा जाहिरात - नविन कामे

१) ई-निविदा विक्री कालावधी : २९/०८/२०२६ दुपारी २.३० वा. वाजेनंतर ते ०७/०९/२०२६ दुपारी २.३० वाजेपर्यंत
२) निविदा स्वीकृती व अंतिम दिनांक व वेळ : २९/०८/२०२६ दुपारी २.३० वा. वाजेनंतर ते ०७/०९/२०२६ दुपारी २.३० वाजेपर्यंत
३) तांत्रिक बाबींचा लिफाफा उघडणे दिनांक : ०८/०९/२०२६ दुपारी ३.०० वा. वाजेनंतर

| अ. क्र. | निविदा क्र. | खात्याचे नाव | कामाचे नाव | एकूण निविदा रक्कम | बयाणा रक्कम | कामाची मुदत | निविदा संच रूपये | निविदा विषयक जबाबदार व्यक्तीचे नाव व दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | पी.एम.सी./भवन/३९/२०२६-२७ | भवन रचना विभाग | प्र. क्र. १ (कळस-धानोरी) मधील धानोरी स्मशानभूमी येथे विविध विकास कामे करणे. | ८२९७७९२ | ८२९७८ | ६ महिने (पावसाळा कालावधीसह) | ६०७९ | श्री. रामदास पवार ७७६७०२२५५२ |

अ) पुणे मनपाची वरील कामे ही अनुभवी/मनपा मान्यता प्राप्त / शासन मान्यता प्राप्त ठेकेदाराकडून (कामासाठीच्या पूर्वपात्रता अटी टेंडर सेट मध्ये नमूद केल्यानुसार) करून घ्यावयाची आहेत.
ब) सदर कामाबाबत निविदा अटी/शर्ती इ. बाबतचा सर्व तपशिल निविदा संचामध्ये नमूद केला असून सदर कामांचे निविदा संच https://mahatenders.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहे. निविदा संचाचीविक्री व स्वीकृती सदर वेबसाईटवरून फक्त ऑनलाइन पद्धतीने करण्यात येत असून सर्व निविदा दोन पाकीट पद्धतीने मागविण्यात येत आहेत.
क) निविदा विक्रीच्या शेवटच्या दिवशी निविदा संच प्राप्त न झाल्यास स्वीकृतीच्या शेवटच्या दिवशी ऑनलाइन सादरीकरण न झाल्याची सर्वस्वी जबाबदारी टेंडरदाराची राहील.
ड) ऑनलाइन निविदा प्रक्रीयेबाबतची संपूर्ण माहिती भवन विभाग पुणे मनपा येथे मिळेल.
इ) कार्यालयीन आदेश क्र. अतिमआ (वि)/३२, दि.२२.०४.२०१६ नुसार बयाणा रक्कम ECS / RTGS / NEFT सुविधेमार्फतच स्वीकारण्यात येणार आहे.

(स्वाक्षरी/-)
कार्यकारी अभियंता
भवन रचना कार्यालय
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्रमांक : २/६६३ दि. २८/०८/२०२६

## थोडक्यात पण महत्वाचे




### देहूच्या आठवडे बाजाराचे गायरणात स्थलांतर? नगरपंचायतीचा प्रस्ताव

**देहूगाव : दैनिक संध्या**

देहूगावातील बाजारपेठेत मंगळवार व शुक्रवार भरणाऱ्या आठवडे बाजारामुळे होणारी वाहतूक कोंडी फोडण्यासाठी हा बाजार कायमस्वरूपी गायरणाच्या जागेत स्थलांतरित करण्याचा प्रस्ताव देहू न.पं. च्या विचाराधीन असल्याची माहिती समोर आली आहे. बाजार स्थलांतरित झाल्यास देहूतील वाहतूक कोंडीचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सुटण्याची शक्यता असून, वारकरी-भाविकांसह नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. देहूगावात मंगळवार व शुक्रवार असे दोन दिवस आठवडे बाजार भरतो. याच दिवशी देहू-आळंदी रस्त्यावरही बाजार भरत असल्याने दोन्ही ठिकाणी मोठी गर्दी होते. बाजारासाठी स्वतंत्र वाहनतळाची व्यवस्था नसल्याने ग्राहकांकडून दुचाकी व चारचाकी वाहने रस्त्याच्याकडेला उभी केली जातात. भाजीपाला व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी वाहनचालक दीड ते दोन तास बाजारात थांबत असल्याने रस्त्यावरील वाहतुकीवर त्याचा थेट परिणाम होतो. त्यातच सकाळी सात ते अकरा आणि सायंकाळी पाच ते आठ या वेळेत एमआयडीसी, आयटी कंपन्या तसेच विविध औद्योगिक आस्थापनांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची वाहतूक मोठ्या प्रमाणात सुरू असते. पीएमपीच्या बसेसचीही वर्दळ असते. बाजारातील गर्दी, रस्त्याच्याकडेला उभी केलेली वाहने आणि वाढती वाहनसंख्या यामुळे रस्ते अरुंद होऊन बाजाराच्या दिवशी वाहतुकीचा अक्षरशः बोजवारा उडतो. या पार्श्वभूमीवर देहूतील आठवडे बाजार कायमस्वरूपी गायरणाच्या जागेत स्थलांतरित करण्याचा विचार नगरपंचायतीकडून सुरू असल्याचे सांगण्यात येत आहे. यासंदर्भातील प्रस्ताव लवकरच देहूनगर पंचायतीच्या मासिक सभेत मांडला जाण्याची शक्यता आहे. आठवडे बाजार गायरणात स्थलांतरित झाल्यास मुख्य रस्त्यांवरील वाहनांची गर्दी कमी होऊन देहूच्या मुख्य कमानीला वाहतूक कोंडीच्या विळख्यातून मुक्ती मिळेल. तसेच, वारकरी-भाविकांना मंदिरात दर्शनासाठी विनाअडथळा ये-जा करता येईल. बाजार स्थलांतराच्या निर्णयाला नागरिकांचा मोठा पाठिंबा असल्याचेही बोलले जात आहे. बाजारासाठी स्वतंत्र जागा मिळाल्यास वाहतूक कोंडीचा कायमस्वरूपी प्रश्न सुटण्यास मदत होईल. तसेच, नागरिक, व्यापारी, वारकरी-भाविकांच्या सोयीचा विचार करून याबाबत सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केली जात आहे. देहूच्या मुख्य कमानी परिसरात वाहतूक कोंडीची समस्या अधिक गंभीर बनली आहे. मुख्य कमानीपासून परंडवाल चौक, चौदा टाळकरी कमान तसेच देहू-आळंदी रस्त्यावरील तळ्याचा माथा या भागापर्यंत वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात. वाहतूक ठप्प झाल्याने वारकरी, भाविक, विद्यार्थी, कामगार आणि वाहनचालकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागते. वाहतूक सुरळीत करताना रस्ते वाहतूक सुरक्षेच्या पोलिसांचीही मोठी दमछाक होते. बाजाराच्या गर्दीत वाहनाचा धक्का लागल्याच्या किरकोळ कारणावरून वाद-विवाद होण्याबरोबरच चोरीच्या घटनांनाही संधी मिळत असल्याची नागरिकांची तक्रार आहे. त्यामुळे आठवडे बाजारासाठी स्वतंत्र जागा उपलब्ध करून देण्याची मागणी सातत्याने होत आहे.

### ‘आमदार आपल्या दारी’ उपक्रमाचे आयोजन

**पिंपरी : दैनिक संध्या**

चिंचवड विधानसभा मतदारसंघाचे आमदार शंकर जगताप यांच्या पुढाकाराने प्रभाग क्रमांक १६ (रावेत, किवळे, मामुर्डी) येथील नागरिकांच्या समस्या थेट जाणून घेण्यासाठी आणि त्यांचे तत्काळ निराकरण करण्याच्या उद्देशाने ‘आमदार आपल्या दारी’ या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमाअंतर्गत नागरिकांना त्यांच्या परिसरातील विविध नागरी समस्यांबाबत थेट आमदारांसह संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांशी संवाद साधण्याची संधी मिळणार आहे. शासनाच्या योजना, शासकीय दाखले, रेशनकार्ड, वीज, पाणी, ड्रेनेज, महापालिकेशी संबंधित तक्रारी तसेच इतर जनसामान्यांच्या अडचणींबाबत मार्गदर्शन व समस्या निवारण करण्यात येणार आहे. या वेळी महापालिकेचे अधिकारी तसेच विविध शासकीय विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहून नागरिकांच्या तक्रारींची दखल घेणार आहेत. नागरिकांनी आपल्या तक्रारींसंदर्भातील आवश्यक कागदपत्रांसह उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### गुंतवणुकीवर दामदुप्पट परताव्याचे आमिष दाखवून सव्वा कोटींची फसवणूक

**पिंपरी : दैनिक संध्या**

गुंतवणुकीवर दामदुप्पट परताव्याचे आमिष दाखवून फिर्यादी व इतर नागरिकांची तब्बल १ कोटी ३२ लाख ९३ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली. ही घटना काळेवाडी फाटा परिसरात २९ डिसेंबर २०२१ रोजी घडली. गजानन रमाकांत कवटिकवार (वय ३४, रा. आदित्य रिजेन्सी, मोहननगर, बालेवाडी, पुणे; मूळ रा. लोहा, जि. नांदेड) याच्यावर गुन्हा दाखल झाला आहे. संतोष बळीराम जाधव (वय ४२, रा. शिवतेज पार्क, विवेकानंद नगर, नवी सांगवी, पुणे) यांनी मंगळवारी (दि. २५ ऑगस्ट) रोजी या प्रकरणी फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपीने सप्तगिरी रिलिटी कार्यालयात गुंतवणूकदारांना व्यवसायासाठी मदत आणि जुन्या नोटा बदलणे अशी कारणे सांगून विश्वासात घेतले. मोबदल्यात दामदुप्पट रकमेचे दिलेले बँकेचे चेक बाऊन्स झाले. आरोपीने फिर्यादींचे २० लाख २५ हजार आणि इतर गुंतवणूकदारांचे १ कोटी १२ लाख ६८ हजार रुपये लाटले. या गुन्ह्याचा तपास वाकड पोलीस करत आहेत.

### दिल्लीला पाठवण्याच्या बहाण्याने तरुणीला जाळ्यात ओढले ; गहुंजेत अत्याचार

**पिंपरी : दैनिक संध्या**

पिंपरी: उच्च शिक्षणासाठी दिल्लीला जाण्यास मदत करण्याच्या बहाण्याने सोशल मीडियावर ओळख झालेल्या १९ वर्षीय तरुणीचा विश्वास संपादन केला. त्यानंतर तिला गहुंजे येथील सदनिकेत डांबून ठेवत लैंगिक अत्याचार केला. एवढ्यावरच न थांबता डेटिंग ॲपवर तिचे बनावट प्रोफाइल तयार करून मुंबई आणि अहमदाबाद येथे नेत देहविक्रीस भाग पाडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. महेश दिवाकर पारणकर (३८, रा. गहुंजे) असे अटक केलेल्या संशयिताचे नाव आहे. न्यायालयाने त्याला २८ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. ही घटना १६ जुलै ते २२ ऑगस्ट २०२६ या कालावधीत घडली. याप्रकरणी २३ ऑगस्ट रोजी शिरगाव पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित तरुणी उच्च शिक्षणासाठी दिल्ली येथे गेली होती. मात्र, महाविद्यालयातील उपस्थिती कमी असल्याने तिला परीक्षेला बसता आले नाही. त्यामुळे ती घरी परतली. शिक्षणाचे वर्ष वाया जाऊ नये म्हणून तिला पुन्हा दिल्लीला जायचे होते; मात्र सुरक्षिततेच्या कारणास्तव कुटुंबीयांनी त्यास परवानगी दिली नव्हती.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पुन्हा होणार वृक्षगणना

## आधीच्या मोजणीवर खर्च झाले ६.७६ कोटी, सॅटेलाईटद्वारे केलेली ३२ लाखांहून अधिक झाडांची गणना वादात

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी: पिंपरी-चिंचवड महापालिकेने टेरेकॉन इकोटेक प्रायव्हेट लिमिटेड या खासगी एजन्सीमार्फत सॅटेलाईटद्वारे शहरातील झाडांची मोजणी केली होती. शहरात तब्बल 32 लाख 16 हजार 799 वृक्ष असल्याचा दावा त्यांनी केला होता. त्यासाठी महापालिकेने तब्बल 6 कोटी 76 लाख रुपये खर्च केले. ते वृक्ष मोजणीचे काम वादात सापडले होते. आता पुन्हा या प्रकारे शहरातील झाडांची गणना केली जाणार आहे. त्याच निविदा उद्यान विभागाने प्रसिद्ध केली आहे. शहरातील वृक्ष गणना करण्यास स्थायी समितीने 27 सप्टेंबर 2017 ला मान्यता दिली होती. ते संपूर्ण काम सात वर्षात पूर्ण झाले नाही. मात्र, ठेकेदार एजन्सीचे बिल अदा करण्यात आली. त्या एजन्सीनुसार शहरात 32 लाख 16 हजार 977 झाडे असल्याचे महापालिकेकडून सांगितले जात आहे.

एका झाडासाठी दहा रुपये खर्च करण्यात आला. त्यापूर्वी 2003 -04 मध्ये मानवी पद्धतीने वृक्षगणना करण्यात आली होती. एका झाडाची मोजणी करण्यासाठी दोन रुपये 35 पैसे देण्यात आले होते. एकूण 39 लाख रुपये खर्च आला होता. आता, पुन्हा झाडांची मोजणी केली जाणार आहे.

शहरातील झाडांची जीआयएस किंवा जीपीएस आधारित (भौगोलिक सूचना प्रणाली) मॅपिंग करून त्यांची संख्या मोजणीसाठी एजन्सी नेमण्यात येणार आहे. त्यासाठी इच्छुक एजन्सीकडे प्रस्ताव मागवण्यात आले आहेत. त्यासाठी 9 सप्टेंबरपर्यंत प्रस्ताव मागण्यात आले आहेत. शहरातील वृक्षांची गणना करण्यासाठी पुन्हा कोट्यवधी रुपयांचा खर्च केला जाणार आहे.

टेराकॉन इकोटेक प्रा. लि या ठेकेदाराला उपग्रहाद्वारे वृक्षगणना करण्याचे काम देण्यात आले होते. दोन वर्षात वृक्षगणना पूर्ण करायची आहे.

उर्वरित तीन वर्षांमध्ये किती झाडे तोडली, नवीन किती लावली याचे गणना त्यांनी ठेवायचे आहे.

झाडांचे टिपलेले छायाचित्र महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केली जाणार. मोबाईल ॲप विकसित करण्यात येणार होते. सॅटेलाईटद्वारे झाडांची उंची, रुंदी, त्यामधील गर, त्याचे ठिकाण, झाडांची स्थिती, नंबरींग, वृक्षारोपणाची व्याप्ती याची सर्व माहिती जमा केली जाणार आहे, असे सांगण्यात आले होते. मात्र, प्रत्यक्षात तसे न झाल्याने विरोधकांनी कामाबाबत अनेक आरोप केले. त्याबाबत उद्यान विभागाने एजन्सीला नोटीस बजावली होती. मात्र, त्याच्यावर कारवाई करण्यात आली नाही.

### सर्व प्रकाराची माहिती उपलब्ध होणार

पिंपरी-चिंचवड शहरातील झाडांची दर दहा वर्षांनी मोजणी केली जाते. यंदाच्या वर्षी ही मोजणी केली जाणार आहे. त्यासाठी निविदा प्रसिद्ध करून इच्छुक संस्थांकडून प्रस्ताव मागण्यात आले आहेत. हे सर्वेक्षण पूर्ण झाल्यास शहरातील झाडांची सर्व प्रकाराची माहिती उपलब्ध होणार आहे, असे महापालिकेचे मुख्य उद्यान अधिक्षक महेश गारगोटे यांनी सांगितले.



# शिल्पा गवारे आत्महत्या प्रकरण : पती, सासू-सासरे आणि दिराला ३१ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी

■ **वाकड (दै. संध्या)**

वाकड येथील शिल्पा गवारे आत्महत्या प्रकरणात महत्त्वाची घडामोड घडली असून पती सचिन गवारे, सासू संजीवनी गवारे, सासरे उत्तम गवारे आणि दिर संदीप गवारे यांना न्यायालयाने ३१ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. दरम्यान, हे प्रकरण आत्महत्येपुरते मर्यादित नसून हत्येच्या दृष्टीनेही तपास सुरू असल्याची माहिती समोर आली आहे.






वाकड परिसरातील शिल्पा गवारे (वय ४२) यांनी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना उघडकीस आल्यानंतर त्यांचा भाऊ संतोष कलाटे यांनी वाकड पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली होती. त्यानुसार पती, सासू, सासरे आणि दिराविरोधात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा नोंदविण्यात आला होता. मात्र, या प्रकरणाला आता वेगळे वळण मिळण्याची शक्यता निर्माण झाली आहे. शिल्पा गवारे यांच्या कुटुंबीयांनी ही आत्महत्या नसून हत्या असल्याचा गंभीर आरोप केला आहे. त्यानुसार वाकड पोलिसांनीही विविध बाबींची तपासणी सुरू केली आहे.

तपासादरम्यान काही संशयास्पद बाबी समोर आल्या असल्याचे सूत्रांनी सांगितले. शिल्पा गवारे यांनी गळफास घेतल्याचे सांगितले जात असताना त्या वेळी त्यांच्या बेडरूमचे दार उघडे होते. तसेच घटना मध्यरात्री सुमारे दीड वाजण्याच्या सुमारास घडली असताना पती सचिन गवारे घरात असूनही बेडरूममध्ये का नव्हते, याबाबत प्रश्न उपस्थित करण्यात येत आहेत. पोलिसांच्या प्राथमिक पंचनाम्यातही या बाबींचा उल्लेख असल्याचे समजते.

याशिवाय, आरोपी पती सचिन गवारे यांच्याविरोधात विवाहापूर्वी हत्येचा गुन्हा दाखल असल्याची बाबही पोलिस तपासात समोर आल्याची माहिती मिळाली आहे. त्यामुळे या प्रकरणातील तपास अधिक गतीने सुरू असून सर्व बाजूंनी चौकशी केली जात आहे. दरम्यान, न्यायालयाने चारही आरोपींना ३१ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी सुनावली असून वाकड पोलीस या प्रकरणाचा सखोल तपास करत आहेत. तपासातून पुढे कोणती माहिती समोर येते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# निगडी प्राधिकरण येथे चेंबरमध्ये अडकून दोन कामगारांचा दुर्दैवी मृत्यू

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरातील निगडी प्राधिकरण परिसरात लोकमान्य हॉस्पिटलजवळ असलेल्या एका चेंबरमध्ये अडकून दोन तरुण कामगारांचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. अमोल शिंदे (वय 23) आणि मनोज शिंदे (वय 19) अशी मृत कामगारांची नावे असून, या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, बुधवारी मध्यरात्री सुमारे 12 वाजण्याच्या सुमारास हे दोघे कामगार चेंबरमध्ये अडकल्याची माहिती मिळताच पोलीस आणि अग्निशमन दलाच्या पथकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. बचावकार्य राबवत दोघांनाही बाहेर काढून त्वरित रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर त्यांना मृत घोषित केले. मृत्यूचे नेमके कारण शवविच्छेदन अहवालानंतर स्पष्ट होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. दरम्यान, कोणत्याही प्रकारची पुरेशी सुरक्षा व्यवस्था न करता कामगारांना धोकादायक चेंबरमध्ये उतरवण्यात आले का, असा गंभीर प्रश्न उपस्थित केला जात आहे. या घटनेमुळे संबंधित यंत्रणा आणि ठेकेदारांच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षी 15 ऑगस्ट 2025 रोजी याच बीएसएनएल चेंबरमध्ये ऑप्टिकल फायबरच्या कामादरम्यान दत्ता होलारे, लखन धावरे आणि साहेबराव गिरसेप या तीन कंत्राटी कामगारांचा गुदमरून मृत्यू झाला होता. त्या दुर्घटनेनंतरही आवश्यक सुरक्षा उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यात आल्या नसल्याचा आरोप नागरिकांकडून करण्यात येत आहे. एकाच ठिकाणी पुन्हा अशा प्रकारची जीवघेणी दुर्घटना घडल्याने स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र संतापाची भावना आहे. कामगारांच्या सुरक्षेकडे दुर्लक्ष करणाऱ्या संबंधित कंपनी आणि बेजबाबदार ठेकेदारांविरोधात कठोर कारवाई करावी तसेच सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करावा, अशी जोरदार मागणी नागरिक आणि सामाजिक संघटनांकडून करण्यात येत आहे.

# पीएमपीएमएल कर्मचाऱ्यांना पेन्शनचा मार्ग मोकळा; २९ वर्षांच्या लढ्याला यश

■ **पिंपरी (दै. संध्या)**

पुणे महानगर परिवहन महामंडळ लिमिटेडच्या (पीएमपीएल) हजारो सेवकांसाठी दिलासादायक निर्णय घेण्यात आला आहे. पीएमपीएल कर्मचाऱ्यांना आता राज्य शासनाच्या नियमांप्रमाणे निवृत्ती वेतनाचे (पेन्शन) लाभ मिळण्याचा मार्ग पूर्णपणे मोकळा झाला आहे. माननीय उच्च न्यायालयाने कर्मचाऱ्यांच्या बाजूने दिलेल्या ऐतिहासिक निकालाची तात्काळ अंमलबजावणी करून संबंधित सर्व कर्मचाऱ्यांना येत्या ६ महिन्यांच्या कालावधीत निवृत्ती वेतनाचे सर्व लाभ अदा करावेत, असे निर्देश पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे स्थायी समिती सभापती तथा पीएमपीएलचे संचालक अभिषेक बारणे यांनी पीएमपीएमएल प्रशासनाला दिले आहेत.

या महत्त्वपूर्ण प्रकरणात स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे यांनी स्वतः विशेष पुढाकार घेतला आहे. त्यांनी पीएमपीएलच्या अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालकांना (CMD) अधिकृत पत्र पाठवून न्यायालयाच्या आदेशाची पायमल्ली होणार नाही याची दक्षता घेण्यास सांगितले आहे.

माननीय उच्च न्यायालयाने याचिका क्र. ५६२७/२०१३ वर दिलेल्या निर्णयानुसार, ६ महिन्यांच्या विहित कालावधीत कर्मचाऱ्यांना निवृत्ती वेतनाचे लाभ मिळणे कायदेशीरदृष्ट्या बंधनकारक आहे. त्यामुळे प्रशासनाने कोणतीही दिरंगाई न करता तातडीने आवश्यक ती नियमाधीन कारवाई करावी, अशा कडक सूचना सभापती बारणे यांनी पत्राद्वारे केल्या आहेत.

**२९ वर्षांचा प्रदीर्घ लढा आणि न्यायालयीन पार्श्वभूमी..**

पुणे महानगरपालिका, पिंपरी चिंचवड महानगरपालिका आणि शिक्षण मंडळातील कर्मचाऱ्यांना नियमितपणे निवृत्ती वेतनाचे (पेन्शन) लाभ मिळतात. मात्र, पीएमपीएमएलच्या कर्मचाऱ्यांना या लाभांपासून वंचित राहावे लागल्यामुळे निवृत्तीनंतर त्यांच्यावर व त्यांच्या कुटुंबावर आर्थिक संकट ओढवत होते. या न्याय्य हक्कासाठी कर्मचाऱ्यांनी तब्बल २९ वर्षे संघर्ष केला.

कर्मचाऱ्यांच्या या लढ्याला सर्वप्रथम २ मे २०१३ रोजी यश आले, जेव्हा औद्योगिक न्यायालय (पुणे) यांनी कर्मचाऱ्यांना पेन्शन देण्याचे आदेश दिले. या निकालाविरुद्ध पीएमपीएमएल प्रशासनाने उच्च न्यायालयात दाद मागितली होती.

परंतु, उच्च न्यायालयाने प्रशासनाची याचिका फेटाळून लावत कर्मचाऱ्यांच्या बाजूने कौल दिला आणि ६ महिन्यांच्या आत निवृत्ती वेतनाचे लाभ वितरित करण्याचे स्पष्ट आदेश दिले.



“पीएमपीएलचे कर्मचारी हे पुणे व पिंपरी-चिंचवड शहराच्या सार्वजनिक वाहतुकीचा मुख्य कणा आहेत. महापालिकेच्या इतर कर्मचाऱ्यांप्रमाणेच पीएमपीएलच्या कर्मचाऱ्यांनाही राज्य शासनाच्या नियमानुसार निवृत्ती वेतनाचे लाभ मिळणे हा त्यांचा हक्क होता. २९ वर्षांच्या प्रदीर्घ लढ्यानंतर मिळालेला हा विजय अत्यंत ऐतिहासिक आहे. माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार कर्मचाऱ्यांना ६ महिन्यांच्या कालावधीत पेन्शनचे लाभ मिळालेच पाहिजेत, यासाठी मी PMPML प्रशासनाला पत्राद्वारे स्पष्ट सूचना दिल्या आहेत. कर्मचाऱ्यांच्या पाठीशी आमचे सरकार आणि प्रशासन सदैव खंबीरपणे उभे आहे.”

– अभिषेक बारणे, सभापती-स्थायी समिती, पिंपरी चिंचवड महापालिका.

### निवृत्त कर्मचाऱ्यांकडून अभिषेक बारणे यांचा सत्कार..

सभापती अभिषेक बारणे यांनी प्रशासनाला ६ महिन्यांत कार्यवाही करण्याचे निर्देश देऊन पत्राद्वारे पाठपुरावा सुरू केल्याचे समजताच, निवृत्त कर्मचाऱ्यांनी पिंपरी चिंचवड महापालिकेत एकत्र येत जल्लोष केला. आज निवृत्त कर्मचाऱ्यांच्या शिष्टमंडळाने सभापती अभिषेक बारणे यांची भेट घेऊन पुष्पगुच्छ देऊन त्यांचा भावूक वातावरणात सत्कार केला.

## थोडक्यात पण महत्वाचे



### पुणे जिल्हास्तरीय विषय शिक्षक कार्यशाळा उत्साहात संपन्न

**जेजुरी : दैनिक संध्या**

पुणे जिल्हा परिषद माध्यमिक शिक्षण विभाग आणि पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ यांच्या संयुक्त विद्यमाने मराठी, हिंदी, इंग्रजी, समाजशास्त्र, कला-क्रीडा, गणित व विज्ञान विषयांच्या जिल्हास्तरीय शिक्षक कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले. विद्यार्थ्यांचे अध्यापन अधिक प्रभावी, गुणवत्तापूर्ण आणि विद्यार्थी-केंद्रित करण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यशाळांना शिक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यशाळेचे उद्‌घाटन पुणे जिल्हा परिषदेचे माध्यमिक शिक्षणाधिकारी डॉ. भाऊसाहेब कारेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक महामंडळाचे राज्य सचिव ,राष्ट्रपती पुरस्कारप्राप्त प्राचार्य नंदकुमार सागर, पुणे जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष प्रसाद गायकवाड, सचिव शिवाजीराव कामथे, कार्याध्यक्ष राजेश गायकवाड, विश्वस्थ हनुमंत कुबडे, अरुण थोरात, शिवाजी किलकिले सर्व कार्यकारणी सदस्य पदाधिकारी तालुका अध्यक्ष सचिव व हजोरोच्या संख्येने विषय शिक्षक उपस्थित होते उद्‌घाटनप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. भाऊसाहेब कारेकर यांनी,"प्रत्येक विद्यार्थी गुणवत्तापूर्ण शिक्षण घेऊन आदर्श, संस्कारक्षम आणि जबाबदार नागरिक घडला पाहिजे. शाळांची गुणवत्ता वाढविण्यासाठी शिक्षकांना आवश्यक मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने विषयवार कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेत मिळालेले ज्ञान विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून त्यांच्या गुणवत्तावाढीसाठी शिक्षकांनी प्रयत्नशील राहावे," असे आवाहन केले. प्राचार्य नंदकुमार सागर यांनी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने अध्यापनामध्ये नवोपक्रम, कृतीआधारित शिक्षण, तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आणि आधुनिक मूल्यमापन पद्धती यांचा अवलंब करण्याची गरज व्यक्त केली. विद्यार्थ्यांच्या मनातील विषयांची भीती दूर करून विषयांमध्ये गोडी निर्माण करण्यासाठी शिक्षकांनी सातत्याने अध्ययनशील राहणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले. कार्यशाळेत तज्ज्ञ मार्गदर्शकांनी विविध विषयांच्या अध्यापनातील आधुनिक पद्धती, अध्ययन निष्पत्ती, कृतीआधारित शिक्षण, समस्या निराकरण कौशल्ये, डिजिटल साधनांचा वापर तसेच विद्यार्थ्यांच्या तार्किक व सर्जनशील क्षमतांच्या विकासाबाबत मार्गदर्शन केले. चर्चासत्रे, प्रश्नोत्तरे आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून शिक्षकांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या कार्यशाळांमुळे शिक्षकांना बदलत्या शैक्षणिक प्रवाहानुसार अध्यापन अधिक परिणामकारक करण्यासाठी नवे दृष्टिकोन व उपयुक्त तंत्रे मिळाल्याची भावना सहभागी शिक्षकांनी व्यक्त केली. कार्यशाळेचे नियोजन व आयोजन पुणे जिल्हा माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा मुख्याध्यापक संघ वतीने करण्यात आले. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी विद्यासमितीचे अध्यक्ष सुधाकर जगदाळे सचिव भानुदास रिठे ग्लोबल स्कूलच्या प्राचार्य शारदा राव गणेश काकडे, मंगेश शिंदे, अतुल ढेरे यांनी विशेष परिश्रम घेतले.

### महानुभाव पंथातील पवते सोहळा भक्तिभावानं मोठ्या उत्साहात संपन्न

**कोरेगावमुळ : दैनिक संध्या**

महानुभाव पंथातील पवते सोहळा मोठ्या उत्साहात भक्तिभावाने संपन्न झाला. कोरेगावमुळ, उरुळी कांचन, टिळेकरवाडी या परिसरात महानुभाव पंथाचे अनेक अनुयायी आहेत. महानुभाव पंथाच्या परंपरेतील पवते हा धार्मिक व आध्यात्मिक महत्त्वाचा सोहळा भक्तिभावाने साजरा करण्यात येतो. या सोहळ्याच्या निमित्ताने पवित्र पवते सजविण्यात येतात. रंगीबेरंगी कापड, आकर्षक नक्षीकाम व सुवर्ण अलंकारांनी सजविलेल्या पवत्यांमुळे सोहळ्याचे धार्मिक सौंदर्य खुलून दिसते. महानुभाव पंथाच्या अनुयायांसाठी पवतेला विशेष धार्मिक महत्त्व असून, या निमित्ताने भक्तगण एकत्र येऊन परमेश्वराचे स्मरण, पूजन व प्रार्थना करतात. पारंपरिक पद्धतीने धार्मिक विधी पार पाडत भक्तीमय वातावरणात हा सोहळा साजरा केला जातो. या धार्मिक परंपरेतून महानुभाव पंथाची संस्कृती, श्रद्धा आणि अध्यात्मिक वारसा पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे कार्य होत आहे.



### नारायणगाव येथे डिजे मुक्त "ईद ए मिलाद : पैगंबर जयंती" उत्साहात साजरी

**नारायणगाव : दैनिक संध्या**

इस्लाम धर्माचे संस्थापक प्रेषित हजरत मोहम्मद पैगंबर साहेबांची १५०१ वी जयंती अर्थात ईद-ए-मिलाद विविध धार्मिक व सामाजिक उपक्रमांद्वारे मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. नारायणगावमध्ये असलेला हिंदू मुस्लिम एकोपा जपत मुस्लिम बांधवांनी डीजे न लावता, मोहमंद पैगंबर यांच्यावर स्तुतीगीत तसेच घोषणाबाजी करत सुन्नी मुस्लिम जमात नारायणगाव यांच्या वतीने मोठ्या उत्साहात जुलूस काढण्यात आला. नारायणगाव ग्रामपंचायतीच्या वतीने मुस्लिम बांधवांना गुलाबपुष देत स्वागत केले तर मुस्लिम बांधवांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या स्मारकास पुष्पहार अर्पण करत अभिवादन केले. यावेळी जुलूस मार्गावर सर्वधर्मीयांचे गुलाबपुष्प देऊन स्वागत, प्रसाद वाटप करत स्वागत, नारायणगाव पोलीस स्टेशनने पाणी वाटप या कार्यक्रमांनी बंधूभावाचा संदेश देत निघालेला पैगंबर साहेबांचा हा जुलूस लक्षवेधी ठरला. सुन्नी जामे मस्जिद पासून मुफ्ती मुनाजीर हुसेन व मुस्लिम जमातचे अध्यक्ष एजाज आतार यांच्या मार्गदर्शनाखाली जुलूसची सुरुवात झाली. बाजारपेठ मार्गे छत्रपती शिवाजी चौक, हनुमान चौक, जुन्नर रोड ते बसस्थानक येथून भाजी बाजार मार्गे येऊन सुन्नी जामा मस्जिद मुस्लिम मोहल्ला येथे जुलुसची सांगता करण्यात आली. जुलूसमध्ये मुफ्ती मुनाजीर हुसेन, हाफिज शहबाज रजा, हाफिज ताहीर मणियार व मौलाना सद्दाम यांच्या मार्गदर्शनाखाली मदरसा अरबीया गुलशने मदिना आणि मदरसतुल मदिना गौसूल आझमच्या मुलांनी पैगंबर साहेबांच्या मानवतावादी शांती व सद्भावनेच्या घोषणा, आकर्षण वेशभूषा, पेहराव यामुळे सर्वांचे लक्ष वेधून घेतले. हजरत टिपू सुलतान लायन्स क्लबच्या युवकांनी तयार केलेली (मस्जिद ए नबवी मदिना मुनवरा) या प्रतिकृतीने जुलूसमध्ये उपस्थितांचे लक्ष वेधले. यानिमित्ताने शिवसेना तालुकाप्रमुख व उपसरपंच बाबू पाटे, सरपंच डॉ. शुभदा वाव्हळ, सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण संपांगे, युवा नेते सुरज वाजगे माजी उपसरपंच संतोष वाजगे, ग्रामपंचायत सदस्य आरिफ आतार, जुबेर आतार, संतोष दांगट, गणेश पाटे, संतोष पाटे, बाळा वाव्हळ, यांसह ग्रामपंचायतच्या वतीने मुस्लिम बांधवांना गुलाबपुष्प देऊन तसेच मुस्लिम समाजाचे पदाधिकारी यांचा शाल देऊन सत्कार करण्यात आला. तसेच नारायणगाव पोलिस स्टेशनच्या वतीने सहाय्यक पोलिस निरीक्षक प्रवीण संपांगे पोलिस उपनिरीक्षक जगदीश पाटील, दत्ता ढेंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलिस बंदोबस्त ठेवला होता.




*सासवड (ता. पुरंदर): सासवड नगरपरिषद सभागृहात आयोजित दहीहंडी व गणेशोत्सव आढावा बैठकीत मंडळाच्या पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करताना पोलीस व प्रशासकीय अधिकारी.*

# सासवडमध्ये दहीहंडी व गणेशोत्सवासाठी आढावा बैठक संपन्न

**नियमांचे पालन करून डीजेमुक्त उत्सवाचे आयोजन करण्याचे प्रशासनाचे आवाहन**

■ सासवड (दै. संध्या)

आगामी दहीहंडी आणि गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर गुरुवारी (ता.२७) सासवड नगरपरिषदेच्या सभागृहात सासवड पोलिसांच्या वतीने गणेशोत्सव व दहीहंडी मंडळांच्या आयोजकांसाठी आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले. आगामी सण शांततेत, उत्साहात आणि सुरक्षितपणे पार पाडण्याच्या उद्देशाने ही बैठक घेण्यात आली, यामध्ये उपविभागीय पोलीस अधिकारी राजेंद्रसिंह गौर, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, पोलीस निरीक्षक संतोष घोळवे यांनी मंडळांच्या पदाधिकाऱ्यांना सविस्तर मार्गदर्शक सूचना दिल्या. उत्सव डीजेमुक्त करण्याचे आवाहन करण्यात आले. मंडळांनी धर्मादाय आयुक्तांकडून रजिस्ट्रेशन करून परवानगी घेणे बंधनकारक असून उत्सवादरम्यान रस्त्याच्या बाजूला मंडप १० x १० फुटांचा असावा, त्यामुळे वाहतुकीस अडथळा होऊ नये, मंडपात दुर्घटना घडू नये यासाठी पक्क्या स्वरूपाचा हवा, रात्रंदिवस जबाबदार स्वयंसेवक उपस्थित असावेत, दागिन्यांसाठी मुर्तीवर सीसीटीव्ही कॅमेरे असावेत., देखावे, बॅनर धार्मिक भावना दुखावणारे नकोत, प्रखर प्रकाशदिवे नकोत, महावितरणकडून अर्ज देऊन विजजोड घ्या, वाहतूक कोंडी टाळणे, ठरवून दिलेल्या ध्वनी मर्यादेचे काटेकोर पालन करणे, करमणुकीच्या कार्यक्रमावेळी गर्दी होणार असल्यास परवानगी घ्या. अफवा, भावना दुखावणारे टेटस ठेऊ नका, मद्यपान करू नका, संशयास्पद वस्तू आढळल्यास तातडीने पोलिसांशी संपर्क करा, विसर्जन मिरवणूकीतील वाहनांची आरटीओकडून तपासणी करा, मिरवणुकीसाठी दिलेला वेळ पाळा, देखाव्यांची उंची मर्यादित ठेवणे, लहान मुले, कार्यकर्त्यांवर लक्ष ठेवा, फटाके वाजवू नका, मिरवणूकांत एकमेकांना डिवचू नका अशा सूचना देण्यात आल्या. याशिवाय, मिरवणुकीत लेझर लाईटचा वापर पूर्णपणे टाळावा, प्रत्येक मंडळाने वेळेत पोलीस ठाण्यात अर्ज सादर करावा आणि अधिकृत विद्युत पुरवठ्यासाठी महावितरणकडे अर्ज करून तात्पुरते मीटर घ्यावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले. विशेषतः दहीहंडी उत्सवाच्या वेळी गोविंदा पथकांसाठी सुरक्षेची पूर्ण काळजी घेणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. बैठकीदरम्यान विविध मंडळांच्या कार्यकर्त्यांनी आपल्या अडीअडचणी आणि मागण्या प्रशासनासमोर मांडल्या. गणेश मूर्ती विक्रीचे स्टॉल रहदारीच्या रस्त्यावर न लावता मोकळ्या जागेत लावण्यात यावेत, मिरवणूक मार्गावरील खड्डे बुजवा, विजेच्या तारा उंच कराव्यात आणि धोकादायक फांद्या छाटण्यात याव्यात, अशा मागण्या करण्यात आल्या. तसेच पारंपारिक वाद्यांवर वेळेचे जाचक बंधन नसावे, दहीहंडीच्या दिवशी महामार्गावर सुरळीत वाहतूक व्यवस्था ठेवावी आणि उत्कृष्ट देखावे सादर करणाऱ्या मंडळांना प्रशासनाकडून प्रोत्साहनपर बक्षीस दिले जावे, अशा सूचनाही कार्यकर्त्यांनी केल्या.

मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण यांनी, मंडळांनी परवानगी मंडप आणि बॉनरसाठी परवानगी घेणे, गणेश मुर्ती पर्यावरण पुरक असाव्यात, दरवर्षीप्रमाणे गणेश विसर्जनमार्गावर ठिकाणी सीसीटीव्ही, संगमेश्वर मंदिर, वटेश्वर मंदिर आणि संत सोपानकाका महाराज मंदिराजवळ कृत्रिम हौद तयार करणार असल्याचे सांगितले. मंडप उभे करताना रस्त्याच ७५ टक्के भाग रिकामा असावा असे सांगितले. तर पोलीस अधिकारी गौर यांनी, गुन्हेगारांवर परीणामकार कारवाई करण्याचे आश्वासन दिले. याबैठकीस सहाय्यक पोलीस निरीक्षक वैभव सोनवणे, नगरसेवक राजन जगताप, प्रदीप राऊत, गुप्तवार्ता विभागाचे रूपेश भगत, महावितरणचे सुनील कामथे यांच्यासह सासवड परिसरातील विविध मंडळांचे पदाधिकारी उपस्थित होते.

# पार्किंगचा अभाव, बेशिस्त वाहतुकीमुळे नागरिक, महिला, विद्यार्थी व रुग्ण हैराण

**शिरूरमध्ये वाहतुकीचे तीनतेरा; वाहतूक पोलिसांच्या खांदेपालटची मागणी**

■ शिरूर (दै. संध्या)

शिरूर शहरातील वाहतुकीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत असून बेशिस्त वाहतूक, पार्किंगच्या सुविधेचा अभाव आणि रस्त्याच्या कडेला अस्ताव्यस्तपणे उभी केली जाणारी वाहने यामुळे शहरातील प्रमुख रस्त्यांवर वारंवार वाहतूक कोंडी होत आहे. नागरिक, महिला, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक तसेच रुग्णांना या कोंडीचा मोठा त्रास सहन करावा लागत आहे. वाहतूक कोंडीचा प्रश्न केवळ काही दिवसांचा नसून वर्षानुवर्षे कायम असतानाही त्यावर कायमस्वरूपी उपाययोजना होत नसल्याने प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नागरिकांकडून नाराजी व्यक्त होत आहे.

शहरातील पुणे-नगर मुख्य रस्त्यावरून ग्रामीण व खासगी रुग्णालये, शाळा, महाविद्यालये, बसस्थानक, शासकीय कार्यालये, बँका आणि बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात नागरिकांची ये-जा होत असल्याने दिवसभर वाहनांची मोठी वर्दळ असते. हुतात्मा स्मारक ते बसस्थानक परिसरात वाहनांसह पादचाऱ्यांची मोठी गर्दी होत असल्याने वारंवार वाहतूक कोंडी निर्माण होते. विशेषतः रुग्णवाहिका किंवा आजारी रुग्णांना दवाखान्यात नेताना वाहतूक कोंडीत अडकावे लागल्यास आपत्कालीन परिस्थितीत गंभीर धोका निर्माण होण्याची शक्यता आहे.

शहरात दुचाकी व चारचाकी वाहनांसाठी पुरेशी अधिकृत पार्किंग व्यवस्था नसल्याने अनेक वाहनधारक रस्त्याच्या कडेलाच वाहने उभी करतात.

पाचकंदील चौक ते डंबेनाला, सरदार पेठ ते सोनार आळी, निर्माण प्लाझा चौक, बाबुरावनगर पूल आदी परिसरातील अरुंद रस्त्यांवर बेशिस्त पार्किंगमुळे वाहतुकीची समस्या आणखी तीव्र होत आहे. बाजारपेठेत खरेदीसाठी येणारे नागरिक रस्त्यालगत वाहने उभी करून दुकानदारांकडे जात असल्याने काही ठिकाणी रस्त्याची उपलब्ध रुंदी कमी होते. त्यामुळे समोरासमोर वाहने आल्यास कोंडी होऊन वाहनांच्या लांबच लांब रांगा लागतात.

बसस्थानक परिसरातील वाहतूक कोंडी ही तर नित्याचीच बाब बनली आहे. बस, रिक्षा, दुचाकी, चारचाकी तसेच खासगी वाहनांची सतत होणारी ये-जा आणि त्यातच रस्त्याच्या कडेला होणारे पार्किंग यामुळे प्रवासी आणि वाहनधारक त्रस्त झाले आहेत. सकाळी कार्यालयीन वेळेत तसेच सायंकाळी बाजारपेठेतील गर्दीच्या वेळी परिस्थिती अधिकच बिकट होत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.




**नियमभंग करणाऱ्या वाहनांवर कारवाईची मागणी**

शहरात विना नंबर प्लेट वाहने, काळ्या काचा असलेली वाहने, कर्णकर्कश हॉर्न वाजवत धावणाऱ्या दुचाकी तसेच आवश्यक कागदपत्रे अथवा परवाना नसलेल्या वाहनांबाबत नागरिकांकडून तक्रारी होत आहेत. काही स्कूल बस व इतर वाहनांच्या नियमपालनाबाबतही प्रश्न उपस्थित होत आहेत. नियमभंग करणाऱ्या वाहनांवर सातत्याने आणि समान पद्धतीने कारवाई होत नसल्याची भावना नागरिकांमध्ये आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर अधूनमधून कारवाई करण्यापेक्षा नियमित तपासणी मोहीम राबविणे, प्रमुख चौकांमध्ये सीसीटीव्ही व वाहतूक नियंत्रण व्यवस्था मजबूत करणे, नो-पार्किंग क्षेत्र निश्चित करणे आणि बेशिस्त पार्किंग करणाऱ्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करणे आवश्यक आहे. तसेच शाळा, रुग्णालये आणि बाजारपेठ परिसरात गर्दीच्या वेळेत विशेष वाहतूक नियोजन करण्याची मागणी होत आहे.

वाहतूक व्यवस्थेचा प्रश्न सोडविताना अनेक वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या वाहतूक पोलिसांच्या बदल्या अथवा खांदेपालट करण्याची मागणीही नागरिकांकडून होत आहे. दीर्घकाळ एकाच ठिकाणी नियुक्ती असलेल्या कर्मचाऱ्यांबाबत नागरिकांमध्ये विविध चर्चा सुरू असून, वाहतूक व्यवस्थेत पारदर्शकता आणि प्रभावीपणा आणण्यासाठी वेळोवेळी खांदेपालट होणे आवश्यक असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. मात्र, कोणत्याही व्यक्तीवर थेट आरोप न करता वरिष्ठ अधिकाऱ्यांनी वस्तुनिष्ठ पद्धतीने कामकाजाचा आढावा घेऊन आवश्यक तो निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे. शहराच्या वाढत्या लोकसंख्येबरोबर वाहनांची संख्याही वाढत आहे. त्यामुळे जुन्या पद्धतीच्या वाहतूक व्यवस्थेऐवजी भविष्यातील गरजा लक्षात घेऊन शिरूर शहरासाठी स्वतंत्र वाहतूक आराखडा तयार करण्याची गरज आहे.

**'वाहतूक कोंडीचा त्रास कायमचा कधी सुटणार?'**

पार्किंगची स्वतंत्र व्यवस्था नाही, रस्त्याच्या कडेला बेशिस्त पार्किंग, शाळांच्या परिसरात वाहनांची गर्दी, नियमभंग करणाऱ्या वाहनांवर अपुरी कारवाई आणि प्रमुख चौकांमध्ये अपुरे वाहतूक नियोजन यामुळे शिरूरकरांना दररोज वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. प्रशासनाने केवळ अधूनमधून कारवाई न करता कायमस्वरूपी वाहतूक आराखडा तयार करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी. बाजारपेठ, बसस्थानक, शाळा आणि रुग्णालय परिसरात गर्दीच्या वेळेत विशेष वाहतूक पथक तैनात करावे. तसेच अनेक वर्षे एकाच ठिकाणी कार्यरत असलेल्या वाहतूक पोलिसांचा खांदेपालट करून नव्या पथकाला जबाबदारी देण्याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गांभीर्याने विचार करावा, अशी मागणी नागरिकांतून होत आहे.

**'अवैध धंदे, अवैध वाहतूक करणाऱ्यांची गय नाही'**

"शिरूर, शिक्रापूर व कारेगाव पोलीस स्टेशन हद्दीतील अवैध धंदे, विविध प्रकारची अवैध प्रवासी वाहतूक आणि गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचा कोणी प्रयत्न करत असल्यास त्यांची गय करण्यात येणार नाही. असे कोणाच्या निदर्शनास आल्यास नागरिकांनी थेट माझ्याशी संपर्क साधावा." शिरूर शहरातील वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यासाठी पोलीस, नगरपरिषद, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित प्रशासनाने समन्वयाने ठोस उपाययोजना करणे गरजेचे आहे. नागरिकांच्या दैनंदिन जीवनाशी निगडित असलेल्या या प्रश्नाकडे आता तातडीने लक्ष देऊन केवळ तात्पुरत्या उपायांऐवजी कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी अपेक्षा शिरूरकर व्यक्त करीत आहेत.

- रविंद्र भोसले, उपविभागीय पोलीस अधिकारी, शिरूर

# 'बम बम भोले'च्या जयघोषात चार किलोमीटरची कावड यात्रा

■ शिरूर (दै. संध्या)

श्रावण महिन्यातील दुसऱ्या सोमवारी घोडनदीच्या पवित्र जलाने शिरूर येथील प्रभू श्री रामलिंग महाराजांचा विधिवत अभिषेक करण्यात आला. शिवभक्तांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या कावड यात्रेत पहाटेपासून मोठ्या संख्येने रामलिंगप्रेमी व शिवभक्त सहभागी झाले होते. 'बम बम भोले'च्या जयघोषाने शिरूर परिसर भक्तिमय झाला होता.

पहाटे दोन वाजता शिवभक्त घोडनदीच्या तीरावर एकत्र आले. गंगापूजन करून कावडीमध्ये पवित्र जल भरण्यात आले. त्यानंतर पहाटे अडीच वाजता रामलिंग पायी वारीचे संतोषभाऊ गवळी, सदानंद लांडे, शिवभक्त लक्ष्मण धोत्रे मिस्तरी, शिवभक्त वाळुंज, पठारे साहेब, शिवभक्त चंद्रकांत घावटे (मामा), श्याम कोळपकर, अशोक भोसले, गोपीनाथ पठारे यांच्यासह रामलिंगप्रेमी व शिवभक्तांनी कावड घेऊन रामलिंग मंदिराकडे पायी प्रस्थान केले. सुमारे चार किलोमीटरची ही कावड यात्रा 'बम बम भोले'च्या जयघोषात, भजन आणि भक्तिमय वातावरणात पार पडली. मंदिरात कावड पोहोचल्यानंतर



घोडनदीच्या पवित्र जलाने प्रभू श्री रामलिंग महाराजांचा विधिवत अभिषेक करण्यात आला.

त्यानंतर महाआरती करण्यात आली. रात्रभर जागरण करून शिवभक्तांनी या धार्मिक उपक्रमात उत्स्फूर्त सहभाग घेतला. शिरूर येथील रामलिंग मंदिराबाबत धार्मिक आख्यायिका प्रचलित असून, प्रभू श्रीराम वनवासात असताना शिरूर परिसरात आले होते. त्यावेळी त्यांनी स्वतः शिवपिंडीची स्थापना केल्याचे सांगितले जाते. त्यामुळे रामलिंग मंदिरातील शिवलिंगाला प्रभू श्रीरामांनी स्थापित केलेले शिवलिंग म्हणून विशेष धार्मिक महत्त्व प्राप्त झाले आहे.

# भीमाशंकर साखर कारखान्याकडे अधिकृत सभासदत्वाची मागणी

■ कवठे येमाई (दै. संध्या)

शिरूर तालुक्यातील आंबेगाव विधानसभा मतदारसंघाशी जोडलेल्या ४२ गावांतील ऊस उत्पादक शेतकऱ्यांच्या अधिकृत सभासदत्वाचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. या गावांतील शेतकऱ्यांच्या शिष्टमंडळाने भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या कार्यालयात भेट देऊन कारखान्याच्या कार्यक्षेत्रात शिरूर तालुक्यातील या ४२ गावांचा समावेश करावा, तसेच अनामत शेअर्स भरलेल्या शेतकऱ्यांना कायमस्वरूपी अधिकृत सभासदत्व द्यावे, अशी जोरदार मागणी केली आहे. तर या प्रश्नी भीमाशंकर साखर कारखान्याचे उपाध्यक्ष प्रदीपदादा वळसे पाटील यांना थेट विचारणा केली असता कारखान्यास आंबेगाव तालुक्यातील १०३ गावे आधीच जोडलेली असून या पेक्षा अधिक म्हणजे शिरूर तालुक्यातील ४२ गावातील ऊस उत्पादक शेतकरी जर भीमाशंकर कारखान्यास जोडले जावेत ही शिरूरकरांची मागणी कारखाना व्यव्यस्थापनाच्या हातात नसून या प्रश्नी केवळ साखर आयुक्तांचा निर्णय अंतिम असल्याने शिरूर मधील ४२ गावातील ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी साखर



आयुक्तांकडे तशा प्रकारचा मागणी प्रस्ताव सादर करावा असे आवाहन केले आहे. शिरूर मधील शिष्टमंडळाने नुकतीच कारखान्याचे चेअरमन बाळासाहेब बेंडे, व्हा. चेअरमन प्रदीपदादा वळसे पाटील तसेच संचालक मंडळाची भेट घेऊन याबाबतचे निवेदन सादर केले. सभासदत्व आणि कार्यक्षेत्रातील ४२ गावांचा समावेश हे दोन्ही विषय कारखान्याच्या आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषय पत्रिकेवर घेण्यात यावेत, अशी मागणी ही निवेदनाद्वारे करण्यात आली. भीमाशंकर सहकारी साखर कारखान्याच्या स्थापनेपासून शिरूरच्या ४२ गावांतील शेतकऱ्यांनी शेअर्स खरेदी करून कारखान्याला सातत्याने मोठ्या प्रमाणात ऊस पुरवठा केला आहे. कारखान्याशी आर्थिक व व्यावसायिक संबंध सातत्याने ठेवूनही या शेतकऱ्यांना अद्याप अधिकृत सभासदत्व मिळालेले नसल्याने शेतकऱ्यांमध्ये नाराजी आहे.





दैनिक
नि:पक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
संध्या




थोडक्यात पण महत्वाचे

## एसआयआरच्या पुढील टप्प्यातील प्रक्रिया सुलभ

छत्रपती संभाजीनगर : विशेष सखोल पुनरीक्षणाच्या पुढील टप्प्यात प्रारूप मतदार यादीच्या अनुषंगाने प्राप्त होणाऱ्या अर्ज, सूचना व हरकतींवर तत्परतेने कार्यवाही करण्यासाठी सक्षम यंत्रणा सज्ज ठेवावी. मतदार यादीतील नोंदींची पडताळणी, नमुना क्रमांक ६, ७ व ८ मधील अर्जांवर कार्यवाही आणि आवश्यक दुरुस्त्या नियमानुसार पूर्ण करताना प्रक्रिया सुलभ, पारदर्शक व नागरिकाभिमुख ठेवावी, असे निर्देश मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले. छत्रपती संभाजीनगर विभागातील विशेष सखोल पुनरीक्षणाच्या कामाचा श्री. चोक्कलिंगम यांनी स्मार्ट सिटी कार्यालयात आढावा घेतला. त्यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी विभागीय आयुक्त जी. श्रीकांत, छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी विनय गौडा जी. सी., जालना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, बीड जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, नांदेड जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, परभणी जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण, लातूर जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, सहआयुक्त मंजुषा मिसकर यांच्यासह संबंधित आठही जिल्ह्यांतील उपजिल्हा निवडणूक अधिकारी, निवडणूक नोंदणी अधिकारी, सहाय्यक निवडणूक नोंदणी अधिकारी तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## महामार्गाची पालकमंत्री यांच्याकडून पाहणी

रायगड : आगामी गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर मुंबई-गोवा महामार्गावरील प्रवास चाकरमान्यांसाठी सुरक्षित आणि सुखकर व्हावा, यासाठी महामार्गावरील खड्डे आणि इतर अडचणी तातडीने दूर करण्याच्या सूचना पालकमंत्री भरत गोगावले यांनी संबंधित यंत्रणांना दिल्या. महामार्गावरील अडचणींची केवळ कार्यालयीन माहिती न घेता प्रत्यक्ष पाहणी करून त्याच ठिकाणी उपाययोजनांबाबत निर्देश त्यांनी यावेळी दिले. पनवेल-पळस्पे येथून मुंबई-गोवा महामार्गाच्या पाहणी दौऱ्यास पालकमंत्री श्री. गोगावले यांनी प्रारंभ केला. यावेळी जिल्हाधिकारी किशन जावळे, पोलीस अधीक्षक आंचल दलाल, प्रांताधिकारी प्रविण पवार तसेच राष्ट्रीय महामार्ग, सार्वजनिक बांधकाम आणि जिल्ह्यातील संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते. पालकमंत्री श्री. गोगावले म्हणाले की, ज्या-ज्या ठिकाणी अडचण दिसत आहे, त्या ठिकाणी थांबून प्रत्यक्ष पाहणी करण्यात येत आहे. एका ठिकाणी सुरू असलेले काम पुढील तीन-चार दिवसांत पूर्ण करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. रस्त्यावरील खड्ड्यांमुळे वाहतुकीचा वेग कमी होऊन पुढे वाहतूक कोंडी निर्माण होते. त्यामुळे खड्डे आणि रस्त्याशी संबंधित अडचणी राहता कामा नयेत, यासाठी संबंधित यंत्रणांनी वेगाने काम करावे, असे त्यांनी स्पष्ट केले. गणेशोत्सवाच्या काळात कोकणात मोठ्या संख्येने चाकरमानी ये-जा करतात. रायगडसह रत्नागिरी, सिंधुदुर्ग आणि इतर भागांकडे जाणाऱ्या नागरिकांचा प्रवास सुरळीत व्हावा.

## रस्ते-पुलांच्या गुणवत्तेत तडजोड नको

गडचिरोली : गडचिरोली जिल्ह्यातील रस्ते व पुलांची कामे उच्च प्रतीची, सुरक्षित आणि दीर्घकाळ टिकणारी झाली पाहिजेत. कामांच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तडजोड खपवून घेतली जाणार नाही. निकृष्ट अथवा सदोष कामांची चौकशी करून दोषींवर कठोर दंडात्मक कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री (सार्वजनिक उपक्रम वगळून) शिवेंद्रराजे भोंसले यांनी आज दिला. जिल्ह्यातील सर्व पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करून आवश्यक दुरुस्ती व पुनर्बांधणीचा प्राधान्यक्रम निश्चित करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. गडचिरोली जिल्ह्यातील पुलांचा बॅकलॉग भरून काढण्यासाठी स्वतंत्र 'विशेष पॅकेज' देण्याची मागणी राज्यमंत्री तथा सहपालकमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी यावेळी केली. त्याची दखल घेत कोकणच्या धर्तीवर जिल्ह्यातील आवश्यक लहान-मोठ्या पुलांचा सर्वंकष प्रस्ताव तयार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे स्वतंत्र विशेष निधी पॅकेजची मागणी करण्यात येईल, असे मंत्री श्री भोंसले यांनी सांगितले. सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोंसले यांनी आज गडचिरोली जिल्ह्याच्या दौऱ्यादरम्यान सकाळी अडपल्ली येथील गोंडवाना विद्यापीठाच्या 'युनिव्हर्सिटी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी' (UIT) परिसराला भेट देऊन विविध कामांची प्रत्यक्ष पाहणी केली.

# आदिवासी विद्यार्थ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य

## मंत्री डॉ. अशोक वुईके : विविध मागण्यांवर शासनाची सकारात्मक कार्यवाही

■ मुंबई (दै. संध्या)

आदिवासी विकास विभागाच्या माध्यमातून राज्यातील आदिवासी विद्यार्थ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत त्यांच्या विविध मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. विद्यार्थ्यांनी आता नियमित शिक्षण, अध्ययन-अध्यापन आणि आपल्या उज्ज्वल भवितव्याकडे लक्ष केंद्रित करावे, असे आवाहन आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके यांनी माध्यमांशी संवाद साधताना केले.

आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके म्हणाले, शासकीय वसतिगृहांच्या प्रवेशाच्या वयोमर्यादेपासून ते वसतिगृहांची जागा, जात वैधता प्रमाणपत्र, आरोग्य सुविधा, पेसा अंतर्गत नोकरभरती आणि भोजन व्यवस्थेपर्यंत विद्यार्थ्यांनी मांडलेल्या विविध प्रश्नांवर शासनाने तातडीने कार्यवाही सुरू केली आहे. आदिवासी विकास विभागामार्फत राज्यात ४९० शासकीय वसतिगृहे सुरू आहेत. वसतिगृह प्रवेशासाठी वयोमर्यादा निश्चित करण्याच्या उद्देशाने ५ ऑगस्टला शासन निर्णय काढून ती २६ वर्षे करण्यात आली होती. विद्यार्थ्यांच्या भावना आणि सूचनांचा विचार करून १४ ऑगस्टला वयोमर्यादा ३० वर्षे करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांशी सविस्तर संवाद साधण्यात आला. विद्यार्थ्यांच्या हिताचा विचार करून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा केल्यानंतर ५ आणि १४ ऑगस्टचा शासन निर्णय २५ ऑगस्टला रद्द करण्यात आला आहे. विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून त्यांच्या सर्व मागण्या मान्य करण्यात आल्याचे मंत्री डॉ. वुईके यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.



आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक वुईके म्हणाले, पुणे येथे विद्यार्थ्यांसोबत झालेल्या प्रदीर्घ चर्चेत विविध प्रश्न मांडण्यात आले. पुणे विद्यापीठाच्या कुलगुरूंशी चर्चा करून विद्यापीठ परिसरात आदिवासी मुला-मुलींसाठी वसतिगृह उभारण्याची ग्वाही देण्यात आली आहे. येत्या काळात पुणे विद्यापीठ परिसरात हे वसतिगृह उभारण्याची कार्यवाही करण्यात येणार आहे. जात वैधता प्रमाणपत्राबाबतही संबंधित सर्व विभागांना लेखी सूचना देण्यात आल्या असून, वैधता प्रमाणपत्राशिवाय पदवी न देण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्नही गांभीर्याने घेण्यात आला आहे. साप किंवा विंचू चावण्याच्या घटनांसंदर्भात संबंधित परिसरातील वैद्यकीय महाविद्यालये आणि प्राथमिक आरोग्य केंद्रांना आवश्यक दक्षता व आरोग्य सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत पत्र देण्यात आले आहे. विद्यार्थ्यांना सुरक्षित आणि चांगले शैक्षणिक वातावरण मिळावे, यासाठी विभाग सातत्याने प्रयत्नशील आहे. 'पेसा'अंतर्गत नोकरभरतीसंदर्भात सकारात्मक पावले उचलण्यात आली आहेत. छोट्या संवर्गातील अनुसूचित जमातीच्या बिंदूनामावलीतील स्थानाबाबत समिती गठित करण्यात आली असून, हा प्रश्न सोडविण्यासाठी शासन कटिबद्ध आहे.

डीबीटी आणि सेंट्रल किचन हे धोरणात्मक विषय असल्याने त्याबाबत निर्णय घेण्यासाठी वेळ देण्यास विद्यार्थ्यांनी संमती दर्शविली आहे. राज्यातील १३ सेंट्रल किचनच्या माध्यमातून सुमारे सव्वादोन लाख विद्यार्थ्यांना भोजन मिळते याबाबतचा निर्णय चर्चा आणि अभ्यासानंतर घेण्यात येणार आहे. विद्यार्थ्यांनी मांडलेल्या प्रत्येक प्रश्नाची नोंद घेऊन त्यावर कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांच्या मागण्यांना लेखी स्वरूपात सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला आहे. शासन विद्यार्थ्यांच्या विविध प्रश्नांवर सकारात्मक कार्यवाही करत असून, त्यामुळे विद्यार्थ्यांना दिलासा मिळणार आहे. विद्यार्थ्यांनी नियमित अभ्यासाकडे लक्ष केंद्रित करुन उज्ज्वल भवितव्याची भक्कम पायाभरणी करावी.

# नक्षलोत्तर गडचिरोली : समृद्धीच्या नव्या क्षितिजांकडे

**स्वतंत्र जिल्हा म्हणून अस्तित्वात आलेला गडचिरोली आज परिवर्तनाच्या ऐतिहासिक आणि निर्णायक टप्प्यावर उभा आहे. घनदाट अरण्ये, विपुल खनिजसंपदा, समृद्ध जैवविविधता आणि वैशिष्ट्यपूर्ण आदिवासी संस्कृती लाभलेल्या या जिल्ह्याची अनेक दशके 'अतिदुर्गम आणि नक्षलग्रस्त' अशी ओळख होती. मात्र, आता ही ओळख वेगाने बदलत आहे. एकेकाळी नक्षलवादाच्या सावटामुळे विकासाच्या संधींपासून दूर राहिलेला गडचिरोली आज शांतता, सुरक्षितता, उद्योग, आधुनिक पायाभूत सुविधा आणि मानवी विकासाच्या बळावर महाराष्ट्राचे नवे विकास केंद्र म्हणून आकार घेत आहे.**

मुख्यमंत्री तथा पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली सुरक्षा आणि विकास या दोन्ही आघाड्यांवर सातत्याने झालेल्या प्रयत्नांमुळे जिल्ह्यात शांतता आणि स्थैर्याचा मजबूत पाया निर्माण झाला आहे. पोलीस व केंद्रीय सुरक्षा दलांच्या प्रभावी मोहिमा, आत्मसमर्पण व पुनर्वसन धोरण आणि दुर्गम भागांतील सुरक्षा यंत्रणेची वाढलेली उपस्थिती यामुळे नक्षलवादाचा प्रभाव जवळपास संपुष्टात आला. त्यातून प्रशासनाची पोहोच वाढली आणि वर्षानुवर्षे रखडलेल्या विकासकामांना गती मिळाली. भयाचे वातावरण कमी होत असताना नागरिकांचा शासन आणि लोकशाही व्यवस्थेवरील विश्वासही दृढ होत आहे.

गडचिरोली पोलीस दलाने पारंपरिक सुरक्षा भूमिकेपलीकडे जाऊन 'पोलीस दादालोरा खिडकी'च्या माध्यमातून शासन आणि दुर्गम आदिवासी समाज यांच्यात विश्वासाचा महत्त्वाचा दुवा निर्माण केला आहे. शासकीय योजना, प्रमाणपत्रे, आरोग्य सेवा, रोजगार आणि कौशल्य प्रशिक्षण नागरिकांपर्यंत पोहोचविण्यात या उपक्रमाची महत्त्वाची भूमिका आहे. शरणागत नक्षलवाद्यांना साक्षरता आणि रोजगाराभिमुख प्रशिक्षण देऊन समाजाच्या मुख्य प्रवाहात स्थिर करण्याचे प्रयत्नही सुरू आहेत.

या बदलाचे आश्वासक प्रतिबिंब लोकशाही प्रक्रियेत दिसते. एकेकाळी निवडणुकांवर बहिष्काराचे आवाहन होत असलेल्या दुर्गम व अतिसंवेदनशील भागांतही नागरिक आता निर्भयपणे मतदानासाठी पुढे येत आहेत. २०२४ मधील लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांतील विक्रमी मतदान हे भयातून विश्वासाकडे झालेल्या वाटचालीचे प्रतीक ठरले.

नक्षलोत्तर गडचिरोलीमध्ये प्रशासनाची कार्यपद्धतीही बदलत आहे. धरती आबा, विशेष सर्वेक्षण, सेवा समृद्धी, छत्रपती शिवाजी महाराज राजस्व अभियान आणि ग्रामसंवाद कार्यक्रमांच्या माध्यमातून अधिकारी दुर्गम गावांत जाऊन नागरिकांशी थेट संवाद साधत आहेत. गुरनोली येथे राज्याच्या मुख्य सचिवांनी नागरिकांशी संवाद साधला, तर एकेकाळी नक्षलवादाचा बालेकिल्ला मानल्या जाणाऱ्या बिनागुंडा येथे जिल्हाधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेट देऊन नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. नागरिकांनी प्रशासनाकडे येण्याची वाट पाहण्याऐवजी प्रशासनाने नागरिकांपर्यंत पोहोचावे, अशी नवी कार्यसंस्कृती विकसित होत आहे.

वेगाने होणारे औद्योगिकीकरण आणि नागरीकरण लक्षात घेऊन संपूर्ण महसूल जिल्ह्यासाठी स्वतंत्र 'गडचिरोली प्रदेश' घोषित करण्यात आला आहे. त्यामुळे औद्योगिक विकास, कृषी, वन, वाहतूक, निवासी गरजा आणि पर्यावरण




यांचा समतोल राखत दीर्घकालीन विकासाला दिशा मिळणार आहे.

गडचिरोलीच्या विकासकथेतील सर्वाधिक दृश्यमान बदल म्हणजे संपर्क सुविधांचा विस्तार. पूर्वी पावसाळ्यात जगापासून तुटणाऱ्या अनेक भागांना बारमाही रस्ते आणि पूल जोडत आहेत. दिना नदीवरील उच्चस्तरीय पूल पूर्ण झाला असून इंद्रावती, बांडिया, पर्लकोटा आणि गुंडेनूर नद्यांवरील मोठ्या पुलांची उभारणीही सुरू आहे.

चामोर्शी–मुलचेरा–अहेरी, पारवा–कोरची, शंकरपूर–गुरनोली, अहेरी–सिरोंचा यांसारख्या महत्त्वाच्या मार्गांची सुधारणा होत आहे. औद्योगिक व खनिज वाहतुकीसाठी मंजूर नवेगाव मोरे–कोनसरी–सुरजागड सुमारे ८६ किलोमीटर मार्ग, तसेच सुमारे ९४ किलोमीटरचा भंडारा–गडचिरोली समृद्धी महामार्ग जिल्ह्याच्या आर्थिक दळणवळणासाठी महत्त्वाचे ठरणार आहेत.

वडसा–गडचिरोली सुमारे ५२.६८ किलोमीटर ब्रॉडगेज रेल्वे प्रकल्पामुळे गडचिरोली शहर थेट रेल्वेच्या नकाशावर येणार आहे. गोंदिया–बल्लारशाह रेल्वेमार्ग दुहेरीकरण तसेच गडचिरोली–भानुप्रतापपूर आणि गडचिरोली–भाचेली प्रस्तावित रेल्वे संपर्कामुळे भविष्यात औद्योगिक व व्यापारी जोडणी आणखी मजबूत होईल. ग्रीनफिल्ड विमानतळाच्या नियोजनालाही चालना मिळत आहे.

भौतिक संपर्कासोबत डिजिटल दरीही कमी होत आहे. विविध योजनांतर्गत ५०० हून अधिक मोबाईल टॉवर्स कार्यान्वित झाले असून भारतनेटच्या विस्तारामुळे ई-गव्हर्नन्स, डिजिटल बँकिंग, ऑनलाइन शिक्षण, टेलिमेडिसिन आणि शासकीय ई-सेवा दुर्गम भागांपर्यंत पोहोचत आहेत.

सुरजागडसह जिल्ह्यातील विपुल लोहखनिज साठ्यांमुळे गडचिरोली देशातील प्रमुख एकात्मिक पोलाद उत्पादन केंद्र म्हणून आकार घेत आहे. पोलाद क्षेत्रात सुमारे तीन लाख कोटी रुपयांपर्यंत संभाव्य गुंतवणुकीची क्षमता व्यक्त करण्यात आली आहे. या उद्योगांभोवती पूरक लघु-मध्यम उद्योग, लॉजिस्टिक्स, वाहतूक, दुरुस्ती, सेवा आणि स्थानिक पुरवठा साखळी निर्माण होण्याची मोठी क्षमता आहे. त्यामुळे औद्योगिकीकरणाचा केंद्रबिंदू केवळ खनिज उत्खनन न राहता स्थानिक रोजगार, कौशल्य विकास, उद्योजकता आणि मूल्यवर्धित उत्पादन हा बनत आहे. खनिज प्रतिष्ठानमध्ये संकलित झालेल्या १,०२४ कोटी रुपयांहून अधिक निधीतून ५४८ कोटी रुपयांपेक्षा अधिक किमतीचे १,६०० हून अधिक प्रकल्प मंजूर करण्यात आले आहेत. रस्ते, पिण्याचे पाणी, आरोग्य, शिक्षण आणि उपजीविका यांसारख्या उच्च प्राधान्य क्षेत्रांवर ६५ टक्क्यांपेक्षा अधिक निधी केंद्रित करण्यात येत आहे. भूमीतून मिळणारी खनिज संपत्ती नागरिकांच्या जीवनमान उन्नतीसाठी वापरण्याचा हा महत्त्वाचा प्रयत्न आहे.

वाढत्या औद्योगिकीकरणाचा लाभ स्थानिक युवकांना मिळावा यासाठी कौशल्य विकासाला रोजगाराशी जोडण्यात येत आहे. CIIIT, HCLTechच्या 'Earn While You Learn', महिंद्रा अँड महिंद्राच्या ट्रॅक्टर सर्व्हिस मेकॅनिक प्रशिक्षणासह 'NAVYA' अंतर्गत महिला व युवतींसाठी रोजगाराभिमुख प्रशिक्षण राबविण्यात येत आहे.

खाणकाम, यंत्रसामग्री, बांबू व वनोपज प्रक्रिया आणि कृषीपूरक व्यवसायांतील प्रशिक्षणातून स्थानिक रोजगार, स्वयंरोजगार आणि उद्योजकतेच्या संधी विस्तारत आहेत. ग्रामीण विकासासाठी जलसुरक्षेला विशेष महत्त्व देण्यात आले आहे. जलयुक्त शिवार २.० आणि प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना २.० अंतर्गत ६,०१५ जलसंधारण कामे पूर्ण झाली आहेत.

# शाळा इमारतीचे पालकमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते लोकार्पण

■ परभणी (दै. संध्या)

जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, देऊळगाव गात (ता. सेलू) येथे सुमारे पावणेतीन कोटी रुपये खर्चातून उभारण्यात आलेल्या सुसज्ज शालेय इमारतीचे लोकार्पण पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या हस्ते करण्यात आले. पाचवी ते दहावीपर्यंत शिक्षण देणाऱ्या या शाळेत विद्यार्थ्यांसाठी आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

कार्यक्रमास जिल्हा परिषद अध्यक्ष लता वाकळे, सेलूचे नगराध्यक्ष मिलिंद सावंत, जिल्हा परिषद सदस्य प्रीती डख, अजय डासाळकर, पंचायत समिती सदस्य शिवराम कदम, गटविकास अधिकारी उदय जाधव, गटशिक्षणाधिकारी गजानन वाघमारे, शालेय शिक्षण समितीचे अध्यक्ष माऊली कदम आदी उपस्थित होते.

सन १९४३ मध्ये स्थापन झालेल्या या शाळेत सध्या पाचवी ते दहावीपर्यंत सुमारे ३५० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. विविध शालेय स्पर्धा, परीक्षा तसेच ज्ञान-विज्ञानविषयक उपक्रमांमध्ये विद्यार्थी सहभागी होत असून, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत विविध उपक्रम राबविले जात आहेत. यावेळी पालकमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर म्हणाल्या की, देऊळगाव गात येथे खासगी शाळांनाही लाजवेल अशी सुसज्ज शाळेची इमारत उभी राहिली आहे. विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे शिक्षण त्यांच्या परिसरातच मिळावे, यासाठी अशा शाळा विकसित होणे आवश्यक आहे. पंचक्रोशीतील विद्यार्थ्यांनी या शाळेचा लाभ घ्यावा. शाळा सुसज्ज झाल्याने विद्यार्थी, शिक्षक, पालक आणि ग्रामस्थांची जबाबदारीही वाढली आहे. केवळ नोकरी मिळविण्यासाठी नव्हे, तर उद्यमशीलता निर्माण करणारे शिक्षण आवश्यक आहे, असे सांगून पालकमंत्र्यांनी कौशल्याधारित शिक्षणावर भर देण्याचे आवाहन केले. प्रत्येक विद्यार्थ्याच्या आवडीनुसार त्याला विविध क्षेत्रांत संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे. आज विविध क्षेत्रांत मोठ्या संधी उपलब्ध असून, त्या संधींचे सोने करण्यासाठी विद्यार्थ्यांमध्ये ज्ञान, कौशल्य आणि आत्मविश्वास निर्माण करणे गरजेचे आहे, असे त्यांनी नमूद केले. समाजातील सर्वच घटकांतील विद्यार्थ्यांना मोठ्या शहरांमध्ये जाऊन शिक्षण घेणे शक्य होत नाही. त्यामुळे त्याच तोडीच्या शैक्षणिक सुविधा ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे महत्त्वाचे आहे. या शाळेतील प्रयोगशाळा, टिंक लॅब आणि डिजिटल सुविधांचा विद्यार्थ्यांनी प्रभावी वापर करून प्रयोगशील व नवोन्मेषी विचार विकसित करावा, असे आवाहन त्यांनी केले.

# एसआयआरचा पहिला टप्पा यशस्वी; आता प्रारुप मतदार यादी

■ नाशिक (दै. संध्या)

विशेष सखोल पुनरीक्षणाच्या (SIR) पहिल्या टप्प्यातील हाऊस-टू-हाऊस सर्व्हेचे काम मुदतवाढीसह निर्धारित कालावधीत पूर्ण करण्यात आले आहे. आता एसआयआरच्या पुढील टप्प्यात प्रारुप मतदार यादी, हरकती-सुनावणी आणि त्यानंतरच्या कार्यवाहीचे काटेकोर नियोजन करावे, अनुपस्थित, स्थलांतरित, मृत आणि दुबार नोंद असलेल्या मतदारांबाबत गैरसमज निर्माण होणार नाहीत, याची विशेष दक्षता घ्यावी, असे निर्देश मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांनी दिले.

नाशिक विभागातील एसआयआरच्या कामाचा आढावा घेण्यासाठी विभागीय आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत ते बोलत होते. बैठकीस विभागीय आयुक्त डॉ.प्रवीण गेडाम, जिल्हाधिकारी (नाशिक) आयुष प्रसाद, जिल्हाधिकारी (धुळे) भाग्यश्री विसपुते, जिल्हाधिकारी (अहिल्यानगर) डॉ.पंकज आशिया, जिल्हाधिकारी (जळगाव) रोहन घुगे, जिल्हाधिकारी (नंदुरबार) डॉ.मिताली सेठी, तसेच नाशिक विभागातील सर्व उप जिल्हा निवडणूक अधिकारी, तसेच मतदान नोंदणी अधिकारी उपस्थित होते.

मुख्य निवडणूक अधिकारी श्री. चोक्कलिंगम म्हणाले की, सर्व जिल्हाधिकारी आणि त्यांच्या पथकांनी एसआयआरचा पहिला टप्पा निर्धारित कालावधीत पूर्ण केला. पहिल्या टप्प्यात संबंधित मतदार प्रत्यक्ष त्या ठिकाणी वास्तव्यास आहे किंवा नाही, याची पडताळणी करण्यात आली. एन्यूमरेशन फॉर्म, उपलब्ध निवडणूक नोंदींच्या आधारे मतदार नोंदींचे मॅपिंग करण्यात आले. यामुळे एसआरआयचा पहिला टप्पा पूर्ण झाला आहे. आता दुसऱ्या टप्प्यासाठी यंत्रणेने सज्ज राहावे. इलेक्ट्रॉनिक रोल प्रिंटचे काम त्वरीत पूर्ण करावे. प्रारुप मतदार यादी प्रसिद्धी झाल्यावर निवडणूक अधिकाऱ्यांनी सक्रिय राहून नागरिकांना प्रक्रियेबाबत अचूक माहिती द्यावी. मतदार यादीत वगळलेल्या मतदारांचे काही आक्षेप असतील तर त्याचे निराकरण करावे. तसेच मतदाराचे नाव वगळलेल्यांना त्यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केल्यानंतर नमुना क्रमांक 6 भरुन देण्याबाबत अवगत करावे. निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार नोटीस बजावणी, कागदपत्रांचे संकलन आणि प्राथमिक पडताळणीसाठी योग्य पद्धतीचा अवलंब करण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे



### आर्वी केंद्र शाळेच्या विद्यार्थ्यांना दप्तर वाटप

**नारायणगाव : दैनिक संध्या**

विश्वसाहित्यिक अण्णाभाऊ साठे जयंतीनिमित्त आर्वीकेंद्र शाळेतील विद्यार्थ्यांना ग्रामपंचायत वारुळवाडी व हलगी सम्राट केरबा पाटील फाऊंडेशन, नारायणगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दप्तर वाटप करण्यात आले.वारुळवाडी ग्रामपंचायत येथे अण्णाभाऊ साठे जयंती सोहळा उत्साहात संपन्न झाला. हलगी सम्राट केरबा पाटील फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष श्री. काशिनाथ आल्हाट सर व प्राध्यापिका सौ.रतन आल्हाट मॅडम यांच्या संकल्पनेतून आर्वीकेंद्र शाळेतील गरजू व गोरगरीब विद्यार्थ्यांना दप्तरांचे वाटप करण्यात आले. जिल्हा परिषद आर्वी केंद्र शाळा ही जुन्नर तालुक्यात आदर्श शाळांपैकी एक आदर्श शाळा आहे. या शाळेत विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबवले जातात. या सामाजिक उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद फुलला. या कार्यक्रमास गुंजाळवाडी केंद्राच्या आदर्श केंद्रप्रमुख शोभा डोंगरे मॅडम तसेच पीडीसीसी बँकेचे सेवानिवृत्त अधिकारी आदरणीय सुरेश डोंगरे साहेब यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांच्या स्वप्नांना नवी वाट"असा प्रगल्भ विचार या शाळेच्या मुख्याध्यापिका सौ. भारती कनिंगध्वज -आल्हाट आणि श्री साईनाथ कनिंगध्वज सर या शिक्षकांचा मनात संकल्पना असते. विद्यार्थ्यांचा शैक्षणिक दर्जा उंचवण्यासाठी ते सतत कृतिशील असतात. कला, क्रीडा, साहित्य या क्षेत्रात त्यांच्या अनेक विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय कार्य केलेले आहे .

### तरुणीला लॉजवर बोलावून दोन दिवस सामूहिक अत्याचार; सात जणांविरुद्ध गुन्हा

**शिरूर : दैनिक संध्या**

जास्त व चांगल्या पगाराचे काम देण्याचे आमिष दाखवून एका २२ वर्षीय परप्रांतीय तरुणीला शिरूर येथे बोलावून एका लॉजमध्ये दोन दिवस ठेवत तिच्यावर सामूहिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी शिरूर पोलिसांनी सात जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला असून, एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. या घटनेने शिरूर शहरात खळबळ उडाली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मूळची छत्तीसगड राज्यातील असलेली संबंधित तरुणी सध्या चाकण येथे वास्तव्यास होती. आरोपींनी तिच्याशी संपर्क साधून चांगल्या पगाराचे काम देण्याचे आमिष दाखविले. त्यानंतर तिला त्यांच्या मोटारीतून शिरूरला आणण्यात आले. बुधवार, दि. १९ ऑगस्ट रोजी तिला शिरूर शहरातील एका लॉजवर नेण्यात आले. तेथे तिला नशा येणारी पावडर खायला दिल्याचा तसेच त्यानंतर एका खोलीमध्ये दोन दिवस तिच्यावर अत्याचार केल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या प्रकरणी दीपक श्रीमंदीलकर (रा. जुने शिरूर, ता. शिरूर), अजय माणिक घेगडे (रा. माठ, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर), दीपक दत्तात्रय भोसले व अनिकेत दिलीप पठारे (दोघे रा. मावळेवाडी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर), ऋषिकेश रामदास ढवळे व सागर रघु ढवळे (दोघे रा. ढवळगाव, ता. श्रीगोंदा, जि. अहिल्यानगर) तसेच एका अनोळखी व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, शुक्रवारी संबंधित तरुणीने पोलिस मदत नियंत्रण कक्षाच्या ११२ क्रमांकावर संपर्क साधून आपल्यावरील अत्याचाराची माहिती देत मदतीची मागणी केली. माहिती मिळताच पोलीस निरीक्षक विनोद पाटील, पोलीस उपनिरीक्षक हणमंत नकाते आणि पोलीस उपनिरीक्षक शुभम चव्हाण यांनी संबंधित लॉजवर जाऊन तरुणीची सुटका केली. त्यानंतर तिच्या फिर्यादीवरून सात जणांविरुद्ध शिरूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्हा दाखल झाल्यानंतर पोलिसांनी आरोपींचा शोध सुरू केला असून, अनिकेत पठारे याला पोलिसांनी अटक केली आहे. शिरूर न्यायालयाने त्याला सोमवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे. उर्वरित आरोपींचा शोध घेण्यासाठी पोलिसांकडून तपास सुरू आहे. घटनास्थळावरील उपलब्ध पुरावे, संबंधित व्यक्तींची माहिती तसेच तांत्रिक व भौतिक पुराव्यांच्या आधारे तपास करण्यात येत आहे. या प्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक हणमंत नकाते करीत आहेत. गुन्हा दाखल करण्याची कार्यवाही पोलीस उपनिरीक्षक चव्हाण यांनी केली असून, पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

### बेघर नागरिकांसाठी राज्य शासनाचा अंतिम आदेश जारी, दीपक ताटे यांनी दिली माहिती

**चाकण : दैनिक संध्या**

चाकण पंचक्रोशीतील तब्बल पाच हजार बेघर नागरिकांसाठी महाराष्ट्र शासनाकडून अंतिम आदेश जारी करण्यात आल्याची माहिती भापसे पार्टीचे पक्ष प्रमुख दिपक ताटे यांनी दिली. ताटे यांच्या कायदेशीर लढ्याला मंत्रालयीन पातळीवर सर्वोच्य यश आले आहे. खेड तालुक्यातील सरकारी जमीन गट क्रमांक ५९१, ४७४ आणि १४२ वर ५,००० बेघर नागरिकांना हक्काचे निवासी भूखंड मिळण्याचा मार्ग आता कायद्याने मोकळा झाला आहे. मंत्रालयातून महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने पत्र क्र. जमीन-३४२५/प्र.क्र.५४७/जमीन-५, दि. १२/०८/२०२६ अन्वये जिल्हाधिकारी, पुणे यांना या जागेचा परिपूर्ण तांत्रिक प्रस्ताव सादर करण्याचे थेट आदेश दिले आहेत. भारतीय परिवर्तन सेना आणि समस्त लोकायुक्त कार्यालय, मुंबई (खटला क्रमांक १४५५५६/२०२६) येथे केलेल्या यशस्वी कायदेशीर लढ्यामुळे थेट राज्य सरकारने या प्रकरणात अंतिम हस्तक्षेप केला आहे. संविधानाच्या कलम १६६ च्या तरतुदीनुसार निघालेल्या या आदेशात, मंत्रालयाने पुण्याच्या जिल्हाधिकाऱ्यांना शासन निर्णय दि. ०९/०२/२०१० च्या अन्वये "कोणतीही अतिरिक्त जाचक अट न लावता" 'अ, ब, क व ड' विहित नमुन्यातील परिपूर्ण प्रस्ताव तात्काळ सादर करण्याचे सक्त वैधानिक निर्देश दिले आहेत. प्रत्यक्ष शासकीय मोजणीचा मार्ग मोकळा झाला आहे. भापसे पार्टीचे अध्यक्ष दिपक ताटे यांनी दिलेल्या माहितीनुसार, या जागेची 'अति तातडीची शासकीय मोजणी फी' चलन क्रमांक ३४६३, ३४६४ व ३४६५ अन्वये आधीच शासकीय तिजोरीत भरलेली आहे. लोकायुक्त कार्यालयाच्या ०८ सप्टेंबर २०२६ च्या अंतिम मुदतीपूर्वी भूमी अभिलेख विभाग खेड पोलिसांच्या कडक बंदोबस्तात प्रत्यक्ष जागेवर मोजणी व ले-आऊट सीमांकन पूर्ण करण्यात येणार आहे. तब्बल पाच हजार बेघरांचा ऐतिहासिक विजय झाला आहे. आता थेट गुलाल उधळणार आणि हक्काचे घरकुल उभे राहणार आहे. मंत्रालयाच्या या पोलादी हुकुमामुळे पहिल्या टप्प्यातील ८५५ बेघर बांधवांच्या हक्काच्या जागेचा सातबारा आणि मालकी हक्क आता शासकीय रेकॉर्डवर शंभर टक्के कायमचा लॉक झाला आहे. दिपक ताटे यांच्या ११ वर्षांच्या अखंड रक्ताच्या पाण्याचे आणि भीमथडी क्रांतीचे अखेर सोने झाले असून, ५,००० बेघर कुटुंबांच्या वनवासाला या आदेशाने पूर्णविराम मिळाला आहे. हा लढा केवळ जागेचा नसून गरिबांच्या स्वाभिमानाचा होता आणि तो आपण कायदेशीररीत्या जिंकला असल्याचे ताटे यांनी सांगितले. मौजे चांदूस येथील रण मैदानावर आपल्या हक्काच्या जमिनीवर गुलाल उधळला जाणार आहे. राहिलेल्या बेघर नागरिकांचे प्रमाणित प्रपत्र (फॉर्म) ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत चाकण मुख्य कार्यालयात सन्मानाने नोंदवून घेतले जातील. या ऐतिहासिक महाविजयाबद्दल संपूर्ण खेड, चाकण परिसरात बेघर बांधवांकडून फटाक्यांची आतिषबाजी करून आणि पेढे भरवून दिपक ताटे यांच्या पोलादी नेतृत्वाचा जयजयकार केला जात आहे. "प्रत्येक बेघरांच्या डोक्यावर हक्काचे छप्पर उभे राहणार आहे. सातत्याने केलेला पाठपुरावा आणि बेघरांचा सहभाग यामुळेच भापसेला हे यश मिळाले आहे." - दीपक ताटे, भापसे पार्टी, अध्यक्ष, असे सांगितले.

# सासवड नगरपरिषदेला सीएसआर मधून कंपोस्ट मशीन

## सीगेट टेक्नॉलॉजी आणि आरुष वेल्फेअरचा महत्त्वपूर्ण उपक्रम




**■ सासवड (दै. संध्या)**

ओल्या कचऱ्यावर प्रक्रिया करून खत निर्मिती करण्यासाठी सासवड नगरपरिषदेस येथील इस्कॉन केंद्राच्या प्रयत्नातून, पुण्यातील सीगेट टेक्नॉलॉजी व उत्तर प्रदेशातील आरुष वेल्फेअर सोसायटी यांच्या संयुक्त विद्यमाने, सीएसआर निधीअंतर्गत दिलेल्या दोन अत्याधुनिक कंपोस्ट मशीनचे उदघाटन गुरुवारी (ता.२७) जिजामाता उद्यानात नगराध्यक्षा आनंदीकाकी जगताप यांच्या हस्ते व सीगेटच्या सीएसआर प्रमुख निधी गोयल, आरुष वेल्फेअरच्या अध्यक्षा अंकिता श्रीवास्तव, मुख्याधिकारी डॉ. कैलास चव्हाण, उपनगराध्यक्ष मनोहर जगताप, गटनेते अजित जगताप, इस्कॉनचे सुंदरवरदास यांच्या उपस्थितीत झाले.

याप्रसंगी, आरुष वेल्फेअर सोसायटीच्या अध्यक्षा अंकिता श्रीवास्तव यांनी प्रकल्पाची माहिती देताना सांगितले की, "सासवड शहराची वाढती लोकसंख्या पाहता निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्यासाठी या मशीन अत्यंत उपयुक्त आहेत.

एकूण १६ लाख रुपये किंमतीच्या या मशीन असून, यात ३० टक्के सुका आणि ७० टक्के ओला कचरा या प्रमाणात दररोज ५०० किलो कचऱ्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. विशेष म्हणजे, अवघ्या दोन ते तीन दिवसांत याद्वारे दर्जेदार कंपोस्ट खत तयार होणार आहे."

यावेळी नगरसेविका अर्चना जगताप, लिना वढणे, नगरसेवक सोपान रणपिसे, ज्ञानेश्वर जगताप, प्रदीप राऊत, मयूर चौखंडे यांच्यासह साकेत जगताप, सुहास जगताप, ॲड. सौरभ वढणे, संतोष गिरमे, आरूष वेल्फेअरचे अशोककुमार श्रीवास्तव, राजेशकुमार श्रीवास्तव, प्रियांशी श्रीवास्तव, सीगेट टेक्नॉलॉजीचे ताराचंद भापकर, पृथ्वीराज जाधव, अभिजित केसकर, मोहीत सोहानी, गणेश ढोले, प्रकाश गोयल, इस्कॉनचे डॉ. सचिन निरगुडे, पालिकेचे ओंकार शिंदे यांसह पालिकेचे विभागप्रमुख, संस्थांचे पदाधिकारी, पालिका कर्मचारी उपस्थित होते.

जास्मीन मधाळे स्वागत, मोहन चव्हाण यांनी प्रास्ताविक, नगरसेवक ज्ञानेश्वर गिरमे यांनी सुत्रसंचलन केले तर राम कारंडे यांनी आभार मानले.

## ओल्या कचऱ्यावर जागेवरच प्रक्रिया करणे शक्य

आरोग्य सभापती राजन जगताप यांनी मनोगतात सांगितले की, "या प्रकल्पामुळे ओल्या कचऱ्यावर जागेवरच प्रक्रिया करणे शक्य होणार आहे. याद्वारे तयार होणारे कंपोस्ट खत स्थानिक शेतकरी, नगरपालिकेची उद्याने आणि शहरातील झाडांसाठी वापरले जाईल. या पर्यावरणपूरक उपक्रमामुळे सासवड शहर स्वच्छ व सुंदर होण्यास मोठी मदत होईल."

# भांडारकरांनी इतिहास संशोधनाला दिली दिशा

**■ पुणे :(दै. संध्या)**

इतिहासाची साधने हाताळणारा अभ्यासक निष्पक्ष न्यायाधीश असला पाहिजे. इतिहासाचा अभ्यास करताना केवळ ग्रंथ, आख्यायिका किंवा परंपरांवर विसंबून न राहता उपलब्ध ऐतिहासिक साधनांचे चिकित्सक परीक्षण, परस्पर तुलना आणि वस्तुनिष्ठ विश्लेषण करणे आवश्यक आहे. हीच संशोधनाची शास्त्रशुद्ध पद्धत डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांनी भारतीय इतिहासाच्या अभ्यासात रुजवली, असे प्रतिपादन भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिरचे निबंधक डॉ. श्रीनंद बापट यांनी केले.

प्रार्थना समाज, पुणे यांच्या वतीने डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या १०१व्या पुण्यतिथीनिमित्त विशेष कार्यक्रमाचे आयोजन बुधवार पेठेतील प्रार्थना समाजाच्या हरि मंदिरात करण्यात आले. यावेळी डॉ. रा. गो. भांडारकर यांना आदरांजली अर्पण करण्यात आली. प्रार्थना समाजाचे विश्वस्त व सचिव दिलीप जोग, डॉ. सुषमा जोग उपस्थित होते.




व्याख्यानात डॉ. बापट यांनी डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर यांच्या कार्याचा आढावा घेतला. त्यांचे राजकीय कार्य, प्राचीन भारताचा इतिहास, संस्कृत, भाषाशास्त्र, पुराणे, वैष्णव-शैव संप्रदाय, बौद्ध-जैन धर्मांच्या परंपरा, शिलालेख, नाणी, हस्तलिखिते तसेच विविध धर्मग्रंथांच्या आधारे भारतीय इतिहासाच्या अभ्यासासाठी त्यांनी केलेल्या संशोधनाची सविस्तर माहिती दिली. तत्पूर्वी डॉ. सुषमा जोग यांनी ईश्वरोपासना केली.

डॉ. श्रीनंद बापट म्हणाले, भांडारकर यांनी आपल्या संपूर्ण जीवनात संशोधनाचा ध्यास कधीही सोडला नाही. समाजसुधारणेच्या विचारांचा त्यांच्या संशोधनावर कधीही परिणाम होऊ दिला नाही. या दोन्ही गोष्टी त्यांनी स्वतंत्र ठेवल्या. त्यांनी वैष्णव, शैव आणि इतर धार्मिक संप्रदायांच्या इतिहासाचा तसेच धर्मग्रंथांचा चिकित्सक पद्धतीने अभ्यास करून भारतीय धर्मपरंपरेच्या ऐतिहासिक विकासावर प्रकाश टाकला. त्यांनी लिहिलेल्या ग्रंथांचा अभ्यास ११३ वर्षांनंतरही केला जात आहे, असेही त्यांनी सांगितले. दिलीप जोग म्हणाले, डॉ. रामकृष्ण गोपाळ भांडारकर हे विज्ञानवादी होते. प्रार्थना समाजाच्या कार्याशी दीर्घकाळ संबंधित असलेले ते प्रमुख समाजसुधारक होते. प्रार्थना समाजाच्या धार्मिक-सामाजिक विचारांना त्यांनी वैचारिक आधार दिला. प्रार्थना समाजाच्या सुरुवातीच्या नियमांमध्ये मूर्तिपूजा करू नये.

# रॅगिंगप्रकरणी विद्यार्थ्यांविरोधात पोलिसांत गुन्हा

**■ नारायणगाव (दै. संध्या)**

आळेफाटा येथील श्री. अनंतराव कणसे होमिओपॅथी वैद्यकीय महाविद्यालय व हॉस्पिटलच्या परिसरात एका विद्यार्थ्याला मारहाण, शिवीगाळ आणि दमदाटी करून रॅगिंग केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी आळेफाटा पोलिस ठाण्यात महाविद्यालयातील तीन विद्यार्थ्यांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेमुळे महाविद्यालयीन परिसरातील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

संबंधित विद्यार्थी महाविद्यालयात शिक्षण घेत असून, १४ ऑगस्ट रोजी सायंकाळी साडेपाचच्या सुमारास महाविद्यालयाच्या पटांगणात ही घटना घडली. तक्रारीनुसार,संबंधित विद्यार्थ्याला इतर विद्यार्थ्यांसमोर ज्युनिअर असल्याची जाणीव करून देत त्याचा अपमान करण्यात आला. त्यानंतर तिघांनी संगनमताने त्याला हाताने तसेच लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे फिर्यादीने म्हटले आहे.यावेळी शिवीगाळ करण्यात आली तसेच दमदाटी केल्याचाही आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. महाविद्यालयाच्या पटांगणात इतर विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत हा प्रकार घडल्याने परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाल्याचे सांगण्यात येत आहे. फिर्यादी विद्यार्थ्याने दिलेल्या तक्रारीनुसार, महाविद्यालयाच्या चौथ्या वर्षात शिक्षण घेणारे स्वागत पाडोळे, विवेक पाटील आणि राहुल भाबड यांनी त्याच्यासोबत रॅगिंग केल्याचा आरोप करण्यात आला आहे. घटनेनंतर संबंधित विद्यार्थ्याने आळेफाटा पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. तक्रारीची दखल घेत पोलिसांनी भारतीय न्याय संहितेतील कलम ११५(२), ३५२, ३५१(२), ३५१(३) तसेच महाराष्ट्र छळवाद प्रतिबंध अधिनियम १९९९ मधील कलम ४ अंतर्गत गुन्हा दाखल केला आहे.

# खाकीचा धाक कमी झाला का?

**■ शिरूर (दै. संध्या)**

शिरूर शहरासह तालुक्यात गेल्या काही दिवसांत घडलेल्या गंभीर गुन्हेगारी घटनांमुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे. अंमली पदार्थांची विक्री, जुगार, मटका, गुटखा, बेकायदा दारू विक्री, अवैध वाहतूक व उत्खनन यांसारख्या प्रकारांबाबत नागरिकांमध्ये नाराजी असतानाच एमडी विक्रीच्या तयारीतील संशयितांना ताब्यात घेण्याची कारवाई, नोकरीचे आमिष दाखवून तरुणीवर सामूहिक अत्याचाराचा दाखल झालेला गुन्हा, गोळीबाराच्या घटना तसेच काल सरदवाडी-करडे घाट परिसरात गावठी पिस्तुल बाळगणाऱ्या तरुणाला अटक झाल्याने शिरूरमध्ये पोलिसांचा धाक कमी झाला आहे का, असा सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात आहे.

पोलीस निरीक्षक विनोद पाटील यांनी पदभार स्वीकारल्यानंतर सुरुवातीच्या काळात अवैध धंद्यांविरोधात कडक भूमिका घेत कारवाईचा धडाका लावला होता. त्यांच्या या कारवाईचे नागरिकांकडून स्वागत झाले होते. पदभार स्वीकारल्यानंतर त्यांच्या पुढील आव्हानांबाबत तसेच त्यांनी केलेल्या चांगल्या कारवायांबाबत वेळोवेळी वृत्त प्रकाशित करून पोलिस प्रशासनासमोरील आव्हाने अधोरेखित केली आहेत. त्यामुळे सुरुवातीला निर्माण झालेला कायद्याचा धाक कायम राहणार का, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, दोन दिवसांपूर्वी एमडी विक्रीच्या तयारीत असलेल्या दोघांना पोलिसांनी ताब्यात घेत त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात मुद्देमाल जप्त केला. या कारवाईत जवळपास दहा लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त झाल्याचे समोर आले आहे. अंमली पदार्थांचा वाढता विळखा हा शिरूरसाठी गंभीर चिंतेचा विषय बनला असून, एमडीसारखे अमली पदार्थ तरुणांपर्यंत पोहोचत असल्यास त्यामागील संपूर्ण साखळी शोधून काढण्याची गरज आहे. केवळ विक्रेत्यांवर कारवाई न करता या पदार्थांचा पुरवठा करणारे मुख्य सूत्रधार कोण आहेत, याचा शोध घेऊन त्यांच्यावरही कठोर कारवाई होणे आवश्यक आहे.

# डुकरे यांची शालेय समितीच्या अध्यक्षपदी निवड

**■ पुणे :(दै. संध्या)**

*नारायणगाव*:जुन्नर तालुक्यातील स्मार्ट व्हिलेज पारगाव तर्फे आळे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत नुकतीच एक महत्त्वाची बैठक संपन्न झाली. या पालक बैठकीमध्ये शालेय व्यवस्थापन समितीच्या नवीन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यामध्ये समितीच्या अध्यक्षपदी सागर डुकरे यांची, तर उपाध्यक्षपदी सुनील तटूटू यांची सर्वानुमते बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

कार्यक्रमावेळी पंचायत समिती सदस्य संभाजी चव्हाण यांनी शाळेत सुरू असलेल्या विविध उपक्रमांचे कौतुक करून शाळेचे अभिनंदन केले.या विशेष प्रसंगी शालेय व्यवस्थापन समितीचे मावळते अध्यक्ष रघुनाथ तटूटू व मावळते उपाध्यक्ष हनुमंत भोर यांचा, त्यांचा यशस्वी कार्यकाळ पूर्ण झाल्याबद्दल शाळेच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला.



तसेच शाळेतील विविध स्पर्धा परीक्षा जसे की शिष्यवृत्ती परीक्षा, मंथन परीक्षा आणि वेद परीक्षा यामध्ये घवघवीत यश संपादन करणाऱ्या आणि पात्र ठरलेल्या गुणवंत विद्यार्थ्यांचाही मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करून त्यांना प्रोत्साहन देण्यात आले. या महत्त्वपूर्ण कार्यक्रमाला परिसरातील अनेक मान्यवर आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. यामध्ये प्रामुख्याने पंचायत समिती सदस्य संभाजी चव्हाण, माजी अध्यक्ष रघुनाथ तटूटू , माजी उपाध्यक्ष हनुमंत भोर, रामदास तटूटू ,सचिन डुकरे, सरपंच रेश्मा बोटकर, उपसरपंच रामचंद्र डुकरे, शांताराम डुकरे, तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष बाबाजी डुकरे, आप्पाजी पानसरे, संजय तटूटू, मनीषा जाधव, पांडुरंग डुकरे, मुख्याध्यापक लहू गोफणे,शालेय व्यवस्थापन समितीचे सर्व सदस्य, संपूर्ण शिक्षकवृंद यांच्यासह ग्रामस्थ आणि पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व उपस्थितांनी नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त शारीरिक आणि मानसिक संतुलन राखायला मदत

**■ पुणे (दै. संध्या)**

खेळ हे फक्त शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहण्याचं साधन नाहीत. अनेकांसाठी ते तणाव कमी करण्याचं, शिस्त निर्माण करण्याचं आणि रोजच्या आयुष्यात आरोग्यदायी संतुलन राखण्याचं माध्यम बनतात. या राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त सोनी सबचे कलाकार अर्जुन पुंज, इकबाल खान, मुस्कान बामने, नितिन बाबू आणि समरिध बावा यांनी त्यांना आवडणाऱ्या खेळांबद्दल आणि सक्रिय राहणं त्यांच्या जीवनशैलीचा महत्त्वाचा भाग कसं बनलं आहे याबद्दल खुलून सांगितलं.

अर्जुन पुंज, जो यादें मध्ये डिग्गीची भूमिका साकारतो, यांनी सांगितले, “मी आयुष्यभर खेळांशी जोडलेलो आहे. मी अनेक खेळ खेळलो आहे आणि दिल्लीचं ज्युनियर स्तरावर बास्केटबॉलमध्ये प्रतिनिधित्वही केलं आहे. आजही मी आठवड्यात किमान दोन दिवस खेळांसाठी देतो, माझ्या जिम आणि रनिंग रूटीनसोबत. खेळांनी मला शिकवलं आहे की तुम्ही नेहमी जिंकू शकत नाही आणि उंचीप्रमाणेच खालच्या क्षणांना देखील त्याच संतुलनाने हाताळणं गरजेचं आहे. हा धडा मी माझ्या आयुष्यातही सोबत घेतो.”

इकबाल खान, जो यादें मध्ये डॉ. देव मेहता यांची भूमिका साकारतो, यांनी सांगितले, “बॉक्सिंग हा माझ्यासाठी नेहमीच आनंद देणारा खेळ राहिला आहे कारण तो तुम्हाला शारीरिक आणि मानसिक दोन्ही पातळ्यांवर ढकलतो. त्यासाठी लागणारी शिस्त आणि फोकस मला खूप आवडतो, विशेषतः जेव्हा तुम्ही हेवीवेट कॅटेगरीत ट्रेनिंग करता. यामुळे मी सक्रिय राहतो, तणाव कमी होतो आणि मन शांत होतं, म्हणूनच मला ते माझ्या फिटनेस रूटीनचा भाग म्हणून ठेवायला आवडतं.”

मुस्कान बामने, जी पुष्पा इम्पॉसिबल मध्ये शनायाची भूमिका साकारते, यांनी सांगितले, “बॅडमिंटन हा एक असा खेळ आहे ज्याचा मला खरोखर आनंद मिळतो कारण तो सतत हालचाल करायला लावतो. या खेळाची झपाटलेली गती आणि ऊर्जा मला खूप आवडते आणि खेळताना असं वाटत नाही की मी व्यायाम करतेय, पण प्रत्यक्षात तो एक उत्तम वर्कआउट ठरतो. यामुळे मी सक्रिय राहते आणि व्यस्त दिवसानंतर रिलॅक्स होण्यासाठी हा एक मजेदार मार्ग ठरतो.”

समरिध बावा, जो पुष्पा इम्पॉसिबल मध्ये अश्विनची भूमिका साकारतो, यांनी सांगितले, “क्रिकेट हा माझ्यासाठी नेहमीच सक्रिय राहण्याचा आवडता मार्ग राहिला आहे. मला टेबल टेनिस खेळायलाही आवडतं कारण तो झपाट्याने खेळला जातो, सतत सजग ठेवतो आणि रिलॅक्स होण्यासाठी उत्तम मार्ग ठरतो. हे दोन्ही खेळ मला सक्रिय ठेवतात आणि फिटनेस मजेदार बनवतात, त्यामुळे तो कधीच रूटीनसारखा वाटत नाही.”

नितिन बाबू, जो पुष्पा इम्पॉसिबल मध्ये चिरागची भूमिका साकारतो, यांनी सांगितले, “फुटबॉल हा माझ्या मनाच्या खूप जवळचा खेळ आहे. मला जेव्हा संधी मिळते तेव्हा खेळायला आवडतं कारण तो मला सक्रिय ठेवतो आणि माझ्यातील स्पर्धात्मक बाजू बाहेर आणतो. मला सर्वात जास्त आवडतं ते म्हणजे हा कधीच वर्कआउटसारखा वाटत नाही, मी फक्त खेळाचा आनंद घेतो आणि त्याचवेळी फिटही राहतो.”

